महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ

महा सहकार

(PRGI Reg. No. MHMAR/25/A1461)

• पुणे • वर्ष : १ • अंक ३ • जानेवारी-मार्च २०२६ (त्रैमासिक) • पृष्ठे ५२ • किंमत : रु. ५०/- • संपादक : डॉ. भास्कर नारायण पाटील

अर्थसंकल्प २०२६

सहकार क्षेत्रासाठी

₹१७४४.७४

कोटींची तरतूद

- ६३००० प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या संगणकीकरणासाठी विशेष निधी
- प्राथमिक सहकारी संस्थांना कर सवलत
- एका सहकारी संस्थेने दुसऱ्या सहकारी संस्थेस दिलेल्या लाभांशावर कर सवलत
- एन.सी.डी.सी. रु. ५०० कोटीचे अनुदान
- ६८००० संस्थांच्या डिजिटायझेशनसाठी रु. ३६४ कोटी
- त्रिभुवन विद्यापीठासाठी रु. ३०० कोटी
- मत्स्य उद्योगातील सहकारी संस्थांना विशेष अनुदान
- नॅशनल को-ऑपरेटिव्ह एक्सपोर्ट लिमिटेड रु. ४५० कोटी
- नॅशनल कौन्सिल फॉर को-ऑपरेटिव्ह ट्रेनिंग रु. ४६.९६ कोटी
- वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टिट्यूट रु. १० कोटी
- नागरी पतसंस्थांना कलम ८० अंतर्गत वजावट

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे

पहिला मजला, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५. फोन : (०२०) २९८० ९४०८

E-mail : mcdcmahasahakar@gmail.com Website : www.mahamcdc.com

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ
(रौप्य महोत्सवी वर्ष २०२५-२६)

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे अंतर्गत

शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणी

- रास्त दरामध्ये शेतकरी उत्पादक कंपनीची नोंदणी.
- शासनाच्या योजनांचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक मदत.
- सारथी प्रायोजित संचालक मंडळ व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विनामुल्य प्रशिक्षण.
- रास्त दरात कृषी निविष्ठांचा पुरवठा.

शेतकरी उत्पादक कंपनी नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे -

- एकुण १० संचालकांचे पॅनकार्ड व आधारकार्ड स्वंयमस्वाक्षरीत (सेल्फ अटेस्टेड)
- जन्मदाखला / प्रमाणपत्र
- मोबाईल नंबर व ईमेल आयडी
- पत्ता – लाईट बिल किंवा इंडेक्स ०२
- बँक स्टेटमेंट पहिले पान व चालू महिन्याचे बँक स्टेटमेंट प्रत
- शेतकरी असल्याचा दाखला
- शिक्षण
- पासपोर्ट फोटो - ३

नोंदणी शुल्क
रु. ३५,४००/-
(GST सहित)

नोंदणी शुल्क खालील बँक खात्यात जमा करावेत.

Bank Name
Federal Bank
Account Number
13480200009347
IFSC Code
FDRL0001348

(वरील सर्व कागदपत्रे स्कॅन करून **mcdcabgc@gmail.com** या मेलवर पाठवावे)

अधिक माहितीसाठी संपर्क - श्रीमती शुभांगी भोलनकर
प्रशिक्षण समन्वयक, मो. क्र. - ९३२२७९४५५०
mcdcabgc@gmail.com
www.mahamcdc.com
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, साखर संकुल, शिवाजीनगर ,पुणे - ४११००५

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ
२५ रौप्य महोत्सवी वर्ष

महा सहकार

वर्ष : १ अंक : ३ जानेवारी–मार्च २०२६
पृष्ठे : ५२ किंमत : रु. ५०/–
(वार्षिक वर्गणी रु. २००/–)
संपादक : डॉ. भास्कर नारायण पाटील

मार्गदर्शक

मा. ना. श्री. बाबासाहेब पाटील,
सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य

मा. श्री. दीपक तावरे
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. डॉ. संजय कोलते,
साखर आयुक्त, पुणे

मा. श्री. संजय कदम
पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे

मा. श्री. गोकुळ राठी
तज्ज्ञ संचालक

श्री. मंगेश तिटकारे
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ, पुणे

* लेखातील मते लेखकांची

अनुक्रमणिका

- संपादकीय ४
- आदरणीय, स्वर्गीय अजित दादांचे भावपूर्ण स्मरण..... ५
- पतसंस्था ३१ मार्च महागाथा: आर्थिक वर्ष अखेरचे नियोजन..... ७
- सहकारी गृहनिर्माण संस्था : निवडणूक, नेतृत्व आणि सदस्यांची जबाबदारी ९
- सहकारी संस्थांचे उपविधीसमजून घेताना..... ११
- सेंद्रिय शेती व उत्पादन विपणनासाठी शासकीय–संस्थात्मक डिजिटल यंत्रणा..... १४
- कृषी विभागाचे सध्याच्या काळाशी सुसंगत, प्रभावी व सर्जनशील बोधचिन्ह व घोषवाक्य..... १८
- महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न. १८
- परिवर्तनाच्या उंबरठ्यावर सहकार चळवळ १९
- नागरी सहकारी बँका प्रशासकीय 'व्यावसायिकता' आणि अस्तित्वाचा संघर्ष.... २०
- बीडी धुमाळ कृषी पायाभुत सुविधा व मुल्यवर्धन साखळी २३
- तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनी..... २५
- भाडेकराराद्वारे गोदाम व्यवसायातून उत्पन्नाचे व्यवस्थापन २८
- केंद्रीय अर्थसंकल्प : अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक वाटचाल आणि सहकाराचे नवे क्षितिज ३०
- देशात दोन लाख नव्या बहुद्देशीय सहकारी सेवा संस्थांची निर्मिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ ३२
- महाराष्ट्र राज्य : प्रस्तावित सहकार धोरणाच्या अनुषंगाने..... ३३
- सहकाराची डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल..... ३७
- सहकारी संस्थांसाठी MSME मार्गदर्शक: कोणत्या संस्थेला कोणता लाभ आणि कितीपर्यंत? ३८
- बँकिंगमधील संवाद कौशल्य ४०
- नवीन सहकार धोरण सर्वसमावेशक, भविष्याचा वेध घेणारे – मा. ना. बाबासाहेब पाटील..... ४१
- सहकार कायद्यातील बदलासाठी १६ सदस्यांची समिती गठीत ४२
- करारामागचे अर्थशास्त्र..... ४३
- अकृषक परवानगी, सनद तसेच अकृषक आकारणी रद्द करण्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, (सुधारणा) २०२५ च्या अनुषंगाने दिशानिर्देश देण्याबाबत..... ४४

संपादकीय

भारतातील सहकार चळवळीचा इतिहास सुमारे १२५ वर्षांचा असून देशात सद्यस्थितीत सुमारे ८.५० लाख विविध प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाशी देशातील सुमारे ३० कोटी लोक संलग्न आहेत. महाराष्ट्रात सहकारी संस्थांची संख्या सुमारे २.२५ लाख असून त्यांचीशी राज्यातील सुमारे ६ कोटी लोकसंलग्न आहेत. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखान्याचे जाळे, सूत गिरण्या, जलसिंचन योजना, विविध कार्यकारी सहकारी संस्था, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, ग्रामीण पतसंस्था, दूध संघ, ग्राहक सहकारी संस्था तर शहरी भागात नागरी बँका, सहकारी गृहरचना संस्था, लेबर सोसायट्या सहकाराशी निगडित असून अशा सर्व प्रकारच्या सहकारी संस्थाचे लोक लाभार्थी आहेत.

केंद्र सरकारने जुलै २०२१ मध्ये सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू केले. दि.२४ जुलै २०२५ रोजी केंद्र सरकारने नवीन राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर केले असून सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. त्याच धर्तीवर सर्व राज्यांनी सहकार धोरण तयार करावयाचे आहे.

सन २०२६ चा केंद्रीय अर्थसंकल्प हा देशाच्या आर्थिक दिशेचा जाहीरनामा म्हणावा लागेल. २०२६ च्या अर्थसंकल्पातील धोरणात्मक प्राधान्यक्रम पाहता देशाचे ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य वास्तव्याच्या जवळ येताना दिसत आहे. विकसित भारताचे स्वप्न २०४७ पर्यंत पूर्ण करण्यासाठी सहकार क्षेत्राचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. सद्यस्थितीतील बँकीग व्यवस्थेचे भविष्यातील नियोजन करण्याच्या दृष्टीने तसेच बँकिंग व्यवस्थेचे पुनरावलोकन करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्याची घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. ही समिती सद्याच्या बँकिंग क्षेत्रातील कायद्याचा अभ्यास करून त्यामध्ये योग्य ते बदल यावर भाष्य करेल. बँकिंग क्षेत्राची भविष्यात होणारी वाढ, खातेदारांचे संरक्षण आणि त्यांना द्यावयाचे स्थैर्य या बाबी समितीच्या कक्षेत येतील. सार्वजनिक क्षेत्रांतील बँकांचे एकत्रिकरण हा विषयही समितीच्या कार्यकक्षेचा भाग असेल.

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून घोषित केले आहे. शेती क्षेत्रातील महिलांचे महत्त्वपूर्ण योगदान अधोरेखित करणे, त्यांना सक्षम बनविणे, ग्रामीण विकासात त्यांची भूमिका दृढ करणे हा या वर्षाचा मुख्य उद्देश आहे. त्यादृष्टीने शासन विशेष उपक्रम व कार्यशाळा आयोजित करीत आहे. सहकार क्षेत्रातील महिलांच्या सहभागामुळे आर्थिक व्यवहारच नाहीतर शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, कुटुंबाचे आर्थिक नियोजन आणि समाजातून दुर्बल घटकांना मदत या क्षेत्रात महिलांचे कार्य वाढविण्याचे प्रयत्न होत आहेत. अनेक सहकारी बँका, पतसंस्था, साखर कारखाने, दूध संघ आणि विविध कार्यकारी संस्थांमध्ये महिला अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या प्रमाणावर कार्यरत आहेत. संस्थेचे व्यवस्थापन, वित्तीय शिस्त, ग्राहकाभिमुख लेखा, पारदर्शी कारभार आणि नियंत्रण याबाबतीत महिलांनी आपली क्षमता प्रभाविपणे सिद्ध केली आहे. आजच्या काळात सहकार क्षेत्रात महिलांच्या नेतृत्वाला अधिक बळ देण्याचे प्रयत्न शासन करीत आहे. या वर्षात ग्रामीण शेतकरी महिलांना विविध उपक्रमात सहभागी करून घेण्याच्या योजना शासन/ विविध विभागांमार्फत आणल्या आहेत व काही विभागांच्या लवकरच येणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाने या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पात सहकार क्षेत्राच्या सक्षमीकरणासाठी रक्कम रू.१७४४.७४ कोटीची भरभक्कम तरतूद केली आहे. यात कृषी पतसंस्थांच्या संगणकी करणासाठी, एन.सी.डी.सी. अनुदानासाठी, सहकार संस्थांच्या डिजिटलायझेशनसाठी, सहकार क्षेत्रासाठी उभे राहत असलेले त्रिभुवन विद्यापीठासाठी, मत्स्य, दुग्ध, सहकारी संस्था तसेच सहकारी शिक्षणासाठीही निधी मंजूर केला आहे. हे पाहता भावी वर्षात सहकारी क्षेत्राला चांगले दिवस येत आहेत हे निश्चित. याचा उपयोग सहकारी संस्थांनी आपल्या पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी, सक्षम होण्यासाठी करणे अपेक्षित आहे.

***

'महा सहकार' हे मासिक मालक, महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन यांचेकरिता प्रकाशक मंगेश भगवंत तिटकारे यांनी मुद्रक विवेक श्रीधर देशपांडे यांच्या श्रीपाद प्रिंटर्स, द्वारा शॉप नं. २, कोणार्क उद्योग, सर्व्हे नं. १७७, एरंडवणे, पुणे - ४११ ००४ येथे छापून साखर संकुल, नरवीर तानाजी वाडी, शिवाजी नगर, पुणे - ४११ ००५ येथून प्रसिद्ध केले.

संपादक - डॉ. भास्कर नारायण पाटील

'Maha Sahakar' quartely periodical is owned by Maharashtra Cooperative Development Corporation, Published by Mangesh Bhagwant Titkare, Printed by Vivek Shridhar Deshpande at Shripad Printers, Shop No. 2, Konark Udyog, Sr. No. 177, Erandwana, Pune - 411 004 Published at Sakhar Sankul, Narveer Tanaji Wadi, Shivaji Nagar, Pune 411 005.

Editor - Dr. Bhaskar Narayan Patil

आदरणीय, स्वर्गीय अजित दादांचे भावपूर्ण स्मरण

राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या अकस्मात व अत्यंत दुर्देवी निधनाने राज्याने उत्तम प्रशासक आणि कुशल अभ्यासू नेतृत्व गमावले. ति. दादांच्या अकाली, अनपेक्षित जाण्याचा फटका सर्वांनाच वेगवेगळ्या प्रकारे बसला. राज्यातील प्रश्नांची उत्तम जाण त्यांना होती. लोकांसाठी काम करण्याची सततची तळमळ आणि राज्याच्या विकासाचे ध्येय घेऊन दादांची सकाळ होत असे. कोणतीही गोष्ट लक्षपूर्वक ऐकून घेणे, समजून घेणे आणि मनातील प्रश्न समोरच्याला विचारून, सर्व शंकांचे निरसन होईपर्यंत त्या विषयाचा अभ्यास करणे हे दादांचं वैशिष्ट्य. स्पष्टवक्तेपणा, कडक स्वभाव आणि वक्तशीरपणा ही त्यांची गुणवैशिष्ट्ये. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे आणि चुकीचे काम करणाऱ्यांना जाहीरपणे परखडपणे त्यांच्या खास शैलीत रोखठोक सुनावणे हे त्यांच्या स्वभावात होते. स्वच्छतेचा आग्रह, टापटीपपणा, वक्तशीरपणा, जे काम होईल त्याचा दर्जा उत्तम झाला पाहिजे, त्याच्यासाठी विशेष लक्ष देणं, जाणीवपूर्वक तसा आग्रह धरणे हे त्यांचे स्वभाव वैशिष्ट्य होतं. तशीच त्यांची जनमानसात ओळख आणि दरारा होता. नियमांना बांधील राहणे, प्रशासकीय यंत्रणेवर आवश्यक तेवढाच दबाव, अधिकाऱ्यांकडून चांगलं काम पाठपुरावा करून घेण्याची त्यांची पद्धत वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांची ही पद्धत राज्यात 'अजित पॅटर्न' म्हणून ओळखली जात होती.

राज्याच्या सार्वजनिक आणि राजकीय जीवनात स्व. अजितदादांचे स्थान अत्यंत महत्त्वाचं होतं. त्यांचा संपूर्ण जीवनप्रवास सहकारी चळवळीशी जोडलेला होता. सहकारी साखर कारखाने, कृषी उत्पन्न बाजार समित्या, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, पतसंस्था, ग्रामीण आणि शहरी बँका, अशा सर्वच क्षेत्रांमध्ये दादांनी आपल्या कार्याची छाप उमटवली होती. सन १९९१ पासून पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे ते संचालक आणि अध्यक्षही होते. ही बँक देशपातळीवरील अग्रगण्य बँक होण्यामागे दादांची दूरदृष्टी निश्चितच होती. व्यवसाय आणि राजकारण वेगवेगळे ठेवून आर्थिक शिस्त पाळून, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि व्यावसायिकता अंगिकारून व्यवसाय चालले पाहिजेत हा त्यांचा आग्रह असे. दादा नेतृत्व करीत असलेले सहकारी आणि खाजगी साखर कारखाने त्याचे साक्षीदार आहेत. साखर कारखान्याच्या क्षेत्रातील सभासदांना उसाचे अत्याधुनिक पद्धतीने एकरी जास्तीत जास्त उत्पादन कसे घेता येईल, याचा ते सतत अभ्यास करत. याशिवाय साखर कारखान्यांनी उत्पादन घेताना तांत्रिक व आर्थिक मापदंड कसे पाळले पाहिजेत आणि ते कसे पाळता येतील याबाबत त्यांचं लक्ष कारखान्याच्या प्रत्येक अधिकारी व कामगार यांच्यावर असे. त्यांचा याबाबतचा अभ्यास दांडगा होता आणि संबंधित विभाग सांभाळणाऱ्या सर्व कर्मचारी आणि अधिकारी यांची त्यांना पूर्णपणे माहिती असे. त्याचा ते सतत आढावा पण घेत असत. त्यांनी अशा ठिकाणी वशिलेबाजी, नातेवाईक, जवळचा, ओळखीचा,

अशा बाबींना कधीच स्थान दिले नाही. गुणवत्ता, अभ्यास, सचोटी, कष्टाळूपणा, प्रामाणिकपणा आणि संस्थेप्रती उत्तरदायित्व राखणाऱ्या अधिकारी आणि कर्मचारी यांना त्यांनी उचलून धरलं, त्यांचं योग्य ते मूल्यमापन करून त्यांना योग्य ते वेतन व सवलती दिल्या आणि योग्य ती अपेक्षा सुद्धा केली. हे मी जवळून पाहिले आहे. नवनवीन प्रयोग करायला त्यांना आवडत असे. उसाचे प्रती हेक्टर उत्पादन वाढीसाठी AI तंत्रज्ञानाचा उपयोग करून घेण्यासाठी शासनाकडून पाचशे कोटीच्या निधीची तरतूद त्यांच्यामुळे झाली. सहकार ही एक आर्थिक रचना नसून सामाजिक चळवळ असल्याचा विचार त्यांच्या भाषणातून आणि निर्णयांमधून वारंवार व्यक्त होत असे. सहकार चळवळीचा उपयोग ग्रामीण अर्थव्यवस्था भक्कम करण्यासाठी त्यांचा विशेषत्वाने प्रयत्न होता.

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे मा. वित्तमंत्री या नात्याने ते पदसिद्ध संचालक होते. ति. दादांचे महामंडळात विविध खात्यांच्या व विषयांच्या बैठकीनिमित्त नेहमी येणे जाणे होत असे. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे कामकाज, ग्रामीण शेतकरी बांधव, PAC's/ FPO's साठी होत असलेल्या कामकाजाबाबत दादा वेळोवेळी माहिती घेत. विविध प्रकारचे मार्गदर्शन व मदत करण्याचा त्यांचा प्रयत्न असे. महामंडळातील टापटीपपणा, प्रसन्न वातावरणाबाबत, स्वच्छतेबाबत दादांनी अनेकदा चांगले उद्‌गार काढलेले आणि जाहीर कौतुक केलेले माझ्या स्मरणात आहे. पुण्याचे पालकमंत्री या पदाच्या माध्यमातून त्यांनी अनेक योजना व प्रकल्पांना गती दिली. गेल्या पंचवीस वर्षात पुण्यात राज्य शासनाच्या नव्या इमारती दिमाखात उभ्या राहिल्या, त्यात पालकमंत्री म्हणून दादांचा सिंहाचा वाटा होता. रिंग रोडच्या अडचणी त्यांनी सोडवल्या. पुण्याचे जिल्हाधिकारी कार्यालय असो, व्हीव्हीआयपी सर्किट हाऊस, सारथी, शिक्षण, नोंदणी भवन, येरवड्यातील सेंट्रल बिल्डिंग-टू यासारख्या अद्ययावत 'ग्रीन बिल्डिंग' त्यांच्या मार्गदर्शनाखाली उभारल्या गेल्या. प्रशासनावर पकड असल्याने या सर्व इमारतींचा दर्जा पुढील शंभर वर्षे चांगला राहील असा झाला आहे. मध्यवर्ती इमारतीमधील सरकारी कार्यालयाच्या विस्तारांची सातत्याची मागणी लक्षात घेऊन या इमारती पंचतारांकित दर्जाच्या करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. कृषी महाविद्यालयात, साखर संकुलमध्ये दर्जेदार उभी राहत असलेली कृषी, सहकार खात्याची कार्यालये तसेच कामगार, पोलीस आयुक्तालय, ग्रामीण पोलीस अधीक्षक, जमाबंदी आयुक्तालय, ऑलिंपिक भवन, प्रादेशिक मनोरुग्णालय, फौजदारी न्यायालय, मोशी, पिंपरी चिंचवड येथील संकुल या इमारतींसाठी वेळेवर निधी उपलब्ध करून देणे, संबंधितांच्या बैठका घेणे, प्रत्यक्ष स्थळ पाहणी ते करत, त्यातून ते आढावा घेत. या सर्वच इमारतींचा दर्जा उत्तम राहील याची ते काळजी घेत. तांत्रिक बाजूंचे बारकावे व्यवस्थितरित्या समजावून घेण्याची त्यांची पद्धत अद्वितीय होती. सहकार संकुलाचे साखर संकुलमध्ये होत असलेल्या बांधकामाच्या बैठकांमध्ये मी ही बाब स्वतः अनुभवली आहे. येत्या दोन ते तीन वर्षात पुणे जिल्ह्यात दिमाखाने उभी राहणारी शासकीय कार्यालये दादांच्या दूरदृष्टीची निश्चित निरंतर साक्ष देतील आणि दादांचे स्मरण या इमारती पाहिल्यावर सर्वांनाच कायम होईल हे निश्चितच. प्रश्नांची उत्तम जाण, लोकांसाठी काम करण्याची तळमळ, भेटीसाठी वेळ दिला तर ते भेटत. समोरच्याचे म्हणणे पूर्ण ऐकून घेतल्यावर संबंधित अधिकाऱ्यांचं म्हणणंही सर्वांसमक्ष ऐकून तत्काळ अभ्यासपूर्ण निर्णय देण्याची त्यांची अनोखी ताकद होती. नियमात बसून काम होणार असेल तर ते लगेच हो म्हणत अन्यथा काम होणार नाही हे रोखठोकपणे जाहीर सांगत. पाहू, नंतर बघू असे आघळपघळ बोलणे त्यांच्या स्वभावात नव्हते. साखर संकुल मध्ये त्यांच्या होणाऱ्या बैठकांच्या मागेपुढे कार्यकर्ते किंवा मागण्या घेऊन आलेल्या जनतेशी ते ज्या पद्धतीने बोलत आणि त्यांचा समाचार घेत व त्यांना हाताळत, त्यांचे काम करत, त्या कामाच्या बाबतीत संबंधित अधिकाऱ्यांशी पाठपुरावा करत. त्यांची ही काम करण्याची पद्धत, लोकांमध्ये काम करणाऱ्या प्रशासनिक अधिकाऱ्यांना अभ्यासासाठी खूप महत्त्वाची असे. साखर संकुल मध्येच मी बरीच वर्ष काम करत असल्याने ति. दादाही कृषी, सहकार, साखर, व्हीएसआय, साखर संघ यांच्या बैठकांना अधून मधून येत असल्याने मलाही त्यांच्या कामाची पद्धत जवळून बघता आली. राज्यातील राजकारणात सहकार क्षेत्राचा उपयोग हा सत्तेचा पाया, मतांची मशागत आणि चांगले नेतृत्व घडवणारी प्रयोगशाळा आहे, हे सिद्ध झाले आहे. या प्रयोगशाळेचा उपयोग जनसामान्यांची कामे, ग्रामीण भागाचा सर्वांगाने कायापालट करण्यासाठी, आर्थिक सुबत्ता, रोजगार, शिक्षण, व्यवसाय वृद्धीसाठीही चांगला कसा होऊ शकतो हे तिर्थरूप दादांनी त्यांच्या प्रयोगातून दाखवून दिले आहे. या प्रयोगशाळेवर ज्यांनी बराच काळ नियंत्रण ठेवले त्यात स्वर्गीय दादांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. साखर कारखाने, बँका, बाजार समित्या, दुग्ध संघ या संस्थावर त्यांची असलेली पकड ही राजकीय नव्हे तर व्यवस्थापकीय शिस्तीची उदाहरणे मानली जातील. आम्हा सर्व शासकीय अधिकाऱ्यांच्या मनात तीर्थरूप दादांच्या पवित्र स्मृती, त्यांनी केलेली कामे, उभ्या केलेल्या सर्वांगसुंदर, पर्यावरणपूरक इमारती पाहताना जागृत होतील, याद्वारे त्यांच्या स्मृती कायम मनात दरवळत राहतील हे निश्चित. त्यांना महा सहकार त्रैमासिक तसेच महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाच्या वतीने भावपूर्ण आदरांजली..

– मंगेश तिटकारे

व्यवस्थापकीय संचालक

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ

पतसंस्था ३१ मार्च महागाथा: आर्थिक वर्ष अखेरचे नियोजन

सहकार चळवळ ही केवळ एक आर्थिक व्यवस्था नसून, ती सामान्य माणसाच्या आर्थिक प्रगतीचे आणि सामाजिक न्यायाचे सर्वात मोठे साधन आहे. 'विना सहकार नाही उद्धार' हे ब्रीदवाक्य केवळ भिंतीवर लिहिण्यासाठी नसून, ते पतसंस्थांच्या रोजच्या कारभारात प्रतिबिंबित होणे आवश्यक असते. या प्रवासात ३१ मार्च हा दिवस एखाद्या वार्षिक महापरीक्षेसारखा असतो. पतसंस्थांच्या संपूर्ण वर्षभराच्या कार्यक्षमतेचा, पारदर्शकतेचा आणि धोरणात्मक निर्णयांचा कस या दिवशी लागतो. आर्थिक वर्ष संपताना तयार होणारा ताळेबंद (Balance Sheet) आणि नफा-तोटा पत्रक (Profit and Loss Account) हे संस्थेच्या यशाचे मोजमाप करतात. या संपूर्ण प्रक्रियेला तांत्रिक भाषेत 'इयर एंड क्लोजिंग' (Year-end Closing) असे म्हटले जाते. जर या प्रक्रियेचे नियोजन चोख नसेल, तर शेवटच्या क्षणी होणारी धावपळ संस्थेच्या प्रतिमेला तडा देऊ शकते.

मंगेश देहडेकर

मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून आम्ही मार्च ची तयारी हि किमान दोन ते तीन महिने आधी करायचो ,खर तर ३१ मार्चची यशस्वी सांगता करण्यासाठी 'उलट गणती' (Countdown) जानेवारी महिन्यापासूनच सुरू व्हायला हवी. कोणत्याही मोठ्या मोहिमेच्या यशाचे रहस्य हे त्याच्या पूर्वतयारीत असते. जानेवारी महिन्यात लेखा विभागाने (Accounts Department) सर्व कर्ज फाईल्स आणि ठेव पावत्यांचे प्राथमिक ऑडिट पूर्ण करावे. यामध्ये प्रामुख्याने 'केवायसी' (KYC) नियमांचे पालन झाले आहे का, याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक कर्जदार आणि ठेवीदाराचा आधार कार्ड, पॅन कार्ड आणि अद्ययावत पत्ता संस्थेच्या रेकॉर्डला असणे आवश्यक आहे. जर एखाद्या कर्जदाराचे कागदपत्र अपूर्ण असतील, तर ते याच काळात पूर्ण करून घ्यावेत, जेणेकरून मार्चमध्ये त्यावर वेळ खर्च होणार नाही. तसेच, जुन्या कर्जदारांचे नूतनीकरण केलेले विमा (Insurance) आणि गहाणखतांचे व्हॅल्युएशन रिपोर्ट (Valuation Report) अद्ययावत आहेत का, याची तपासणी करावी. फेब्रुवारी महिना हा 'मेळ' घालण्याचा महिना म्हणून ओळखला जावा. वर्षभरात कामाच्या व्यापात अनेकदा तातडीने केलेले खर्च किंवा अपरिचित रकमा 'सस्पेन्स' (Suspense) किंवा अमानत खात्यात टाकल्या जातात. फेब्रुवारीमध्ये अशा प्रत्येक नोंदीचा शोध घेऊन ती संबंधित खात्याला वर्ग करावी. शाखावार मेळ (Branch Reconciliation) आणि बँक रिकन्सिलेशन (BRS) याच काळात पूर्ण करणे श्रेयस्कर असते. मार्च महिना उजाडल्यानंतर नवीन कर्ज वाटपाचे प्रमाण कमी करून पूर्ण लक्ष केवळ वसुली आणि क्लोजिंगच्या तांत्रिक बाबींवर केंद्रित करावे. १ मार्चनंतर कर्मचाऱ्यांच्या रजांवर निर्बंध आणून त्यांना कामाचे स्पष्ट उद्दिष्ट (Target) नेमून द्यावे.

याबरोबरच,पतसंस्थेचा आर्थिक कणा हा तिची कर्ज वसुली असते. ३१ मार्चच्या ताळेबंदात 'NPA' (Non-Performing Assets) जितका कमी, तितकी संस्थेची विश्वासार्हता आणि नफा जास्त असतो. वसुली ही केवळ पैसे गोळा करण्याची प्रक्रिया नसून ती जोखीम व्यवस्थापनाचा (Risk Management) एक अविभाज्य भाग आहे. एनपीएचे तांत्रिक वर्गीकरण समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. नियमानुसार, कर्ज खात्यांचे वर्गीकरण मानक (Standard), उप-मानक (Sub-standard), संशयास्पद (Doubtful) आणि बुडीत (Loss Assets) अशा चार श्रेणींमध्ये केले जाते. ज्या खात्यांमध्ये ९० दिवसांपेक्षा जास्त काळ मुद्दल किंवा व्याज थकीत आहे, ती खाती एनपीए म्हणून गणली जातात. क्लोजिंगपूर्वी अशा खात्यांची यादी काढून त्यांच्याकडून रक्कम वसूल करण्याचा प्रयत्न करावा, जेणेकरून खाते नफ्यात राहू शकेल.

क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी (Field Officers) सभासदांशी वैयक्तिक संवाद साधून त्यांना थकीत कर्जाचे दुष्परिणाम समजावून सांगावेत. वसुलीसाठी विशेष पथके तयार करून थकबाकीदारांच्या प्रत्यक्ष भेटी घेणे, त्यांना पत्राद्वारे किंवा फोनद्वारे वारंवार आठवण करून देणे आवश्यक असते. गरज पडल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० च्या कलम १०१ नुसार वसुली दाखला मिळवण्यासाठी कायदेशीर प्रस्ताव सादर करावेत. जप्तीपूर्व नोटिसा बजावल्यास वसुलीला अपेक्षित गती मिळते. तसेच, अनेकदा अडकलेला पैसा बाहेर काढण्यासाठी संचालक मंडळाच्या मान्यतेने 'एक रकमी परतफेड योजना' (OTS) राबवणे फायदेशीर ठरते. यामुळे जुन्या थकीत कर्जांवरील व्याजात काही सवलत देऊन मुद्दल वसूल करता येते, ज्यामुळे संस्थेची लिक्विडिटी सुधारते आणि प्रोव्हिजनचा बोजा कमी होऊन नफा वाढण्यास मदत होते.

नफ्याच्या बाबतीत देखील नफ्यातून किती रक्कम बाजूला काढायची, याचे गणित सहकार खात्याने आणि आयकर नियमांनी निश्चित केले आहे. ३१ मार्चला जर योग्य तरतूद (Provision) केली नाही, तर संस्थेचा नफा अवास्तव फुगून दिसतो (Inflated Profit). हा फुगीर नफा भविष्यात ऑडिट दरम्यान आक्षेपाचा विषय ठरतो आणि संस्थेची आर्थिक स्थिती कमकुवत करतो. कर्ज खात्यांवरील तरतुदींमध्ये 'मानक' कर्जावरही ०.२५% ते ०.४०% पर्यंत 'कंटिन्जंट प्रोव्हिजन' करावी लागते. Sub-standard संशयास्पद (Doubtful) कर्जांसाठी थकीत कालावधीनुसार १०% ते १००% पर्यंत तरतूद करणे अनिवार्य असते. बुडीत कर्जासाठी पूर्ण १००% तरतूद करावी लागते. याशिवाय, संस्थेने इतर बँकांमध्ये केलेल्या गुंतवणुकीच्या मूल्यामध्ये घट झाली असल्यास, तिथेही 'इन्व्हेस्टमेंट फ्लक्चुएशन फंड' (IFF) निर्माण करावा लागतो.

कर्मचारी कल्याणाच्या दृष्टीने ग्रॅच्युईटी आणि लिव्ह एनकॅशमेंट (Gratuity Leave Encashment) साठी तरतूद करणे ही कायदेशीर जबाबदारी आहे. कर्मचाऱ्यांच्या निवृत्तीनंतर द्यावयाच्या या रकमांचे 'एक्चुअरियल व्हॅल्युएशन' करून त्यानुसार ३१ मार्चलाच निधी बाजूला ठेवावा. नफा व्यवस्थापन करताना केवळ लाभांश (Dividend) वाटण्यावर लक्ष न देता, 'राखीव निधी' (Statutory Reserves) आणि 'इमारत निधी' यांसारख्या वैधानिक निधींमध्ये जास्तीत जास्त रक्कम कशी वर्ग करता येईल, याचा विचार संचालक मंडळाने करावा. यामुळे संस्थेचे स्वतःचे भांडवल (Owned Funds) वाढते आणि संस्था कोणत्याही आर्थिक संकटाचा सामना करण्यास सज्ज होते.

हिशेबांची अचूकता ही क्लोजिंगची पहिली आणि सर्वात

महत्त्वाची पायरी आहे. मुख्य लेखापालाने तांत्रिक बाबींवर विशेष लक्ष दिले पाहिजे. ताळेबंदातील एक छोटी आकडेमोड किंवा चुकीच्या हेडला गेलेली एन्ट्री ऑडिटमध्ये मोठे प्रश्न निर्माण करू शकते. 'बँक रिकन्सिलेशन' (BRS) ही प्रक्रिया ३१ मार्चपूर्वीच पूर्ण करणे आवश्यक आहे. पतसंस्थेची इतर बँकांमध्ये असलेली खाती आणि संस्थेच्या लेजरमधील शिल्लक यांचा मेळ बसणे अनिवार्य असते. व्याजाच्या नोंदी, बँक चार्जेस, धनादेश वटणावळ यांतील फरकांचा शोध घेऊन रिकन्सिलेशन स्टेटमेंट तयार ठेवावे. सस्पेन्स अकाउंट (अमानत खाते) ३१ मार्चला 'निरंक' (Zero) असणे हे पारदर्शक कारभाराचे लक्षण आहे. घाईत सस्पेन्सला टाकलेल्या रकमांचा शोध घेऊन त्या संबंधित कर्ज किंवा ठेव खात्याला वर्ग कराव्यात.

तांत्रिक हिशेब जुळवणीमध्ये पिग्मी (Daily Deposit) एजंटच्या व्यवहारांना विशेष महत्त्व असते. अनेकदा एजंटच्या मशीनमधील डेटा आणि कोअर बँकिंग सर्व्हरमधील डेटा यात तफावत आढळते. ३१ मार्चच्या दुपारी १२ वाजेपर्यंत सर्व एजंट्सना आपली वसुली जमा करण्याची सक्ती करावी आणि त्यांच्या कमिशनची गणना टीडीएस कापून अचूक करावी. रोख शिल्लक (Cash in Hand) मोजताना तिजोरीतील प्रत्यक्ष रोख आणि पुस्तकी शिल्लक यांचा मेळ बसवून त्याचा रीतसर पंचनामा करावा आणि त्यावर जबाबदार अधिकारी व दोन साक्षीदारांच्या स्वाक्षऱ्या घ्याव्यात.

नफा व्यवस्थापन करताना केवळ व्यवसाय वाढवून चालत नाही, तर होणारी खर्चाची आणि उत्पन्नाची गळती रोखणे (Revenue Leakage) महत्त्वाचे असते. 'येणे व्याज' (Interest Receivable) आणि 'देणे व्याज' (Interest Payable) यांचा मेळ घालताना 'ॲक्युर्ड इंटरेस्ट' ही संकल्पना समजून घ्यावी. ३१ मार्चपर्यंत मुदत ठेवींवर जेवढे व्याज देय आहे, त्याची पूर्ण तरतूद करावी, अन्यथा नफा चुकीचा दिसेल. उत्पन्न वाढवण्यासाठी वर्षभरात द्याव्या लागणाऱ्या विविध सेवांचे चार्जे स आकारले आहेत का, याची खात्री करावी. यामध्ये नोटीस फी, व्हिजिट चार्जेस, चेक बाऊन्स चार्जेस, आणि एसएमएस चार्जेस यांचा समावेश होतो. हे छोटे चार्जेस एकत्रितपणे संस्थेच्या नफ्यात मोठी भर टाकतात.

खर्चाचे नियोजन करताना मार्च महिन्याचे पगार, वीज बिल, भाडे आणि इतर प्रशासकीय खर्च ३१ मार्चपूर्वीच पेड दाखवावेत किंवा त्यांची 'थकीत खर्च' (Outstanding Expenses) म्हणून तरतूद करावी. संस्थेच्या मालमत्तेवर, जसे की फर्निचर, संगणक आणि इमारतीवर नियमानुसार घसारा (Depreciation) आकारणे आवश्यक आहे. घसारामुळे मालमत्तेची 'बुक व्हॅल्यू' वास्तववादी राहते आणि नफ्यातून ती वजा केल्यामुळे आयकर सवलत मिळते.

गुंतवणूक (Investment) आणि वैधानिक तरलता –संस्थेच्या निधीची गुंतवणूक करताना सुरक्षितता, तरलता आणि परतावा या तीन गोष्टींचा विचार करावा. ३१ मार्चला संस्थेची गुंतवणूक वैधानिक मर्यादेबाहेर नाही ना, हे तपासावे. ज्या गुंतवणुकीची मुदत मार्चमध्ये संपत आहे, त्या वेळेवर रिन्यू कराव्यात किंवा त्याचे मुद्दल व व्याज संस्थेच्या खात्यात जमा झाले आहे का, याची खात्री करावी. इतर बँकांमधील मुदत ठेवींवर मिळणारे व्याज 'ॲक्युर्ड' करून उत्पन्नात घ्यावे. यामुळे संस्थेचा एकूण नफा वाढण्यास मदत होते.

या व्यतिरिक्त काही कायदेशीर बाबीं कडे देखील लक्ष द्यावे , कायद्याचे उल्लंघन झाल्यास संस्थेला मोठा दंड भरावा लागू शकतो. टीडीएस (Tax Deducted at Source) हा यातील महत्त्वाचा भाग आहे. जर ठेवीदाराचे वार्षिक व्याज मर्यादेपेक्षा जास्त असेल, तर नियमानुसार टीडीएस कपात करून तो सरकारी तिजोरीत वेळेत भरला पाहिजे. तसेच, ठेवीदारांकडून १५जी/१५एच फॉर्म्स गोळा करून त्यांची नोंद ऑनलाईन पोर्टलवर करणे आवश्यक आहे. नफ्यातील २५% रक्कम वैधानिक राखीव निधीत वर्ग करणे आणि शिक्षण निधीसाठी आवश्यक तरतूद करणे ही संचालक मंडळाची कायदेशीर जबाबदारी आहे.

तंत्रज्ञान, डेटा सुरक्षा आणि सीबीएस (CBS) व्यवस्थापन– आजच्या डिजिटल युगात 'कोअर बँकिंग सॉफ्टवेअर' हा संस्थेचा मेंदू आहे. ३१ मार्चला सिस्टमवर प्रचंड लोड असतो, त्यामुळे सॉफ्टवेअर व्हेंडरशी संपर्क साधून 'इयर एंड पॅच' अपडेट करून घ्यावेत. व्यवहार पूर्ण झाल्यावर डेटाचा एकापेक्षा जास्त ठिकाणी बॅकअप (Cloud, External Drive) घेणे सुरक्षिततेच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे. इयर–एंड प्रक्रिया चालू असताना वीज पुरवठा खंडित होणार नाही, यासाठी यूपीएस आणि जनरेटरची तपासणी करून ठेवावी. सायबर हल्ल्यांपासून वाचण्यासाठी सर्व महत्त्वाचे पासवर्ड बदलणे आणि सिस्टममध्ये अनाधिकृत प्रवेश होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

क्लोजिंग ही एक सांघिक प्रक्रिया (Team Effort) आहे. यामध्ये प्रत्येक स्तरावर जबाबदारी निश्चित केलेली असावी. संचालकांनी धोरणात्मक पाठबळ द्यावे, तर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व शाखांमध्ये समन्वय राखावा. कर्मचाऱ्यांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी त्यांना क्लोजिंग च्या दिवशी योग्य सोयी–सुविधा (उदा. भोजन, नाश्ता) उपलब्ध करून द्याव्यात. क्लोजिंग यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता (Incentive) दिल्यास त्यांचे मनोधैर्य उंचावते.१ एप्रिलच्या पहाटे जेव्हा कच्चा ताळेबंद तयार होतो, तेव्हा त्याचे गुणोत्तर विश्लेषण (Ratio Analysis) करणे आवश्यक आहे. सीडी रेशो (कर्ज–ठेव गुणोत्तर) ६५% ते ७०% च्या दरम्यान असणे आदर्श मानले जाते. कॅपिटल रिस्क वेटेज ॲसेट्स रेशो (CRAR) आणि नेट एनपीए टक्केवारी यावरून संस्थेचे आर्थिक आरोग्य स्पष्ट होते. हे रेशो जितके चांगले, तितका संस्थेचा ऑडिट वर्ग वरचा राहतो.सभासदांना वेळेवर व्यवहार वेळेबाबत आणि कर्ज परतफेडीबाबत एसएमएस किंवा व्हॉट्सॲपद्वारे सूचित करावे. यामुळे ३१ मार्चला होणारी गर्दी टाळता येते आणि वसुलीचे उद्दिष्ट साध्य होते. पारदर्शक संवादामुळे सभासदांचा संस्थेवरील विश्वास अधिक वृद्धिंगत होतो.शेवटी, १५ मार्चपासून ते ३१ मार्चच्या रात्रीपर्यंतच्या सर्व कामांची एक मास्टर चेकलिस्ट तयार ठेवावी. यामध्ये कागदपत्रांची पूर्तता, व्हाउचर्सची एन्ट्री, रोख मोजणी आणि सॉफ्टवेअर क्लोजिंग अशा सर्व बाबींचा समावेश असावा.सहकार्यानो, ३१ मार्चचे यशस्वी नियोजन हे केवळ आर्थिक वर्ष संपवणे नसून, ते पुढील वर्षाच्या प्रगतीचा भक्कम पाया रचणे आहे. ज्या पतसंस्थेचे हिशेब पारदर्शक आणि नियोजन सूक्ष्म असते, तिची प्रगती कोणालाही रोखता येत नाही. या मार्गदर्शकातील मुद्द्यांची काटेकोर अंमलबजावणी केल्यास ३१ मार्चचे क्लोजिंग तणावमुक्त आणि यशस्वीपणे पार पडेल, ज्यामुळे संस्थेची विश्वासार्हता आणि सभासदांचे हित दोन्ही जोपासले जातील.

(लेखक – प्रशिक्षक व मार्गदर्शक
मो. ९९२१३०४८११)

सहकारी गृहनिर्माण संस्था : निवडणूक, नेतृत्व आणि सदस्यांची जबाबदारी

''समाजात जागरूकता निर्माण करण्याच्या या प्रवासात जेथून ज्ञान आणि प्रेरणा मिळते, त्या प्रत्येक स्रोताचे मनापासून आभार.''

लेखाचा गाभा – एका नजरेत सहकारी गृहनिर्माण संस्थेत निवडणूक म्हणजे केवळ नावे निवडणे नव्हे – ती एक कायदेशीर प्रक्रिया आहे. पदाधिकारी विनावेतन, स्वेच्छेने पण कायदेशीर जबाबदारीने काम करतात. त्यांच्या योगदानाची दखल घेणे आणि सदस्यांनी आपली जबाबदारी ओळखणे – हेच सहकाराचे खरे बळ!

सुनिल शेलार

✻ सहकारी गृहनिर्माण संस्था – सहजीवनाचा सशक्त आधार

महाराष्ट्रातील झपाट्याने वाढणाऱ्या नगरीकरणाच्या लाटेत, सहकारी गृहनिर्माण संस्था ही केवळ निवासाची व्यवस्था नसून सामूहिक जीवनशैलीचे एक सुंदर उदाहरण आहे. एका छताखाली विविध प्रकृतीची, विविध पार्श्वभूमीची अनेक कुटुंबे एकत्र राहत असताना – त्यांचे हितसंबंध, सुरक्षितता, स्वच्छता, सुविधा आणि शिस्त या सर्व बाबींचे सुसंघटित व्यवस्थापन करण्यासाठी एक संघटित रचना अपरिहार्य असते. हीच रचना म्हणजे सहकारी गृहनिर्माण संस्था.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या तरतुदींनुसार सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी, कामकाज, निवडणूक, लेखापरीक्षण आणि विसर्जन या सर्व बाबी नियंत्रित केल्या जातात. याशिवाय महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण संस्था उपविधी (Model Bye-Laws) हे संस्थेच्या आंतरिक व्यवस्थापनाचे नियमन करतात.

सहकाराच्या तत्त्वावर उभी असलेली ही व्यवस्था सदस्यांना केवळ मालमत्तेचे संरक्षण देत नाही, तर सहजीवन, परस्पर सन्मान आणि सामूहिक निर्णय प्रक्रियेची संस्कृती देखील घडवते. महाराष्ट्राच्या सहकार चळवळीचा इतिहास पाहता, गृहनिर्माण संस्था ही ग्रामीण सहकारापासून नागरी जीवनात रुजलेल्या या चळवळीचे एक सशक्त प्रतीक आहे.

गृहनिर्माण संस्थेचे महत्त्व आणि सदस्यांना होणारे फायदे

सहकारी गृहनिर्माण संस्था ही सदस्यांच्या सामूहिक हितासाठी कार्य करते. संस्थेमुळे परिसरातील स्वच्छता, पाणीपुरवठा, सुरक्षा व्यवस्था, देखभाल, दुरुस्ती आणि विविध सुविधांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन करता येते.

याशिवाय संस्था सदस्यांना कायदेशीर संरक्षण आणि पारदर्शक आर्थिक व्यवस्थापनाची चौकट उपलब्ध करून देते. संस्थेचे व्यवस्थापन हे प्रत्येक सदस्यासाठी एक व्यासपीठ बनते. सदस्य हा एकटा नसून संस्था त्याच्या सोबत असल्याची जाणीव निर्माण होते. एखाद्या सदस्याला मालमत्तेसंबंधी कायदेशीर अडचण आली, बांधकाम दोष आढळला किंवा इतर कोणताही प्रश्न निर्माण झाला. तेव्हा संस्था त्याची सामूहिक ताकद म्हणून उभी राहते.

म्हणूनच गृहनिर्माण संस्था ही केवळ इमारतींचे व्यवस्थापन करणारी संस्था नसून एक सुसंस्कृत समुदाय घडवणारी सामाजिक व्यवस्था आहे.

✻ सर्वसाधारण सभा आणि व्यवस्थापन समिती – संस्थेचे दोन आधारस्तंभ

प्रत्येक सहकारी संस्थेचे दोन प्रमुख आधारस्तंभ असतात – सर्वसाधारण सभा आणि व्यवस्थापन समिती.

सर्वसाधारण सभा ही संस्थेची सर्वोच्च सत्ता मानली जाते. अधिनियमाच्या कलम ७५ नुसार प्रत्येक सहकारी संस्थेने दरवर्षी सर्वसाधारण सभा घेणे अनिवार्य आहे. आर्थिक धोरणे, वार्षिक लेखे मंजूर करणे, विकासकामे आणि भविष्यातील दिशा यांचे निर्णय इथे घेतले जातात.

या निर्णयांची अंमलबजावणी करण्याचे काम व्यवस्थापन समिती करते. कलम ७३ नुसार समितीची स्थापना होते. अध्यक्ष, सचिव, खजिनदार आणि इतर सदस्य संस्थेचे दैनंदिन कामकाज नियमांनुसार पार पाडतात.यामुळे संस्थेचे प्रशासन व्यवस्थित आणि शिस्तबद्ध पद्धतीने चालते.

✻ कायदेशीर तरतूद – कलम ७३ व ७५ कलम ७३ : व्यवस्थापन समितीची रचना, कार्यकाळ आणि अधिकार यांचे नियमन. कलम ७५ : दरवर्षी सर्वसाधारण सभा घेणे अनिवार्य; वार्षिक लेखे मंजूरीसाठी सादर करणे बंधनकारक. कलम ७९ : वार्षिक लेखापरीक्षण – संस्थेच्या आर्थिक व्यवस्थापनाची पारदर्शकता सुनिश्चित करते.

✻ व्यवस्थापन समितीची निवडणूक प्रक्रिया कायदेशीर चौकट

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या कलम ७३ब अन्वये सन २०१३ च्या दुरुस्तीनंतर सहकारी संस्थांच्या निवडणुका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण (State Co-operative Election Authority - SCEA) यांच्या देखरेखीखाली होणे अनिवार्य करण्यात आले. हा ऐतिहासिक बदल म्हणजे महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रात लोकशाही मूल्ये बळकट करण्यासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल होते.

व्यवस्थापन समितीचा **कार्यकाळ ५ वर्षे** असतो. मुदत संपण्यापूर्वी नवीन समितीची निवड करणे कायद्याने बंधनकारक आहे. वेळेत निवडणूक न झाल्यास संस्थेवर **प्रशासक नियुक्त** होण्याची शक्यता असते – जे सर्व सदस्यांसाठी अत्यंत अनिष्ट आहे.

निवडणूक प्रक्रियेचे टप्पे

क्र.	टप्पा	विशेष नोंद
१	सर्वसाधारण सभेत ठराव	मुदत संपण्याच्या किमान ६ महिने आधी
२	SCEA कडे कागदपत्रे सादर	ठराव व अनुषंगिक कागदपत्रे
३	निवडणूक अधिकारी नियुक्ती	SCEA द्वारे Election Officer नेमणूक
४	प्राथमिक मतदार यादी	सर्व नोंदणीकृत सदस्यांची यादी
५	हरकती व परीक्षण	सदस्यांच्या हरकतींचे निराकरण
६	अंतिम मतदार यादी	यानंतर बदल शक्य नाही
७	उमेदवारी व छाननी	पात्रता तपासणी अनिवार्य
८	मतदान व निकाल	गुप्त मतदान – Secret Ballot

✻ महत्त्वाचे – उमेदवारी पात्रता अटी संस्थेचा नोंदणीकृत सदस्य असणे अनिवार्य. कोणतीही थकबाकी नसावी थकबाकीदार सदस्याची उमेदवारी अपात्र ठरते. उपविधीतील इतर पात्रता अटी पूर्ण असाव्यात. एकाच वेळी दोन सहकारी संस्थांच्या समितीवर काम करता येत नाही.

आजची वास्तवता – एक चिंताजनक चित्र

महाराष्ट्रातील अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये आज एक गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. **निवडणुकीला उभे राहण्यास इच्छुक**

व्यक्ती पुढे येत नाहीत! याची कारणे अनेक आहेत :

- ✻ वाढती कायदेशीर जबाबदारी आणि त्याची भीती
- ✻ सदस्यांकडून होणाऱ्या अवाजवी अपेक्षा
- ✻ विनावेतन काम करूनही मिळणारी टीका आणि अपमान
- ✻ नोकरी / व्यवसाय सांभाळून समितीचे काम करण्याची व्यावहारिक अडचण
- ✻ **परिणाम :** प्रशासक नियुक्ती – जे संस्था आणि सदस्य दोघांसाठी हानिकारक!
- ✻ प्रत्यक्ष निवडणूक आणि बिनविरोध निवडणूक

गृहनिर्माण संस्थेमध्ये संचालक मंडळाची निवड दोन प्रकारे होऊ शकते – प्रत्यक्ष निवडणूक आणि बिनविरोध निवडणूक.

प्रत्यक्ष निवडणूक	बिनविरोध निवडणूक
उमेदवार जागांपेक्षा जास्त असतात	उमेदवार आणि जागा समान असतात
गुप्त मतपत्रिकेद्वारे मतदान	मतदान न होता निवड होते
लोकशाहीचा सर्वोच्च अधिकार	संस्थेत सौहार्द टिकून राहते
वेळ व खर्च अधिक लागतो	वेळ व खर्च दोन्ही वाचतात

बिनविरोध निवडणूक साध्य करण्यासाठी व्यावहारिक मार्ग

- ✻ **आधीपासून संवाद साधा :** निवडणुकीची तारीख जाहीर होण्यापूर्वीच सक्रिय सदस्यांशी अनौपचारिक चर्चा करा.
- ✻ **इच्छुक व्यक्तींना प्रोत्साहन द्या :** समितीत काम करणे हे सन्मानाचे आहे, असे वातावरण तयार करा.
- ✻ **जुन्या पदाधिकाऱ्यांनी मार्गदर्शन करावे :** नवीन व्यक्तींना जबाबदारी समजावून त्यांचा आत्मविश्वास वाढवा.
- ✻ **एकमताचे वातावरण तयार करा :** सभेपूर्वी सर्व सदस्यांशी संवाद साधून सहमती घडवा.

अध्यक्ष आणि सचिव – विनावेतन सेवा, पण कायदेशीर जबाबदारी

पदाधिकारी स्वेच्छेने निवडले जातात मग जबाबदारी का?

हा प्रश्न अनेक सदस्यांना पडतो आणि तो रास्तही आहे. त्याचे उत्तर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये स्पष्ट आहे. पदाधिकारी स्वेच्छेने निवडले जातात हे खरे. परंतु एकदा निवड झाली की कलम ७३(१अब) नुसार निष्काळजीपणा, गैरव्यवहार किंवा जाणीवपूर्वक केलेल्या चुकीसाठी वैयक्तिक दायित्व (Personal Liability) निश्चित होऊ शकते. ही केवळ सामाजिक जबाबदारी नाही ती कायदेशीर बांधिलकी आहे!

अध्यक्षाच्या जबाबदाऱ्या	सचिवाच्या जबाबदाऱ्या
सभांचे अध्यक्षस्थान	सर्व कागदपत्रांची देखभाल
धोरणांवर अंतिम निर्णय	सभा नोटिसा व इतिवृत्त
शासकीय पत्रव्यवहार स्वाक्षरी	वार्षिक लेखापरीक्षण (कलम ७९)
बँक व्यवहार – संयुक्त अधिकार	शासनाकडे अहवाल सादर
शासन / न्यायालयात प्रतिनिधित्व	सदस्य अर्ज / तक्रारी निपटारा
सदस्य तक्रार निराकरण	कर, बिले, परवाने भरणे
संस्था विकासाची दिशा ठरवणे	नोंदणी नूतनीकरण

✻ **एक महत्त्वाचा विचार** पदाधिकाऱ्यांकडे अवाजवी अपेक्षा ठेवणे किंवा प्रत्येक गोष्टीवर सार्वजनिक आरोप करणे यामुळे संस्थेच्या समितीत काम करण्यासाठी इच्छुक व्यक्ती पुढे येत नाहीत. शेवटी त्याचा फटका सर्व सदस्यांना बसतो. अनेक अनुभवी व्यक्ती या जबाबदारीला विनोदाने ''"Thankless Job"" म्हणतात. परंतु सहकाराची भावना आणि संस्थेच्या विकासाची इच्छा हीच त्यांची खरी प्रेरणा असते.

सहकार चळवळ टिकवणारे चार प्रकारचे सदस्य

सामाजिक किंवा सहकारी संघटना उभी राहत असताना प्रत्येक सदस्याचे योगदान वेगवेगळ्या स्वरूपात असते. संघटना वाढविण्यासाठी चार प्रकारची माणसे महत्त्वाची असतात –

१. **बुद्धिमान मार्गदर्शक –** ज्यांच्याकडे बुद्धी आहे, त्यांनी योग्य मार्गदर्शन करून माणसे जोडावीत.

२. **वेळ देणारे कार्यकर्ते –** ज्यांच्याकडे वेळ आहे, त्यांनी संघटनेच्या कामासाठी वेळ द्यावा.

३. **कष्टाळू सहकारी –** ज्यांच्याकडे कष्ट करण्याची तयारी आहे, त्यांनी प्रत्यक्ष कामात हातभार लावावा.

४. **सकारात्मक साथीदार –** ज्यांना सध्या योगदान शक्य नाही, त्यांनी किमान काम करणाऱ्यांबद्दल सकारात्मक राहावे.

सहकाराच्या प्रवासात अडचण पहिल्या तीन प्रकारांमुळे निर्माण होत नाही. ती बहुतेक वेळा त्या वृत्तीमुळे निर्माण होते जी स्वतः काही करत नाही, पण काम करणाऱ्यांचे मनोबल कमी करते.

सदस्यांचे कर्तव्य – कायद्याने काय सांगितले आहे?

सहकारी संस्थेचे यश केवळ व्यवस्थापन समितीवर अवलंबून नसते ते प्रत्येक सदस्याच्या जबाबदार वर्तनावर अवलंबून असते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम आणि उपविधींनुसार सदस्यांची कर्तव्ये –

- ✻ **संस्थेचे नियम पाळणे :** उपविधींचे उल्लंघन केल्यास संस्था कारवाई करू शकते.
- ✻ **वेळेत देयके भरणे :** थकबाकी असल्यास मतदानाचा अधिकार आणि उमेदवारी दोन्ही जातात.
- ✻ **सभांमध्ये सक्रिय सहभाग :** मतदान करणे हा अधिकार आणि जबाबदारी दोन्ही आहे.
- ✻ **परस्पर सहकार्याची भावना :** सहकार कायद्याचा आत्माच परस्पर सहयोगात आहे.
- ✻ **निवडणुकीत सहभाग :** योग्य उमेदवारांना प्रोत्साहन देणे आणि स्वतः पुढे येण्याची तयारी ठेवणे.

समारोप – स्वतःला विचारा हे तीन महत्त्वाचे प्रश्न

सहकारी गृहनिर्माण संस्था ही केवळ इमारतींची रचना नसून सहजीवनाचा एक सशक्त समुदाय आहे. संस्थेचे पदाधिकारी हे त्या समुदायाचे सेवक म्हणून काम करतात. सहकाराची खरी ताकद ही केवळ नियमांमध्ये नसते ती सदस्यांच्या परस्पर विश्वासात आणि सकारात्मक वृत्तीमध्ये असते.

कोणत्याही संस्थेमध्ये प्रश्न निर्माण होऊ शकतात, मतभेदही असू शकतात. परंतु त्यांचे निराकरण संवाद, नियम आणि सभ्यतेच्या चौकटीत करणे हीच सहकाराची खरी संस्कृती आहे.

प्रत्येक सदस्याने स्वतःला प्रामाणिकपणे विचारावे –

- ✻ मी संस्थेच्या कामासाठी किती वेळ दिला आहे?
- ✻ मी संस्थेच्या विकासासाठी काय योगदान दिले आहे?
- ✻ मी समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे की फक्त प्रश्न विचारले आहे?

या प्रश्नांची प्रामाणिक उत्तरेच सहकाराची खरी दिशा दाखवू शकतात. या चळवळीमध्ये काही लोक मार्गदर्शन करतात, काही लोक वेळ देतात, काही लोक कष्ट करतात आणि काही लोक केवळ सकारात्मक वातावरण निर्माण करूनही मोठे योगदान देतात.

''काम करणाऱ्यांचा सन्मान करा, सहकार्य करा,
संस्थेच्या प्रगतीमध्ये आपले योगदान द्या.''

(लेखक : सहकार व कृषि क्षेत्रातील अभ्यासक असून
म. स. वि. म. येथे प्रमुख, एन.बी.एफ.सी. म्हणून कार्यरत आहेत.)
मो. : ९४०४५७५५३७

सहकारी संस्थांचे उपविधीसमजून घेताना

डॉ. सोपान पार्वती बापू शिंदे

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १४(२) चे दुसरे परंतुकान्वये संस्था प्रकार वा संस्था वर्गानुसार आदर्श उपविधी तयार करण्याचे अधिकार सहकार आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना असून त्यांचे कार्यालयामार्फत राज्यातील सहकारी संस्थांचे प्रकार किंवा संस्था वर्ग विचारात घेवून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व त्याखालील नियम १९६१ यामधील वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणांच्या अनुरूप 'नमुना/आदर्श उपविधी' तयार करून अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहेत.सहकार आयुक्त आणि निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संकेतस्थळ https://sahakarayukta.maharashtra.gov.in/वरील 'डाउनलोडस'मधील 'आदर्श उपविधी (Model Byelaws)' सदराखाली एकूण ३३ प्रकारच्या सहकारी संस्थाकरीता 'नमुना/आदर्श उपविधी' प्रसिध्द करण्यात आले असून तेथून ते विनामूल्य डाउनलोड करता येतील.

आदर्श उपवधी – प्रमुख सहकारी संस्था प्रकार/संस्था वर्ग

अ.क्र.	सहकारी संस्थेचा प्रकार	क्युआर कोड
१	नागरी/ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था	
२	पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था	
३	प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था (विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था)	
४	आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था	
५	सहकारी गृहनिर्माण संस्था	
६	सहकारी गृहनिर्माण संस्था (इंग्रजी)	

अ.क्र.	सहकारी संस्थेचा प्रकार	क्युआर कोड
७	भाडेकरू मालकी हक्क गृह निर्माण संस्था (भूखंडधारक /प्लॉट धारक)	
८	प्लॉट टाईप सहकारी गृहनिर्माण संस्था	
९	नागरी सहकारी बँक	
१०	जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक	
११	कुकुटपालन (पोल्ट्री) संस्था	
१२	जिल्हा दूध संघ	

अ.क्र.	सहकारी संस्थेचा प्रकार	क्युआर कोड
१३	प्राथमिक सह. दुध संस्था	
१४	तालुका सहकारी दूध उपादक संघ	
१५	जिल्हा मच्छिमार संघ	
१६	जिल्हा सह. बोर्ड	
१७	विभागीय सहकारी मंडळ	
१८	खरेदी विक्री संघ	
१९	पाणी पुरवठा संस्था	
२०	पाणी वापर संस्था	

अ.क्र.	सहकारी संस्थेचा प्रकार	क्युआर कोड
२१	सर्वसाधारण सहकारी संस्था	
२२	ग्राहकसंस्था	
२३	फळे व भाजीपाला सहकारी संस्था	
२४	सहकारी सूत गिरणी	
२५	यंत्रमाग संस्था	
२६	हातमाग संस्था	
२७	मजूर संस्था	
२८	औद्योगिक उत्पादकांच्या संस्था	

अ.क्र.	सहकारी संस्थेचा प्रकार	क्युआर कोड
२९	जिल्हा मजूर संघ	
३०	सामूहिक शेती संस्था	
३१	संयुक्त शेती संस्था	
३२	वाहतुक सहकारी संस्था	

अ.क्र.	सहकारी संस्थेचा प्रकार	क्युआर कोड
३३	मत्स्य व्यावसायिकांची सहकारी संस्था	
३४	कृषी प्रक्रीया	
३५	हस्तकला वस्तु उत्पादन सहकारी संस्था	

(लेखक – जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, रत्नागिरी
संपर्क – ७९७२३१७१९४
ईमेल – sopanshinde@gmail.com,
sopan.shinde@mah.gov.in)

थकबाकी भरल्याशिवाय सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य होवू शकत नाही

फ्लॅट खरेदीदार आणि व्यावसायिक सदनिका खरेदीदार त्यांच्या जागेशी संबंधित थकबाकी भरल्याशिवाय ते ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थेत आहेत त्या सहकारी गृहनिर्माण संस्थेचे सदस्य होऊ शकत नाहीत, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला.

*''सहकारी संस्थेत सदस्यत्व हा बिनशर्त अधिकार नाही,'' असे न्यायमूर्ती अमित बोरकर यांनी विभागीय सहनिबंधक आणि सहकारी संस्थांचे उपनिबंधक, आर/एन वॉर्ड यांनी दिलेले आदेश रद्दबातल ठरवताना म्हटले आहे, ज्यात दहिसरमधील एका सहकारी संस्थेला व्यावसायिक सदनिका खरेदीदाराला सदस्य म्हणून स्वीकारण्यास भाग पाडले होते, जरी खरेदीदाराने मागील मालकाची ५८ लाखांची थकबाकी भरली नव्हती.

हा खटला एप्रिल २०२१ चा आहे जेव्हा टी अँड एम सर्व्हिसेस कन्सल्टिंग प्रायव्हेट लिमिटेडने इंडियन ओव्हरसीज बँकेने आयोजित केलेल्या लिलावात दहिसरमधील तन्वीच्या डायमोडा सहकारी गृहनिर्माण संस्थेत एक व्यावसायिक सदनिका खरेदी केली होती. जून २०२१ मध्ये, फर्मने सोसायटीकडे सदनिकेचे सदस्यत्व त्यांच्या नावे हस्तांतरित करण्यासाठी अर्ज केला.

तथापि, सोसायटीने फर्मला सदस्य म्हणून स्वीकारण्यास नकार दिला, कारण जागेचे पूर्वीचे मालक सरोज मेहता यांनी देखभाल शुल्क आणि मालमत्ता कर यासह ₹५८ लाखांची थकबाकी भरली नाही. टी अँड एम सर्व्हिसेस कन्सल्टिंगला ₹५८ लाख भरल्यानंतरच गृहनिर्माण सोसायटीमध्ये सदस्यत्व दिले जाईल, असे सोसायटीने फर्मला कळवले.

त्यानंतर टी अँड एम सर्व्हिसेस कन्सल्टिंगने सहकारी संस्थांच्या उपनिबंधकांशी संपर्क साधला, ज्यांनी जुलै २०२२ मध्ये फर्मचे अपील मान्य केले, ज्यामुळे सोसायटीने विभागीय सह निबंधकांकडे संपर्क साधला. १४ जुलै २०२५ रोजी विभागीय सह निबंधकांनी सोसायटीची याचिका फेटाळून लावली, ज्यामुळे त्यांना उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली.

न्यायालयाने निबंधकांनी दिलेले आदेश रद्दबातल ठरवत म्हटले की, महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्याच्या कलम १५४ ब (७) अंतर्गत, सदनिकेशी संबंधित थकबाकी भरल्याशिवाय कोणतेही हस्तांतरण प्रभावी होत नाही.

''हा नियम सर्व हस्तांतरणांना लागू होतो, मग ते स्वेच्छेने असो किंवा लिलावाद्वारे असो,'' न्यायमूर्ती बोरकर म्हणाले. ''जेव्हा देय रक्कम निर्विवाद किंवा निर्विवाद असेल, तेव्हा हस्तांतरणकर्त्याने ही अट पूर्ण केली पाहिजे.''

कलम १५४ब (७) लागू करण्यामागील हेतू असा होता की सदस्याने थकबाकी मागे सोडल्यामुळे गृहनिर्माण संस्थांना आर्थिक नुकसान सहन करावे लागू नये.

''जर देणी मंजूर न करता हस्तांतरण स्वीकारण्यास सोसायट्यांना भाग पाडले गेले, तर ते सामान्य खर्च वसूल करू शकणार नाहीत. याचा परिणाम सर्व विद्यमान सदस्यांवर होईल. म्हणूनच ही तरतूद सोसायटीच्या आर्थिक स्थिरतेचे रक्षण करते,'' असे न्यायालयाने म्हटले आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था देखभाल शुल्क वेळेवर वसूल करून टिकून राहते आणि जेव्हा वर्षानुवर्षे थकबाकी न भरता राहते, तेव्हा सोसायटी आणि तिच्या सदस्यांना त्रास होतो.

''अशा परिस्थितीत कायदा सोसायटीचे संरक्षण करतो. कलम १५४ब (७) हे सुनिश्चित करते की थकबाकी मागे सोडणाऱ्या हस्तांतरणांमुळे सोसायटीची आर्थिक रचना बिघडत नाही. जेव्हा पूर्वीचा सदस्य थकबाकी चुकवतो तेव्हा देणी देण्याची जबाबदारी हस्तांतरणकर्त्यावर टाकते,'' असे न्यायालयाने म्हटले आहे.

सेंद्रिय शेती व उत्पादन विपणनासाठी शासकीय-संस्थात्मक डिजिटल यंत्रणा

डॉ. सुनील कुमार

प्रस्तावना

भारत हा परंपरेने कृषिप्रधान देश असून येथे सेंद्रिय शेतीची संकल्पना प्राचीन काळापासून अस्तित्वात आहे. मात्र, गेल्या काही दशकांत रासायनिक खते, कीटकनाशके आणि संकरित तंत्रज्ञानावर वाढलेल्या अवलंबित्वामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पादनांबरोबरच पर्यावरणीय प्रदूषण, मातीची सुपीकता कमी होणे आणि मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम या गंभीर समस्या निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर सेंद्रिय शेतीकडे पुन्हा एकदा व्यापक प्रमाणावर लक्ष वेधले जात आहे. सेंद्रिय शेती ही केवळ पर्यावरणपूरक शेतीपद्धती नसून, ती शाश्वत विकास, मानवी आरोग्य आणि नैसर्गिक संसाधनांच्या संवर्धनाशी निगडित असलेली एक समग्र विचारधारा आहे.तथापि, केवळ सेंद्रिय पद्धतीने पीक उत्पादन किंवा पशुपालन करणे हे पुरेसे ठरत नाही. सेंद्रिय उत्पादनांना योग्य बाजारपेठ मिळणे, त्यांना योग्य व हमीभाव प्राप्त होणे, गुणवत्ता व प्रमाणिकतेबाबत ग्राहकांचा विश्वास निर्माण होणे तसेच ही उत्पादने सुरक्षित आणि कार्यक्षम पद्धतीने ग्राहकांपर्यंत पोहोचवणे ही खरी आव्हाने आहेत. पारंपरिक बाजारपेठेत सेंद्रिय उत्पादनांची ओळख, गुणवत्तेची खात्री आणि विश्वासार्हता या बाबी मर्यादित होत्या, ज्यामुळे अनेक सेंद्रिय उत्पादकांना अपेक्षित लाभ मिळत नव्हता.या अडचणींवर मात करण्यासाठी भारत सरकार तसेच विविध शासकीय व निमशासकीय संस्थांनी सेंद्रिय उत्पादनांच्या विपणनासाठी अनेक डिजिटल पोर्टल्स विकसित केली आहेत. ही पोर्टल्स सेंद्रिय उत्पादनांची अधिकृत नोंदणी, प्रमाणन, गुणवत्ता नियंत्रण, बाजारपेठेशी थेट जोडणी, लॉजिस्टिक्स व्यवस्थापन आणि अगदी निर्यातीपर्यंतच्या सर्व प्रक्रियांना एकत्रित स्वरूप देतात. यामुळे शेतकरी, व्यापारी, प्रक्रिया उद्योग आणि ग्राहक यांच्यात थेट व पारदर्शक संवाद साधला जातो आणि संपूर्ण सेंद्रिय मूल्यसाखळी अधिक मजबूत होते.सेंद्रिय शेतीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चात बचत होऊन अधिक नफा मिळण्याची संधी निर्माण होते, तर ग्राहकांना सुरक्षित, पोषणमूल्यांनी समृद्ध आणि आरोग्यदायी अन्न उपलब्ध होते. तसेच, पर्यावरण संरक्षण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणाला देखील चालना मिळते. या दृष्टीने सेंद्रिय उत्पादनांच्या विपणनासाठी विकसित करण्यात आलेली डिजिटल पोर्टल्स ही एक प्रभावी व विश्वासार्ह माध्यमे ठरत आहेत.जागतिक सेंद्रिय बाजारपेठेत भारताचा सहभाग वाढवणे, देशांतर्गत बाजारात प्रमाणित सेंद्रिय उत्पादने पोहोचवणे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला मिळवून देणे यामध्ये या पोर्टल्सचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

I. जैविक खेती पोर्टल : सेंद्रिय उत्पादनांच्या विपणनासाठी एक आधुनिक डिजिटल दुवा

भारतामध्ये सेंद्रिय शेतीचे क्षेत्र झपाट्याने विस्तारत असताना, सेंद्रिय उत्पादकांसमोर त्यांच्या उत्पादनांना योग्य किंमत, खात्रीशीर बाजारपेठ आणि विश्वासार्ह ग्राहक मिळवणे ही मोठी गरज निर्माण झाली आहे. या गरजेला प्रतिसाद देण्यासाठी कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय (MoA&FW) आणि कृषि व प्रक्रिया केलेले अन्न उत्पाद निर्यात विकास प्राधिकरण (APEDA) यांच्या संयुक्त पुढाकारातूनमजैविक खेती पोर्टल' (https://www.jaivikkheti.in/) हे राष्ट्रीय स्तरावरील डिजिटल व्यासपीठ सुरू करण्यात आले आहे. हे पोर्टल सेंद्रिय शेतीशी संबंधित सर्व घटकांनाशेतकरी, शेतकरी उत्पादक संघटना (FPOs), व्यापारी, किरकोळ विक्रेते आणि ग्राहक-एका सामायिक डिजिटल चौकटीत जोडण्याचे कार्य करते.

पोर्टलचा उद्देश

जैविक खेती पोर्टल'चा मुख्य हेतू सेंद्रिय उत्पादनांच्या विक्री, प्रमाणन, प्रक्रिया आणि सल्ला सेवा यांचे एकत्रीकरण करून एक सक्षम, पारदर्शक आणि कार्यक्षम मूल्यसाखळी उभारणे हा आहे. या माध्यमातून शेतकऱ्यांना थेट बाजारपेठेपर्यंत पोहोच मिळते, तर ग्राहकांना प्रमाणित व विश्वासार्ह सेंद्रिय उत्पादने सहजपणे उपलब्ध होतात.

प्रमुख वैशिष्ट्ये व उपयुक्तता

१. डिजिटल ई-मार्केटप्लेस – थेट व्यवहाराचा मार्ग

या पोर्टलच्या माध्यमातून सेंद्रिय शेतकरी व FPOs धान्य, कडधान्ये, फळे, भाजीपाला, मसाले, तेलबिया आदी विविध सेंद्रिय उत्पादने थेट विक्रीसाठी नोंदवू शकतात. मध्यस्थांची गरज कमी झाल्याने शेतकऱ्यांना अधिक न्याय्य दर मिळतो आणि व्यवहार अधिक पारदर्शक बनतो.

२. प्रमाणन प्रक्रियेसाठी मार्गदर्शन

सेंद्रिय उत्पादनांची विश्वासार्हता टिकवण्यासाठी प्रमाणन अत्यंत महत्त्वाचे आहे. पोर्टलवर PGS आणि NPOP या राष्ट्रीय स्तरावरील प्रमाणन प्रणालींबाबत सविस्तर माहिती, प्रक्रिया आणि मार्गदर्शन उपलब्ध करून दिले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रमाणन प्रक्रिया समजून घेणे आणि ती पूर्ण करणे अधिक सोपे होते.

३. सेंद्रिय इनपुट्ससाठी एकाच ठिकाणी माहिती

सेंद्रिय शेतीसाठी आवश्यक असलेली जैव खते, कंपोस्ट, सेंद्रिय कीटकनाशके तसेच प्रमाणित बियाण्यांचे पुरवठादार या पोर्टलवर सूचीबद्ध आहेत. यामुळे शेतकऱ्यांना योग्य व विश्वासार्ह इनपुट्स सहजपणे उपलब्ध होतात.

४. तांत्रिक ज्ञान व क्षमताविकास

मजैविक खेती पोर्टल' हे केवळ विपणनाचे साधन नसून ज्ञान-वाटपाचे व्यासपीठही आहे. प्रशिक्षण साहित्य, मार्गदर्शक पुस्तिका, व्हिडिओ, तसेच सेंद्रिय शेतीशी संबंधित नियम व धोरणांची माहिती येथे उपलब्ध आहे. यामुळे नवोदित तसेच अनुभवी शेतकरी दोघांनाही तांत्रिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होते.

५. ग्राहकांशी थेट जोड आणि विश्वासनिर्मिती

या पोर्टलद्वारे ग्राहक थेट शेतकऱ्यांकडून सेंद्रिय उत्पादने खरेदी करू शकतात. उत्पादनाच्या उगमापासून विक्रीपर्यंतची माहिती उपलब्ध असल्याने ट्रेसेबिलिटी सुनिश्चित होते, व्यवहारांमध्ये पारदर्शकता वाढते आणि सेंद्रिय उत्पादनांवरील ग्राहकांचा विश्वास अधिक दृढ होतो.

II. ई-नॅम (e-NAM - National Agriculture Market)

भारतातील कृषी विपणन व्यवस्थेत तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून शेतकऱ्यांना पारदर्शक दर, विस्तृत बाजारपेठ आणि थेट खरेदीदारांपर्यंत पोहोच मिळवून देण्यासाठीई-नॅम (e-NAM)हा महत्त्वाचा राष्ट्रीय उपक्रम राबविण्यात आला आहे. कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांच्या माध्यमातून सुरू झालेल्या या प्लॅटफॉर्मचा उद्देश

देशभरातील कृषी उत्पन्न बाजार समित्या (APMCs) एका डिजिटल व्यासपीठावर जोडणे हा आहे.

वेबसाइट : www.enam.gov.in

उद्दिष्ट

ई-नॅमचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे विविध APMC चे एकत्रीकरण करून कृषी व्यापारात पारदर्शकता वाढवणे, शेतकऱ्यांना स्पर्धात्मक व योग्य दर मिळवून देणे आणि राज्यांच्या सीमांपलीकडील व्यापार सुलभ करणे. यामुळे शेतकऱ्यांना अधिक पर्याय, जलद व्यवहार आणि विस्तृत बाजारपेठ उपलब्ध होते.

प्रमुख वैशिष्ट्ये व फायदे

१. **राष्ट्रीय स्तरावरील बाजारपेठ :** देशातील १,००० हून अधिक APMC ई-नॅमशी जोडल्या गेल्या असून 'एक देश, एक बाजार' ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत आहे.

२. **ऑनलाइन विक्री सुविधा :** शेतकरी मंडीत प्रत्यक्ष जाण्याऐवजी ऑनलाइन पद्धतीने व्यवहार करू शकतात, त्यामुळे वेळ, खर्च व श्रमांची बचत होते.

३. **सेंद्रिय उत्पादनांसाठी स्वतंत्र ओळख :** काही राज्यांमध्ये ई-नॅमवर सेंद्रिय उत्पादनांसाठी स्वतंत्र श्रेणी उपलब्ध करून देण्यात आली आहे, ज्यामुळे सेंद्रिय शेतकऱ्यांना विशेष बाजारपेठ मिळते.

४. **थेट दर माहिती व पारदर्शकता :** विविध मंड्यांतील चालू दर पाहण्याची सुविधा असल्याने शेतकरी योग्य बाजार निवडू शकतात आणि दलालांवरील अवलंबित्व कमी होते.

५. **स्पर्धात्मक खुला बाजार :** ऑनलाइन बोली प्रक्रियेमुळे सेंद्रिय व पारंपरिक उत्पादनांना स्पर्धात्मक दर मिळतात.

६. **सीमापार व्यापार सुलभता :** राज्यांच्या पलीकडेही व्यवहार शक्य झाल्याने शेतकऱ्यांची बाजारपेठ लक्षणीयरीत्या विस्तारली आहे.

III. एपीडा ऑर्गेनिक पोर्टल : सेंद्रिय उत्पादनांच्या प्रमाणन व निर्यातीसाठी राष्ट्रीय डिजिटल पायाभूत व्यवस्था

भारतातील सेंद्रिय उत्पादनांची गुणवत्ता, प्रमाणन आणि जागतिक बाजारपेठेतील निर्यात प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक व विश्वासार्ह करण्यासाठी एपीडा (APEDA)ने एपीडा ऑर्गेनिक पोर्टल''विकसित केले आहे. हे पोर्टल वाणिज्य व उद्योग मंत्रालय, भारत सरकार यांच्या अंतर्गत कार्यरत असूनराष्ट्रीय सेंद्रिय उत्पादन कार्यक्रम (NPOP)अंतर्गत प्रमाणन, मान्यता आणि निर्यात यांचे एकात्मिक व्यवस्थापन करते.

वेबसाइट:https://apeda.gov.in/apedawebsite/organic

उद्दिष्ट

या पोर्टलचे मुख्य उद्दिष्ट भारतीय सेंद्रिय उत्पादनांना जागतिक दर्जा प्राप्त करून देणे तसेच प्रमाणन ते निर्यात या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता, ट्रेसेबिलिटी आणि विश्वास निर्माण करणे हे आहे. सेंद्रिय उत्पादक, प्रमाणन संस्था आणि निर्यातदार यांना एका डिजिटल व्यासपीठावर जोडून संपूर्ण सेंद्रिय मूल्यसाखळी सुलभ केली जाते.

प्रमुख वैशिष्ट्ये व फायदे

१. **डिजिटल प्रमाणन व्यवस्थापन :** सर्व प्रमाणन संस्था, ऑपरेटर्स आणि निर्यातदारांची नोंदणी व मान्यता प्रक्रिया ऑनलाइन केली जाते. आवश्यक दस्तऐवज, मार्गदर्शक सूचना आणि मानके एका ठिकाणी उपलब्ध असल्याने प्रमाणन प्रक्रिया सुलभ व विश्वासार्ह होते.

२. **TraceNet प्रणालीद्वारे ट्रेसेबिलिटी :** एपीडाची TraceNet प्रणाली उत्पादनाच्या शेतापासून निर्यातीपर्यंत प्रत्येक टप्प्याचे डिजिटल ट्रॅकिंग करते. त्यामुळे उत्पादनाचा उगम, प्रमाणन स्थिती आणि निर्यात तपशील पूर्णपणे उपलब्ध राहतात.

३. **जागतिक बाजार व व्यापार संधी :** आंतरराष्ट्रीय बाजारपेठा, व्यापार प्रदर्शनं, खरेदीदारांची माहिती आणि निर्यात संधी यांचा नियमित अद्ययावत डेटा पोर्टलवर दिला जातो, ज्यामुळे निर्यातदारांना जागतिक बाजारात प्रवेश सुलभ होतो.

४. **धोरणे व आंतरराष्ट्रीय मानके :** NPOP, EU Regulation आणि USDA-NOP यांसारख्या आंतरराष्ट्रीय प्रमाणन मानकांची माहिती उपलब्ध असल्याने निर्यातदारांना जागतिक निकषांचे पालन करणे सोपे जाते.

५. **जागतिक दर्जाची सेंद्रिय उत्पादने :** पोर्टलवर नोंदणीकृत उत्पादने प्रमाणित, ट्रेस करण्यायोग्य आणि आंतरराष्ट्रीय मानकांनुसार असल्यामुळे परदेशी खरेदीदारांचा विश्वास वाढतो.

६. **भारताची सेंद्रिय निर्यात क्षमता बळकट :** एपीडाच्या उपक्रमांमुळे सेंद्रिय कापूस, तांदूळ, मसाले, फळे व प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ यांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ झाली असून भारताची ओळख एक महत्त्वपूर्णङ्गसेंद्रिय निर्यात देश''म्हणून निर्माण झाली आहे.

IV. PGS-इंडिया पोर्टल : शेतकरी-आधारित सेंद्रिय प्रमाणनाची सुलभ आणि विश्वासार्ह प्रणाली

भारतामध्ये सेंद्रिय शेतीचा प्रसार करताना लघु व मध्यम शेतकऱ्यांना प्रमाणन प्रक्रियेपासून दूर ठेवले जाऊ नये, या उद्देशाने कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय सेंद्रिय शेती केंद्र (NCOF), गाजियाबाद यांनी PGS-India Portal (Participatory Guarantee System) विकसित केले आहे. हे पोर्टल शेतकऱ्यांद्वारे आणि शेतकऱ्यांसाठी चालविली जाणारी, समुदाय-आधारित सेंद्रिय प्रमाणन व्यवस्था साकार करते.

वेबसाइट:<https://pgsindia-ncof.gov.in/>

उद्दिष्ट

PGS-इंडिया पोर्टलचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे लघु व मध्यम शेतकऱ्यांना कमी खर्चात, सोपी आणि विश्वासार्ह सेंद्रिय प्रमाणन प्रणाली उपलब्ध करून देणे. स्वयं-अभिप्राय (peer review) तत्त्वावर आधारित या व्यवस्थेमुळे शेतकरी समूह परस्परांच्या शेतांची तपासणी करून गुणवत्ता सुनिश्चित करतात, ज्यातून पारदर्शक, समुदाय-केंद्रित आणि शाश्वत प्रमाणन प्रणाली विकसित होते.

प्रमुख वैशिष्ट्ये व फायदे

१. **ऑनलाइन नोंदणी व प्रमाणन :** शेतकरी आपली शेतमाहिती, उत्पादन तपशील आणि प्रमाणन अर्ज पूर्णतः ऑनलाइन सादर करू शकतात. त्यामुळे प्रक्रिया कागदविरहित, जलद आणि पारदर्शक बनते.

२. **समूह-आधारित प्रमाणन पद्धत :** PGS गटांमार्फत शेतकऱ्यांकडूनच शेततपासणी केली जाते. सामूहिक जबाबदारी व स्थानिक स्तरावरील गुणवत्ता नियंत्रणामुळे ही प्रणाली विशेषतः लघु शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरते.

३. **कमी खर्च व सुलभता :** महागड्या तृतीय-पक्षीय प्रमाणनाच्या तुलनेत PGS ही किफायतशीर प्रणाली असून, ग्रामीण शेतकऱ्यांना सेंद्रिय प्रमाणन सहज शक्य होते.

४. **जैविक खेती पोर्टलशी एकात्मता :** PGS-इंडिया अंतर्गत प्रमाणित शेतकऱ्यांची माहिती स्वयंचलितपणे जैविक खेती पोर्टलशी जोडली जाते, ज्यामुळे राष्ट्रीय ई-मार्केट प्लेसवर थेट विक्रीची संधी मिळते.

५. **पारदर्शक डेटाबेस :** नोंदणीकृत शेतकरी, गट आणि त्यांच्या उत्पादनांची माहिती सार्वजनिक स्वरूपात उपलब्ध असल्याने खरेदीदारांचा विश्वास वाढतो.

६. **स्थानिक व देशांतर्गत बाजारपेठेसाठी उपयुक्त :** PGS प्रमाणन प्रामुख्याने स्थानिक बाजार, शेतकरी बाजार, सेंद्रिय मेळे आणि फूड को-ऑप्ससाठी उपयुक्त असून देशांतर्गत सेंद्रिय व्यापाराला बळकटी देते.

खाजगी ई-कॉमर्स पोर्टल्स

1. Organic India

Organic India हे भारतातील सर्वात विश्वासार्ह सेंद्रिय ब्रँडपैकी एक आहे. हे पोर्टल सेंद्रिय चहा, औषधी वनस्पती, अन्नपूरक (supplements), मसाले आणि किराणा पदार्थांची थेट ऑनलाइन विक्री करते. कंपनी शेतकरी-केंद्रित मॉडेलवर काम करते आणि हजारो शेतकऱ्यांना सेंद्रिय शेतीसाठी प्रोत्साहन देते. प्रमाणित सेंद्रिय उत्पादन, ट्रेसेबिलिटी, आयुर्वेदिक तत्त्वज्ञान आणि जागतिक बाजारपेठेत मजबूत उपस्थिती ही Organic India ची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय ग्राहकांसाठी हे एक प्रभावी D2C (Direct-to-Consumer) ई-कॉमर्स मॉडेल ठरते.

2. 24 Mantra Organic

24 Mantra Organic हे पूर्णतः सेंद्रिय अन्नधान्य, कडधान्ये, मसाले, तेलबिया आणि प्रक्रिया केलेली उत्पादने पुरवणारे अग्रगण्य खाजगी ई-कॉमर्स पोर्टल आहे. हे पोर्टल NPOP आणि USDA प्रमाणन असलेली उत्पादने विकते. शेतकऱ्यांशी थेट करार शेतीद्वारे उत्पादन घेऊन गुणवत्ता आणि स्थिर पुरवठा सुनिश्चित केला जातो. 24 Mantra Organic भारतासह अमेरिका, युरोप आणि मध्यपूर्वेतही सक्रिय आहे. शुद्धता, ब्रँड विश्वास आणि निर्यातक्षम सेंद्रिय उत्पादने ही या पोर्टलची प्रमुख ताकद आहे.

3. Natureland Organics

Natureland Organics हे राजस्थान-आधारित सेंद्रिय ई-कॉमर्स ब्रँड असून, सेंद्रिय धान्य, डाळी, पीठ, मसाले आणि रेडी-टू-कूक उत्पादने उपलब्ध करून देते. हे पोर्टल शेतकरी गटांसोबत थेट काम करते आणि आंतरराष्ट्रीय मानकांनुसार प्रमाणित उत्पादने विकते. ग्राहकांना घरपोच सेवा, पारदर्शक लेबलिंग आणि गुणवत्तेची हमी दिली जाते. देशांतर्गत किरकोळ बाजारपेठेबरोबरच निर्यात बाजारासाठीही Natureland Organics महत्त्वाची भूमिका बजावते.

4. Farm2Kitchen

Farm2Kitchen हे ''शेतातून थेट स्वयंपाकघरापर्यंत'' (farm-to-home) या संकल्पनेवर आधारित सेंद्रिय ई-कॉमर्स पोर्टल आहे. येथे सेंद्रिय अन्नधान्य, मसाले, तेल, मध आणि प्रक्रिया केलेली उत्पादने उपलब्ध असतात. हे पोर्टल शेतकरी आणि ग्राहक यांच्यातील अंतर कमी करते व मध्यस्थांची भूमिका मर्यादित ठेवते. ट्रेसेबिलिटी, पारदर्शक दर आणि थेट शेतकरी लाभ हे Farm2Kitchen चे प्रमुख फायदे आहेत. शहरी ग्राहकांसाठी हे एक विश्वासार्ह सेंद्रिय खरेदी व्यासपीठ आहे.

5. Conscious Food

Conscious Food हे प्रीमियम सेंद्रिय आणि नैसर्गिक अन्नपदार्थांचे ई-कॉमर्स पोर्टल आहे. हे पोर्टल लघु शेतकरी, महिला गट आणि शाश्वत शेती करणाऱ्या समुदायांशी थेट जोडलेले आहे. येथे सेंद्रिय धान्य, सुपरफूड्स, मसाले आणि हेल्थ फूड्स उपलब्ध असतात. उत्पादनांच्या मागील शेतकरी कथा, पारदर्शक पुरवठा साखळी आणि नैतिक व्यापार (ethical trade) ही Conscious Food ची वैशिष्ट्ये आहेत. उच्च मूल्य असलेल्या सेंद्रिय उत्पादनांसाठी हे पोर्टल ओळखले जाते.

6. BigBasket - Organic Store

BigBasket हे जरी बहुविध ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म असले तरी त्याचा ""Organic Store" विभाग सेंद्रिय उत्पादनांच्या विपणनासाठी महत्त्वाचा आहे. येथे प्रमाणित सेंद्रिय फळे, भाजीपाला, धान्य, डाळी आणि मसाले उपलब्ध असतात. मोठ्या ग्राहकवर्गापर्यंत सेंद्रिय उत्पादने पोहोचवण्याचे काम BigBasket करते. मजबूत लॉजिस्टिक्स, जलद वितरण आणि ब्रँड विश्वासामुळे सेंद्रिय उत्पादकांसाठी हे एक प्रभावी खाजगी विपणन माध्यम ठरते.

7. Amazon India - Organic Category

Amazon India वरील Organic Category ही सेंद्रिय उत्पादनांसाठी एक मोठी खाजगी डिजिटल बाजारपेठ आहे. अनेक सेंद्रिय ब्रँड, स्टार्ट-अप्स आणि FPOs येथे आपली उत्पादने विकतात. प्रमाणित सेंद्रिय लेबल, ग्राहक पुनरावलोकने (reviews) आणि विस्तृत बाजारपेठ यामुळे विक्रेत्यांना मोठा फायदा होतो. आरेप चे मजबूत वितरण जाळे आणि डिजिटल पेमेंट प्रणाली सेंद्रिय उत्पादनांच्या विपणनाला गती देते, विशेषतः शहरी आणि अर्धशहरी बाजारात.

8. Flipkart - Organic & Natural Products

Flipkart या प्रमुख ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मवर सेंद्रिय व नैसर्गिक उत्पादनांसाठी स्वतंत्र विभाग उपलब्ध आहे. येथे सेंद्रिय अन्नधान्य, मसाले, हेल्थ फूड्स आणि आयुर्वेदिक उत्पादने विकली जातात. मोठ्या ग्राहकवर्गामुळे सेंद्रिय ब्रँड्सना बाजार विस्ताराची संधी मिळते. सवलती, डिजिटल मार्केटिंग आणि लॉजिस्टिक्स सपोर्टमुळे Flipkart सेंद्रिय उत्पादनांच्या खाजगी विपणनात महत्त्वाची भूमिका बजावतो.

9. Akshayakalpa Organic

Akshayakalpa Organic हे प्रामुख्याने सेंद्रिय दुग्धजन्य उत्पादने (दूध, दही, तूप) यांसाठी ओळखले जाणारे ई-कॉमर्स ब्रँड आहे. हे पोर्टल शेतकरी-आधारित दुग्ध सहकारी मॉडेलवर काम करते आणि पूर्ण ट्रेसेबिलिटी सुनिश्चित करते. थेट घरपोच सेवा, गुणवत्तेची खात्री आणि शाश्वत पशुपालन यामुळे Akshayakalpaho शहरी सेंद्रिय ग्राहकांमध्ये लोकप्रिय आहे.

10. Vedaka / Tata Sampann Organic (D2C & E-Commerce)

Vedaka (Amazon Brand) आणि Tata Sampann Organic हे खाजगी क्षेत्रातील सेंद्रिय उत्पादनांचे मजबूत ब्रँड आहेत. हे ब्रँड सेंद्रिय धान्य, डाळी, मसाले आणि प्रक्रिया केलेली उत्पादने ऑनलाइन विकतात. मोठ्या कॉर्पोरेट पाठबळामुळे गुणवत्ता नियंत्रण, प्रमाणन आणि बाजार प्रवेश सुलभ होतो. अशा ब्रँड-आधारित ई-कॉमर्स पोर्टल्समुळे सेंद्रिय उत्पादनांना मुख्य प्रवाहातील ग्राहकांपर्यंत पोहोचण्यास मदत होते.

11. I Say Organic ({Xëbr NCR)

वेबसाइट:<https://www.isayorganic.com/>

"I Say Organic" हे दिल्ली NCR क्षेत्रात कार्यरत एक प्रतिष्ठित सेंद्रिय ब्रँड आहे. कंपनी प्रमाणित शेतकऱ्यांकडून थेट सेंद्रिय उत्पादनांची खरेदी करते आणि त्याची ऑनलाइन विक्री व होम डिलिव्हरी सेवा पुरवते. यामध्ये फळे, भाज्या, धान्य, मसाले, तेल आणि स्नॅक्सचा समावेश आहे. हे पोर्टल ग्राहकांना रसायनमुक्त, आरोग्यदायी अन्न देत शेतकऱ्यांना स्थिर बाजारपेठ उपलब्ध करून देते.

१२. सहज आहारम प्रोड्यूसर कंपनी (SAPCO)

वेबसाइट : <https://www.sahajaaharam.in/>

तेलंगणातील सहज आहारम प्रोड्यूसर कंपनी (SAPCO) ही २० पेक्षा अधिक सेंद्रिय FPOs ची महासंघटना आहे. ती सेंद्रिय धान्य, तेलबिया, फळे व भाज्यांची विक्री करते. कंपनी शहरी भागात ''सहज आहारम'' सेंद्रिय स्टोअर्स चालवते व घरपोच सेवा पुरवते. हा मॉडेल

शेतकऱ्यांना सेंद्रिय उत्पादनांसाठी स्थिर बाजार देतो आणि ग्राहकांना स्थानिक सेंद्रिय अन्न सहज उपलब्ध करून देतो.

13. Bhoomi Naturals (केरळ):<https://www.bhoominaturals.com/>

केरळमधील Bhoomi Naturals स्थानिक शेतकऱ्यांकडून सेंद्रिय मसाले, कॉफी, आणि हर्बल उत्पादने विकते.

14. Kudumbashree Organic : महिलांच्या नेतृत्वाखालील उपक्रम जो ग्रामीण महिलांना सेंद्रिय शेतीत संधी उपलब्ध करून देतो.

15. JaivikSetu (मध्य प्रदेश) : स्थानिक सेंद्रिय शेतकरी आणि नागरी ग्राहक यांच्यात थेट व्यापार सुलभ करणारा उपक्रम.

16. OFAI (Organic Farming Association of India)

वेबसाइट:<https://ofai.org/>

OFAI ही भारतातील सर्वात मोठी सेंद्रिय शेतकरी संघटना आहे जी शेतकरी, NGO आणि संशोधकांना जोडते. संस्था सेंद्रिय बाजारपेठा, प्रशिक्षण कार्यशाळा आणि संशोधन चर्चासत्रे आयोजित करते. ती सेंद्रिय धोरणे व मानके तयार करण्यात सक्रिय आहे. जऋअख सेंद्रिय चळवळीला राष्ट्रीय स्तरावर प्रोत्साहन देऊन शाश्वत शेतीच्या दिशेने मार्गदर्शन करते.

सध्याची आव्हाने आणि भविष्यातील गरज

भारतात सेंद्रिय शेती आणि तिच्या विपणनासाठी विविध ऑनलाइन पोर्टल्स व डिजिटल साधनांचा वापर वेगाने वाढत असला, तरी काही मूलभूत अडथळे अद्याप कायम आहेत. ग्रामीण भागातील अनेक सेंद्रिय शेतकऱ्यांना विश्वासार्ह इंटरनेट सुविधा आणि आवश्यक डिजिटल साक्षरतेचा अभाव असल्यामुळे ते डिजिटल बाजारपेठांचा प्रभावी वापर करू शकत नाहीत. परिणामी, ऑनलाइन विपणनाचे संपूर्ण लाभ त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. आणखी एक गंभीर समस्या म्हणजे सेंद्रिय उत्पादनांच्या वाहतुकीसाठी आवश्यक असलेल्या शीतसाखळी (कोल्ड चेन) व साठवण सुविधांची अपुरी उपलब्धता. यामुळे उत्पादनांची गुणवत्ता, ताजेपणा आणि शेल्फ लाइफ टिकवणे आव्हानात्मक ठरते.तसेच, PGS (Participatory Guarantee System) आणि NPOP (National Programme for Organic Production) या दोन प्रमुख प्रमाणन व्यवस्थांमधील डेटाबेस एकत्रित नसल्याने ट्रेसेबिलिटी, पारदर्शकता आणि विश्वासार्हता यांवर मर्यादा येतात. विविध पोर्टल्सवर विखुरलेली माहिती असल्यामुळे सेंद्रिय उत्पादनांची संपूर्ण मूल्यसाखळी प्रभावीपणे जोडली जात नाही.या अडचणींवर मात करण्यासाठी भविष्यात सर्व सेंद्रिय प्रमाणन, उत्पादन आणि विपणनाशी संबंधित पोर्टल्सना एका एकात्मिक राष्ट्रीय डिजिटल नेटवर्कमध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठी डिजिटल विपणन, ई-कॉमर्सचा वापर, ट्रेसेबिलिटी आणि उत्पादन ब्रँडिंग यांवर केंद्रित प्रशिक्षण व कार्यशाळा आयोजित करणे अत्यावश्यक आहे. ग्रामीण भागात स्थानिक लॉजिस्टिक हब, शीतसाखळी केंद्रे आणि मूल्यवर्धन सुविधा विकसित केल्यास सेंद्रिय उत्पादनांची वाहतूक, साठवण आणि बाजारपेठेतील उपलब्धता अधिक सुलभ होईल. अशा समन्वित उपाययोजनांमुळे सेंद्रिय शेती अधिक टिकाऊ, स्पर्धात्मक आणि आर्थिकदृष्ट्या लाभदायक ठरण्यास निश्चितच मदत होईल.

(लेखक : विषय विशेषज्ञ (कृषिविस्तार), श्री सिद्धगिरी कृषी विज्ञान केंद्र, कणेरी, कोल्हापूर, मो. ८५१०९००५११)

निर्यात आणि प्रमाणन संबंधित पोर्टल्स

पोर्टल	व्यवस्थापन संस्था	मुख्य कार्ये
TraceNet	APEDA	सेंद्रिय उत्पादनांच्या शेतापासून निर्यातीपर्यंत संपूर्ण डिजिटल ट्रॅसेबिलिटी प्रणाली; NPOP अंतर्गत निर्यात व्यवस्थापन.
APEDA Organic Portal	APEDA	सेंद्रिय उत्पादक, प्रमाणन संस्था व निर्यातदारांची नोंदणी, मान्यता व निर्यात समन्वय.
Indocert	स्वतंत्र NGO	NPOP, EU, USDA-NOP प्रमाणनासाठी तपासणी, ऑडिट व ऑनलाइन प्रमाणन सेवा.
OneCert India	खाजगी प्रमाणन संस्था	NPOP, USDA-NOP, EU Organic आणि GOTS प्रमाणनासाठी डिजिटल प्रमाणन प्रक्रिया.
ECOCERT India	आंतरराष्ट्रीय खाजगी संस्था	EU Organic, USDA-NOP, Fairtrade व इतर आंतरराष्ट्रीय प्रमाणन सेवा.
Control Union India	आंतरराष्ट्रीय प्रमाणन संस्था	सेंद्रिय, शाश्वत शेती, अन्न सुरक्षा व सामाजिक ऑडिट प्रमाणन.
Lacon Quality Certification	खाजगी प्रमाणन संस्था	सेंद्रिय शेती, प्रक्रिया उद्योग व निर्यातीसाठी प्रमाणन व तपासणी.
Fairtrade India	Fairtrade International	नैतिक, सामाजिकदृष्ट्या जबाबदार व्यापार, शेतकरी व कामगार हक्कांचे संरक्षण.
USDA Organic (NOP)	US Department of Agriculture	अमेरिकन बाजारपेठेसाठी सेंद्रिय उत्पादनांचे नियमन व मान्यता.
EU Organic Certification System	European Union	युरोपीय संघासाठी सेंद्रिय उत्पादनांचे मानक व प्रमाणन व्यवस्था.
GOTS (Global Organic Textile Standard)	आंतरराष्ट्रीय संस्था	सेंद्रिय कापूस व वस्त्रोद्योगासाठी प्रमाणन व ट्रॅसेबिलिटी.
Rainforest Alliance	आंतरराष्ट्रीय NGO	शाश्वत शेती, पर्यावरण संरक्षण व सामाजिक जबाबदारी प्रमाणन.

कृषी विभागाचे सध्याच्या काळाशी सुसंगत, प्रभावी व सर्जनशील बोधचिन्ह व घोषवाक्य

सन १८८१ च्या फेमीन कमीशन ने शिफारस केल्यानुसार जुलै १८८३ मध्ये कृषी खात्याची स्थापना करण्यात आली. सद्यस्थितीत कृषी विभागाचे वापरले जात असलेले बोधचिन्ह व घोषवाक्य हे ३८ वर्षापूर्वी तयार करण्यात आलेले आहे. दरम्यानच्या काळात शेती व्यवस्थेमध्ये अनेक आमुलाग्र बदल झालेले आहेत. आधुनिक शेतीच्या दृष्टिकोनात व विभागाच्या कार्यपद्धतीत झालेल्या मूलभूत बदलाच्या पार्श्वभूमीवर शेतीचे यांत्रिकीकरण, विद्यापीठाकडून होणारे मूलभूत संशोधन, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, नव्याने प्रस्तावित असलेली कृषी संचनालये, नुकतेच जाहीर केलेले कृत्रिम बुद्धिमत्ता विषयक धोरण या आणि अशा अनेक भविष्यवेधी योजना व संकल्पनांवर कृषी विभागात काम सुरू आहे. या सर्व बाबींचे योग्य प्रतिनिधित्व करेल असे बोधचिन्ह आवश्यक होते. यामुळे सध्याच्या काळाशी सुसंगत, प्रभावी व सर्जनशील बोधचिन्ह व घोषवाक्य तयार करण्याची गरज निर्माण झाली आहे.

सदर अनुषंगाने बोधचिन्ह व घोषवाक्य अद्ययावत करण्यासाठी खुली स्पर्धा आयोजित केलेली होती. जास्तीत जास्त प्रस्ताव प्राप्त होणेसाठी कृषी विभागाच्या संकेतस्थळावर सार्वजनिक आवाहन (Call for Proposal) समावेशित करण्यात आले. वर्तमान पत्रामधून जाहिरात प्रसिद्ध करून तसेच कृषी विभागाच्या समाज माध्यमांतून प्रसिद्धी देण्यात आली. जास्तीत जास्त विद्यार्थी/प्राध्यापक/संशोधक/कलाकार/डिझायनर्स/लेखक/अभ्यासक/अधिकारी/ कर्मचारी/इतर इच्छुक व्यक्तींनी आपली कलात्मक संकल्पना सादर करणेसाठी कला महाविद्यालये, कृषी विद्यापीठे यांना पत्र देऊन आवाहन करण्यात आले.

सदर स्पर्धेकरिता उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त झाला. त्यामध्ये ७६१ - बोधचिन्ह तर ९४९- घोषवाक्य कृषी आयुक्तालयास प्राप्त झाले. प्राप्त प्रस्तावांना मूल्यांकन व शिफारस करण्यासाठी मा. आयुक्त, कृषी यांच्या मान्यतेने बोधचिन्ह व घोषवाक्य मूल्यांकन व शिफारस समिती गठित करण्यात आलेली होती. प्राप्त झालेल्या प्रस्तावांची प्रत्येक समिती सदस्याने तपासणी व छाननी करून त्यापैकी प्रत्येकी उत्कृष्ट दहा बोधचिन्ह व दहा घोषवाक्य शिफारस केले. सदर समितीने शिफारस केलेल्या बोधचिन्ह व घोषवाक्य यांचे पुनर्निर्धारण करण्याबाबत मा.आयुक्त, कृषी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन अंतिम निवड होणेसाठी प्रत्येकी तीन बोधचिन्ह व घोषवाक्य शासनास शिफारस करण्यात आली. शासनाने शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१२८/३-ए (ई-१२४१८६३) दिनांक ०७/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे कृषी विभागाचे नवीन बोधचिन्ह व घोषवाक्य निश्चित करण्यात आले. सदर शासन निर्णयानुसार, कृषी विभागामार्फत सद्यस्थितीत वापरण्यात येणारे बोधचिन्ह व घोषवाक्य यांच्या वापराऐवजी खालीलप्रमाणे बोधचिन्ह व घोषवाक्य वापरण्यास मान्यता देण्यात आली आहे.

बोधचिन्ह व घोषवाक्य –

।। शाश्वत शेती- समृद्ध शेतकरी ।।

यापुढे कृषी विभागाच्या सर्व उपक्रमांमध्ये सदर शासन निर्णयाद्वारे जाहीर झालेले बोधचिन्ह व घोषवाक्य वापरण्यात येणर आहे. सदर बोधचिन्ह व घोषवाक्य हे कृषी विभागाची मालमत्ता असून त्यासंबंधीचे सर्व हक्क कृषी विभागाकडे राहतील. कृषी विभागाचे पूर्वी वापरात असलेले तसेच नवीन बोधचिन्ह व घोषवाक्य यांचा कोणीही गैरवापर केल्यास त्यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घेण्यात यावी.

बोधचिन्ह व घोषवाक्य अद्ययावत करण्यासाठीच्या स्पर्धेमध्ये विजेत्या झालेल्या स्पर्धकाची नावे खालीलप्रमाणे-

* **बोधचिन्ह (Logo) विजेते-** श्री.विरेंद्र भाईदास पाटील, क्रेझी क्रिएशन्स्, पहिला मजला, व्यंकटेश कॉम्प्लेक्स, दगडी पुलाजवळ, भुसावळ, जि. जळगाव
* **घोषवाक्य (Tagline) विजेते-** श्रीमती सिद्धी भारतराव देसाई, रामदास नगर, कारेगाव रोड, परभणी

विजेत्या स्पर्धकांचे हार्दिक अभिनंदन ।।।

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाची २३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा राज्याचे सहकार मंत्री तथा महामंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा.ना.श्री. बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सोमवार दि.१२ जानेवारी २०२६ रोजी संपन्न झाली. सभेच्या सुरुवातीस महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री.मंगेश तिटकारे यांनी सर्व उपस्थिताचे स्वागत करुन महामंडळाचे मा.अध्यक्ष यांच्या मान्यतेने सभेस सुरुवात केली.

सभेत सन २०२१ -२२ च्या वार्षिक अहवालास प्रधान लेखाकार, मुंबई यांनी दिलेल्या अभिप्रायासह स्वीकृती देणेत आली. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेत सन २०२२ - २३ वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल प्रधान महालेखाकार, मुंबई यांना सादर करण्यास मान्यता देण्यात आली.

वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन पध्दतीने राज्याचे सहकार आयुक्त मा.श्री.दिपक तावरे, साखर आयुक्त मा.डॉ.संजय कोलते, मंत्रालयातील सहकार विभागाचे सह सचिव श्री.संतोष पाटील,सनदी लेखापाल तथा महामंडळाचे तज्ञ संचालक श्री.गोकुळ राठी, वैधानिक सनदी लेखापाल श्री.पी.एस.बाफना, कंपनी सचिव श्री.महेश आठवले, विघ्नहर सहकारी साखर कारखाना कार्यकारी संचालक श्री.भास्कर घुले, निरा भिमा सहकारी साखर कारखाना कार्यकारी संचालक श्री. दादासाहेब घोगरे, सुमित्रा ग्रामिण बिगरशेती पतसंस्थेचे चेअरमन श्री.महादेव अंधारे, तसेच भारती नागरी सहकारी पतसंस्था पलुस जि.सांगली, कै.स्वा.सै. शामराव पाटील नागरी सहकारी पतसंस्था, विलास शुगर इ. संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सभेच्या शेवटी महामंडळाचे व्यवस्थापकिय संचालक यांनी सभेस उपस्थित सर्वाचे आभार मानुन मा.अध्यक्षांच्या मान्यतेने सभा संपल्याचे जाहीर केले.

परिवर्तनाच्या उंबरठ्यावर सहकार चळवळ

नवीन राष्ट्रीय सहकार धोरण सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. त्याच धर्तीवर राज्याचे नवीन सहकार धोरणदेखील येऊ घातले आहे. त्याबरोबरच महाराष्ट्र सहकार कायदा बदलाची देखील चर्चा सुरू झाली आहे. त्या निमित्ताने सहकार क्षेत्राकडून असलेल्या अपेक्षांचा ऊहापोह...!

भारताची कृषिप्रधान देश म्हणूनच जगभरात ओळख आहे. देशातील सर्वाधिक लोकसंख्या ग्रामीण भागात वास्तव्यास आहे.

स्वातंत्र्यलढ्यात जसा स्वदेशीचा विचार होता, तसा ग्रामीण आर्थिक स्वावलंबनाचा आधार 'सहकार' आहे. भारतात आज सुमारे आठ लाख ५० हजार सहकारी संस्था कार्यरत असून सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांचे सभासद सुमारे ३० कोटींच्या आसपास आहेत. महाराष्ट्रात सुमारे दोन लाख २५ हजार सहकारी संस्था असून, त्यांची एकत्रित सभासद संख्या सुमारे सुमारे सहा कोटीएवढी आहे. विशेषतः ग्रामीण भागात सर्वाधिक लोक सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, जलसिंचन योजना, विकास सोसायट्या, जिल्हा मध्यवर्ती बँका, ग्रामीण पतसंस्था, दूध संस्था, तर शहरी भागात नागरी बँका आणि गृहनिर्माण सहकारी संस्था यांच्याशी थेट निगडित असून ते अशा सर्व सहकारी संस्थांचे लाभार्थी देखील आहेत. सहकाराच्या माध्यमातून घराघरात समृद्धी आणण्यात, त्यांच्या जीवनाला अर्थपूर्णता देण्यात, त्यांच्या शिक्षण, नोकरी, आरोग्यसंदर्भात सकारात्मक परिवर्तन घडविण्यात सहकाराची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

भालचंद्र कुलकर्णी

ग्रामीण रोजगारात सहकारी संस्थांचा वाटा सुमारे ३० टक्के असल्याचे मानले जाते. ग्रामीण अर्थव्यवस्थेत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सोसायट्या या प्रामुख्याने पतपुरवठ्याचा कणा आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारने आपल्या दुसऱ्या कार्यकालात जुलै २०२१ मध्ये सहकार क्षेत्रासाठी गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र सहकार मंत्रालय सुरू केले. त्यानंतर लगेचच माजी केंद्रीय मंत्री व सहकार क्षेत्रातील जाणकार असलेल्या सुरेश प्रभूंच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सहकार धोरण समिती नेमली गेली. यापूर्वी २००२ मध्ये राष्ट्रीय सहकार धोरण जाहीर झाले होते, ज्यात आता मूलभूत बदल करणे आवश्यक झाले होते. दि. २४ जुलै २०२५ रोजी जाहीर झालेले नवीन राष्ट्रीय सहकार धोरण हे सहकार चळवळीसाठी एक ऐतिहासिक पाऊल आहे. सहकार क्षेत्रांच्या पारदर्शकतेबरोबरच संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्याचा विचार या धोरणात करण्यात आला असून, सहकारी संस्थांना एकत्रित डेटाबेसमध्ये आणून त्यांचे कामकाज सुलभ व विश्वासार्ह केले जाणार आहे. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था (पॅक्स) व जिल्हा सहकारी बँका या संस्थांमध्ये 'कोअर बँकिंग सोल्युशन्स' लागू करून त्यांना राष्ट्रीय आर्थिक प्रवाहाशी जोडले जाणार आहे. या धोरणात महिलांच्या बचत गटांना सहकारी संस्थांमध्ये सामावून घेणे व तरुणांसाठी सहकारी स्टार्टअप्सला प्रोत्साहन देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. कृषी, दुग्ध, मत्स्य, प्रक्रिया उद्योग, विपणन, कर्जपुरवठा आदी विविध सेवांचा एकत्रित लाभ देणाऱ्या बहुद्देशीय सहकारी संस्था स्थापन करण्यावर भर दिला आहे. नवीन सहकार धोरणात 'सहकारातून समृद्धी' या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यावर भर दिल्याचे दिसते.

केंद्र सरकारच्या धोरणाला अनुसरून सर्व राज्यांनीही धोरण डिसेंबर २०२६ अखेर पूर्ण करावयाचे आहे. महाराष्ट्र राज्याने सुद्धा नवे सहकार धोरण असावे, यासाठी केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य सहकार धोरण ठरविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील व राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या नेतृत्वाखाली या समितीमध्ये सहकार क्षेत्रातील अनुभवी, तज्ज्ञ व शासनाचे वरिष्ठ अधिकारी यांचा समावेश आहे. ही उच्चस्तरीय समिती सरकारला शिफारशी करेल.

बदलत्या परिस्थितीत सहकार क्षेत्रातील आव्हाने व त्यावरील उपाययोजना यांचा अभ्यास करण्यासाठी तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०च्या कायद्यात काळानुरूप आवश्यक ते बदल करण्यासाठी देखील सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यीय नवीन समिती स्थापण्यात आली. विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी त्यांच्या त्यांच्या गरजांनुसार वेगवेगळे आणि सुटसुटीत कायदे, नियम असावेत अशी जुनी मागणी आहे, ती यानिमित्ताने चर्चिली जाईल, अशी अपेक्षा आहे.

❊ मोठी आव्हाने –

गेल्या काही दशकांमध्ये सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनातील अपारदर्शकता, आर्थिक गैरव्यवहार, तंत्रज्ञानाचा अभाव आणि बदलत्या गरजांशी जुळवून न घेणे या कारणांनी सहकार क्षेत्राला मोठी आव्हाने निर्माण झाली आहेत. राज्य शासनाने 'महाराष्ट्र राज्य सहकार धोरण' तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली असून, हे धोरण केवळ नियमांमध्ये बदल करण्यापुरते मर्यादित नसावे तर ते संपूर्ण सहकार क्षेत्राला आधुनिकतेकडे नेणारे असण्याची गरज या क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली आहे.

आज सहकारी संस्थांवर सर्वांत मोठा आरोप हा व्यावसायिकता आणि पारदर्शकतेच्या अभावाचा आहे. नागरी सहकारी बँकांमध्ये, पतसंस्थांमध्ये खात्यांची माहिती अद्ययावत नसणे, सभासद, खातेदारांना योग्य डेटा न मिळणे, कर्जवाटप प्रक्रियेत प्रामाणिकपणाचा अभाव आणि भ्रष्टाचार या गोष्टींनी सहकाराची प्रतिमा काही प्रमाणात मलिन झाली आहे. नव्या सहकार धोरणात संपूर्ण संगणकीकरण, ऑनलाइन लेखापरीक्षण, पारदर्शक व्यवहार आणि डेटा-आधारित व्यवस्थापन यांना अग्रक्रम देण्याची गरज आहे. यासाठी संपूर्ण डिजिटायझेशनची आणि त्याहीपुढे 'एआय' तंत्रज्ञानाची देखील गरज प्रकर्षाने पुढे येत आहे. या अडचणींवर मात करण्यासाठी विविध उपाययोजनांची गरज राज्याच्या धोरणात दिसायला हवी. कृषी कर्जवाटप दुप्पट करण्याची उद्दिष्टे, जोखीम व्यवस्थापन प्रणाली, वित्तीय शिस्त आणि व्यवस्थापनासाठी सर्वंकष प्रशिक्षण हेदेखील मुद्दे नव्या धोरणात समाविष्ट व्हायला हवेत. सहकार खात्याचा जनसंपर्क आणि प्रसिद्धी विभाग स्वतंत्रपणे असण्याची देखील गरज आहे. अद्ययावत वेबसाइट आणि त्यावरून सहकारी संस्थांना सर्व प्रकारच्या ऑनलाइन सुविधा असाव्यात, ही देखील एक मागणी या नव्या धोरणाच्या निमित्ताने पुढे आली आहे.

सभासदांचा सक्रिय सहभाग, पारदर्शकता, आधुनिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि वित्तीय शिस्त याला महत्त्व देणारे धोरण असावे. निवडणुकांत पारदर्शकता, संचालक मंडळासाठी उत्तरदायित्वाची तरतूद आणि कायदेशीर सुधारणा हे मुद्देदेखील विशेषत्वाने असायला हवेत. महाराष्ट्र ही सहकाराची गंगोत्री आहे, त्यामुळे नवे धोरण अन्य राज्यांना दिशादर्शन करणारे ठरावे. नव्या धोरणामुळे आणि सहकार कायद्यातील प्रस्तावित सुधारणांमुळे सहकार क्षेत्र भ्रष्टाचारमुक्त, सर्वसमावेशक, व्यापक असावे तसेच भविष्यातील आव्हानांना सामोरे जात सहकार चळवळीचे परिवर्तन करणारे ठरावे, हीच अपेक्षा.

(लेखक सहकार भारतीचे राष्ट्रीय प्रकाशन प्रमुख आहेत.)

नागरी सहकारी बँका
प्रशासकीय 'व्यावसायिकता' आणि अस्तित्वाचा संघर्ष

नागरी सहकारी बँका हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आणि सामान्य मध्यम वर्गीयांच्या विश्वासाचा कणा आहेत. मात्र, बदलत्या जागतिक अर्थव्यवस्थेत केवळ 'सहकार' हा शब्द आता पुरेसा उरलेला नाही. 'सहकार' या पवित्र शब्दाआड चाललेल्या राजकीय हस्तक्षेपामुळे आणि तांत्रिक बँकिंग ज्ञानाच्या अभावामुळे अनेक बँका डबघाईला आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, भारतीय रिझर्व्ह बँकेने मागील काही वर्षात अनेक धोरणात्मक बदल करून या क्षेत्रात 'व्यावसायिक क्रांती' आणली आहे.

✻ बँकिंग नियमन कायदा, १९४९ : कलम १०–ए आणि कार्यकाळाच्या कठोर तरतुदी –

या कलमातील तरतुदी बँकांच्या संचालक मंडळाच्या रचनेबाबत आणि त्यांच्या कार्यकाळाबाबत अत्यंत स्पष्ट व बंधनकारक आहेत.

विशेष ज्ञानाची आवश्यकता (कलम १०–ए (२) (अ)) – कायद्यानुसार, बँकेच्या संचालक मंडळातील किमान ५१% सदस्यांकडे बँकिंग, लेखाशास्त्र, अर्थशास्त्र, वित्त, कायदा, कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था किंवा रिझर्व्ह बँकेने विहित केलेल्या अन्य कोणत्याही विषयाचे तांत्रिक ज्ञान किंवा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असणे अनिवार्य आहे. यामुळे बँकेचा कारभार तज्ज्ञांच्या हाती राहण्यास मदत होईल.

व्यावसायिक निष्पक्षता (कलम १०–ए (२) (ब)) – संचालकाचा बँकेशी कोणताही 'मोठा वैयक्तिक रस' नसावा. हे कलम 'हितसंबंधांचा संघर्ष टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

१० वर्षांची कार्यकाळ मर्यादा (Tenure Limit) **–** कलम १०–एच्या तरतुदींनुसार, कोणत्याही संचालकाला (अध्यक्ष सोडून, ज्यांच्यासाठी ५+५ वर्षांचे वेगळे निकष आहेत.) सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहता येणार नाही. १० वर्षे पूर्ण होताच संबंधित संचालकाचा कार्यकाळ कायद्याने संपुष्टात येतो. यात कोणत्याही 'विश्रांती काळाची' (Cooling-off Period) सवलत नसल्याने, १० वर्षे पूर्ण केलेल्या संचालकाला अनिवार्यपणे पद सोडावे लागते. सत्तेचे केंद्रीकरण रोखून नवीन नेतृत्वाला संधी मिळावी, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

आरबीआयचे अधिकार (कलम १०–ए (५)) – जर एखादी बँक किंवा तिचे संचालक मंडळ वरील तरतुदींचे (पात्रता किंवा कार्यकाळ) पालन करत नसेल, तर रिझर्व्ह बँकेला अत्यंत व्यापक अधिकार आहेत. आरबीआय संबंधित संचालकांना लेखी आदेशाद्वारे तात्काळ पदावरून दूर करू शकते. इतकेच नव्हे तर, त्या रिक्त जागी नवीन पात्र संचालकाची नियुक्ती करण्याचा कायदेशीर अधिकारही रिझर्व्ह बँकेकडे आहे. बँकेने स्वतःहून कारवाई न केल्यास आरबीआय या कलमाचा वापर करून प्रशासकीय शिस्त आणते.

✻ कोल्हापूर खंडपीठाचा ऐतिहासिक निकाल : कायदेशीर वास्तवाची जाणीव –

रिझर्व्ह बँकेने संचालकांच्या कार्यकाळावर (१० वर्षे) जे निर्बंध घातले, त्याला 'कोल्हापूर जिल्हा अर्बन बँक्स को–ऑपरेटिव्ह असोसिएशन लिमिटेड'ने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठात आव्हान दिले होते.

न्यायमूर्ती एम. एस. कर्णिक आणि न्यायमूर्ती अजित बी. कढेठाणकर यांच्या खंडपीठाने या प्रकरणात अंतरिम दिलासा देण्यास स्पष्ट नकार दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की, रिझर्व्ह बँकेने केवळ सुधारित कायद्याची (Banking Regulation Amendment Act) अंमलबजावणी केली आहे. ज्या संचालकांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यानंतर सलग १० वर्षे पूर्ण केली आहेत, ते आता पदावर राहण्यास अपात्र ठरतात. सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यासाठी आणि संस्थात्मक सुशासनासाठी (Governance) हा बदल अनिवार्य असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

गणेश निमकर

✻ कलकत्ता उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण संदर्भ –

सहकारी बँकांच्या प्रशासकीय सुधारणांच्या बाबतीत कलकत्ता उच्च न्यायालयाने देखील अशाच प्रकारच्या वादात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

कलकत्ता उच्च न्यायालयाने आपल्या विविध निकालांमध्ये हे स्पष्ट केले आहे की. सहकारी संस्था जरी राज्याच्या अखत्यारीत असल्या (State Subject), तरी 'बँकिंग' हा विषय केंद्र सरकारच्या आणि पर्यायाने रिझर्व्ह बँकेच्या अखत्यारीत येतो.

न्यायालयाने नमूद केले की, जेव्हा प्रश्न 'बँकिंग व्यवसाया'च्या शिस्तीचा आणि ठेवीदारांच्या हिताचा असतो, तेव्हा रिझर्व्ह बँकेने केलेले नियम आणि बँकिंग नियमन कायद्यातील तरतुदी या सहकारी संस्था कायद्यापेक्षा वरचढ ठरतात.

कलकत्ता उच्च न्यायालयाच्या या भूमिकेमुळे आरबीआयला बँकिंग नियमन कायद्याच्या कलम 10-E अंतर्गत संचालकांना हटवण्याचे जे अधिकार मिळाले आहेत, त्यांना मोठी कायदेशीर ताकद मिळाली आहे. कोल्हापूर खंडपीठाच्या निर्णयाला या व्यापक कायदेशीर संदर्भाचा भक्कम आधार आहे.

✻ नेतृत्व बदलाचे कठोर निकष : १०, १५ आणि ७० चे गणित –

रिझर्व्ह बँकेने नागरी सहकारी बँकांमधील सत्तेचे केंद्रीकरण रोखण्यासाठी आणि व्यावसायिकता वाढवण्यासाठी वयोमर्यादा व कार्यकाळाबाबत अत्यंत कडक विभागणी केली आहे. हे नियम केवळ मार्गदर्शक नसून बँकिंग नियमन कायद्याच्या चौकटीत अनिवार्य आहेत.

✻ नागरी सहकारी बँकांचे नवे पर्व : संचालकांच्या १० वर्षांच्या सत्तेला 'कायदेशीर' पूर्णविराम –

नागरी सहकारी बँकांमधील प्रशासकीय पारदर्शकता आणि व्यावसायिकता वाढवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. या नवीन निर्देशानुसार, कोणताही संचालक एकाच बँकेत सलग १० वर्षांपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही; ही आता केवळ मार्गदर्शक सूचना नसून एक अनिवार्य कायदेशीर अट आहे. १० वर्षांचा हा कार्यकाळ पूर्ण होताच, संबंधित संचालकाला कोणत्याही सबबीशिवाय तात्काळ पद सोडावे लागेल, अन्यथा आर.बी.आय. बँकिंग नियमन कायद्याच्या कलम १०–ए नुसार थेट बडतर्फीची कारवाई करू शकते. सर्वात महत्त्वाची आणि वास्तववादी तरतूद म्हणजे, एकदा १० वर्षांची मर्यादा संपली की, अशा संचालकांसाठी पुन्हा त्याच बँकेत निवडून येण्यासाठी कोणताही 'कूलिंग पीरियड' (विश्रांती काळ) उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

याचा अर्थ असा की, १० वर्षे पूर्ण केलेल्या संचालकाचे त्या बँकेतील प्रशासकीय आस्तित्त्व कायमस्वरूपी संपुष्टात येते. वर्षानुवर्षे एकाच पदावर

राहून निर्माण झालेली 'सत्ताकेंद्रे' मोडीत काढण्यासाठी आणि नवीन, सुशिक्षित नेतृत्वाला संधी देण्यासाठी आरबीआयने उचललेले हे पाऊल सहकार क्षेत्रासाठी एक 'व्यावसायिक संजीवनी' ठरणार आहे.

✻ बँकिंग नेतृत्व आणि स्थैर्यासाठी '१५ आणि ७०' चे कठोर समीकरण: 'कूलिंग-ऑफ'चे महत्त्व –

नागरी सहकारी बँकांमधील कार्यकारी नेतृत्वात व्यावसायिकता आणि पारदर्शकता आणण्यासाठी रिझर्व्ह बँकेने मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा कार्यकारी संचालक पदांसाठी 'दुहेरी मर्यादा' निश्चित केली आहे. या नियमानुसार, कोणतीही व्यक्ती एकाच बँकेत सलग १५ वर्षांपेक्षा जास्त काळ या पदांवर राहू शकत नाही; १५ वर्षे पूर्ण होताच त्यांना अनिवार्यपणे निवृत्त व्हावे लागेल. यासोबतच, आरबीआयने ७० वर्षाची 'लक्ष्मणरेषा' आखली असून, हे वय ओलांडलेल्या व्यक्तीला या पदावर राहता येणार नाही. विशेष म्हणजे, १५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण होण्याआधीच जर संबंधित अधिकाऱ्याचे वय ७० झाले, तर त्यांना त्याच क्षणी पदमुक्त व्हावे लागेल.

या प्रक्रियेत सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे आणि जुन्या नेतृत्वाचा प्रभाव पूर्णपणे संपुष्टात यावा यासाठी ३ वर्षांचा 'विश्रांती काळ' (Cooling-off Period) अनिवार्य करण्यात आला आहे. १५ वर्षांची सेवा बजावल्यानंतर संबंधित व्यक्तीला त्याच बँकेत पुन्हा कोणत्याही पदावर नियुक्ती मिळवण्यासाठी किमान ३ वर्षे वाट पाहावी लागेल.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या ३ वर्षाच्या विश्रांती काळात त्या व्यक्तीचा बँकेशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष कोणताही संबंध असता कामा नये. याचा अर्थ:

- ✻ ती व्यक्ती बँकेत सल्लागार (Consultant) म्हणून काम करू शकत नाही.
- ✻ बँकेच्या कोणत्याही धोरणात्मक निर्णयात त्यांचा सहभाग चालणार नाही.
- ✻ बँकेच्या कोणत्याही समितीवर (Committee) सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती करता येणार नाही.
- ✻ बँकेच्या मालमत्तेचा, गाडीचा किंवा इतर सुविधांचा वापर त्यांना करता येणार नाही.

उदाहरण : समजा, 'क्ष' हे एका सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून वयाच्या ६५ व्या वर्षी १५ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करून निवृत्त झाले. नियमानुसार, त्यांना पुन्हा त्याच बँकेत अध्यक्ष किंवा संचालक म्हणून यायचे असेल, तर वयाची ६८ वर्षे पूर्ण होईपर्यंत (पुढील ३ वर्षे) त्यांना बँकेच्या कामकाजापासून पूर्णपणे अलिप्त राहावे लागेल. या काळात त्यांनी बँकेचे 'पेड सल्लागार' म्हणूनही काम करणे बेकायदेशीर ठरेल. ही ३ वर्षाची 'क्लीन ब्रेक' मर्यादा यासाठी आहे जेणेकरून नवीन नेतृत्वाला कोणत्याही दबावाशिवाय स्वतंत्रपणे काम करता येईल.

नेतृत्व बदलाचा हा सक्तीचा नियम बँकांना 'व्यक्ती-केंद्रित' होण्यापासून वाचवून 'संस्था-केंद्रित करण्यासाठी उचललेले एक क्रांतिकारी पाऊल आहे.

✻ १ ऑगस्ट २०२५ ची 'कट-ऑफ' तारीख –

ज्या संचालकांनी किंवा पदाधिकाऱ्यांनी १ ऑगस्ट २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी आपला विहित कार्यकाळ (१० किंवा १५ वर्षे) पूर्ण केला आहे, त्यांना नवीन निर्देशांनुसार तात्काळ पद सोडावे लागेल. कोल्हापूर खंडपीठाने याच मुद्द्यावर शिक्कामोर्तब करताना सांगितले की, हा नियम पूर्वलक्ष्यी प्रभावाने लागू आहे आणि तो पाळणे अनिवार्य आहे.

हे १०, १५ आणि ७० चे गणित केवळ आकडेमोड नाही, तर तो 'पिढीजात वर्चस्व' संपवण्याचा आरबीआयचा एक मास्टरप्लॅन आहे. यामुळे बँकांचे बोर्ड आता 'अति-ज्येष्ठ नागरिक केंद्रा'सारखे न राहता, तरुण आणि तडफदार व्यावसायिक ज्ञानाचे केंद्र बनेल. अनुभवी लोकांच्या मार्गदर्शनाची गरज आहेच, पण अंमलबजावणीसाठी सक्रिय आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम नेतृत्वाची गरज आहे, हेच या नियमांचे मूळ आहे.

✻ ५१% व्यावसायिक संचालक : बोर्डाचे 'कॉर्पोरेट' स्वरूप –

बँकिंग नियमन कायदा, १९४९ चे कलम १०-ए आता नागरी सहकारी बँकांसाठी निव्वळ मार्गदर्शक सूचना राहिलेली नाही, तर ती एक अनिवार्य अट झाली आहे. बँकांचे संचालक मंडळ (Board of Directors) हे केवळ सामाजिक प्रतिष्ठा जपण्याचे साधन न राहता, ते तांत्रिकदृष्ट्या सक्षम असणे हा या बदलाचा मुख्य उद्देश आहे.

✻ व्यावसायिक पात्रतेचे निकष (Professional Qualifications):

कलम १०-ए (२) (अ) नुसार, संचालक मंडळातील एकूण सदस्यांपैकी किमान ५१% संचालक खालील क्षेत्रांतील विशेष ज्ञान किंवा प्रत्यक्ष कामाचा अनुभव असलेले असणे बंधनकारक आहे:

१. **बँकिंग (Banking) :** व्यावसायिक बँका किंवा वित्तीय संस्थांमधील कामाचा अनुभव.

२. **लेखाशास्त्र (Accountancy) :** सनदी लेखापाल (उअ) किंवा खर्च लेखापाल (ICWA).

३. **अर्थशास्त्र आणि वित्त (Economics Finance) :** आर्थिक धोरणे आणि भांडवली बाजाराची जाण.

४. **कायदा (Law) :** कायदेशीर बाबी आणि बँकिंग कायद्यांचे ज्ञान असलेले वकील.

५. **कृषी आणि ग्रामीण अर्थव्यवस्था (Agriculture Rural Economy) :** ग्रामीण कर्जपुरवठा आणि शेतीविषयक अर्थकारणाची समज.

६. **माहिती तंत्रज्ञान (IT) आणि सायबर सुरक्षा :** डिजिटल बँकिंगच्या युगात आयटी तज्ज्ञांचा समावेश आता अनिवार्य झाला आहे.

✻ तांत्रिक दृष्टीकोनाची गरज (The Need for Expertise) :

- बँकिंग आता पूर्वीसारखे केवळ 'खाते उघडणे आणि पैसे देणे' इतपत मर्यादित राहिलेले नाही. बोर्डाकडे तांत्रिक दृष्टी असणे खालील कारणांसाठी आवश्यक आहे.
- हॅकर्स आणि सायबर फसवणुकीच्या धोक्यांपासून बँकेचे आणि ठेवीदारांचे संरक्षण करण्यासाठी बोर्डाला तांत्रिक बाबी समजणे गरजेचे आहे.
- कर्ज वाटप करताना केवळ 'ओळख' न पाहता, कर्जदाराची परतफेड क्षमता आणि ताळेबंदातील जोखीम ओळखण्यासाठी तज्ज्ञ संचालकांची मदत होते.
- रिझर्व्ह बँकेच्या नियमांचे काटेकोर पालन (Compliance) करणे सोपे होईल.

✻ व्यावसायिक निष्पक्षता (Professional Integrity) –

कलम १०-ए (२) (ब) नुसार, या व्यावसायिक संचालकांचे बँकेत कोणतेही 'मोठे वैयक्तिक हित' (Substantial Interest) नसावे. जेणेकरून बँकेचे निर्णय घेताना कोणताही वैयक्तिक स्वार्थ आड येणार नाही.

✻ अंमलबजावणी न झाल्यास आरबीआयचे 'ब्रह्मास्त्र' –

जर एखाद्या बँकेने ५१% व्यावसायिक संचालकांचा कोटा पूर्ण केला नाही, तर कलम १०-ए (५) नुसार रिझर्व्ह बँकेला खालील अधिकार आहेत.

१. पात्र नसलेल्या संचालकांना तात्काळ पदावरून दूर करणे.

२. त्यांच्या जागी रिझर्व्ह बँकेने सुचवलेल्या पात्र तज्ज्ञाची नियुक्ती करणे.

३. हे आदेश न पाळल्यास बँकेवर मोठा आर्थिक दंड आकारणे किंवा बँकेचा परवाना धोक्यात येणे.

थोडक्यात सांगायचे तर, आता बोर्डावर 'होयबा' (Yes-men) चालणार नाहीत. बँकेचा ताळेबंद वाचता येणारा, सायबर धोके ओळखणारा

आणि कायद्याची चौकट समजणारा 'प्रोफेशनल' चेहराच आता बँकेचे भविष्य ठरवेल. ज्या बँका केवळ नावापुरते संचालक नेमतील, त्यांना आरबीआयच्या कठोर तपासणीला सामोरे जावे लागेल.

❊ १० डिसेंबर २०२५ ची नियमावली आणि 'लॉटरी' पद्धत (Drawing of Lots) –

केंद्र सरकारने १० डिसेंबर २०२५ रोजी 'बँकिंग नियमन (सहकारी संस्था) सुधारणा नियम, २०२५' अधिसूचित करून नागरी सहकारी बँकांच्या प्रशासकीय प्रक्रियेत एक ऐतिहासिक बदल घडवून आणला आहे. हा बदल प्रामुख्याने ज्या बँकांमध्ये 'अपात्र संचालकां'ची संख्या मोठी आहे, त्यांच्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

केंद्र सरकारने १० डिसेंबर २०२५ रोजी अधिसूचित केलेल्या 'बँकिंग नियमन (सहकारी संस्था) सुधारणा नियम, २०२५' मधील नियम ५-अ (Drawing of Lots) ही तरतूद नागरी सहकारी बँकांमधील प्रस्थापित सत्ताकेंद्रे मोडीत काढण्यासाठी अत्यंत प्रभावी शस्त्र ठरली आहे. अनेकदा बँकेच्या संचालक मंडळावर असे अनेक सदस्य असतात जे बँकिंग नियमन कायद्याच्या कलम १०-ए नुसार तांत्रिक पात्रता पूर्ण करत नाहीत किंवा ज्यांचा १० वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झाला आहे; अशा वेळी, कोणाला पदावरून दूर करायचे यावरून बोर्डामध्ये अंतर्गत वाद, गटबाजी किंवा राजकीय दबाव निर्माण होण्याची दाट शक्यता असते. या वादावर कायमस्वरूपी आणि निष्पक्ष उपाय म्हणून 'चिठ्ठ्या टाकून' (Drawing of Lots) निर्णय घेण्याची पद्धत आता अनिवार्य केली आहे. ही केवळ साधी लॉटरी नसून, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या प्रतिनिधींच्या थेट उपस्थितीत पार पडणारी एक कायदेशीर आणि पारदर्शक प्रक्रिया आहे, जी राजकीय वशिलेबाजीला पूर्णविराम देते.

ज्या संचालकाच्या नावाची चिठ्ठी या प्रक्रियेत निघेल, त्याला कोणत्याही वादाविना आणि मान-अपमानाची तमा न बाळगता तात्काळ पद सोडावे लागेल, ज्यामुळे बँकेतील वर्षानुवर्षे टिकून असलेले 'येस बॉस' कल्चर आणि 'पॉवर सेंटर्स' उध्वस्त होण्यास मदत होईल. ही पद्धत स्पष्टपणे अधोरेखित करते की, आता बँकेचे भवितव्य कोणाच्या 'राजकीय शब्दावर' किंवा 'वजनावर' नव्हे, तर केवळ 'कायद्याच्या नियमावर' ठरेल.

आरबीआयने बँकांचे 'बँकिंग' आणि 'राजकारण' वेगळे करण्यासाठी दोन स्वतंत्र स्तरावरील प्रशासन व्यवस्था उभारली आहेः

❊ **व्यवस्थापन मंडळ** (Board of Management - BoM) –

नागरी सहकारी बँकांमधील व्यावसायिकता आणि ताळेबंदाची सुरक्षितता जपण्यासाठी 'व्यवस्थापन मंडळ' (BoM) हे आता एक अनिवार्य कवच ठरले आहे. रिझर्व्ह बँकेच्या नियमांनुसार, ज्या बँकांच्या एकूण ठेवी १०० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त आहेत, त्यांच्यासाठी व्यवस्थापन मंडळाची स्थापना करणे बंधनकारक आहे. या नवीन प्रशासकीय रचनेत अधिकार आणि जबाबदाऱ्यांची स्पष्ट विभागणी करण्यात आली असून, मूळ संचालक मंडळ केवळ व्यापक धोरणात्मक निर्णय घेईल, तर प्रत्यक्ष बँकिंग कार्यावर-जसे की कर्ज मंजुरी, निधी व्यवस्थापन आणि कर्ज वसुली-तांत्रिक नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पूर्णतः व्यवस्थापन मंडळाकडे असेल. विशेष म्हणजे, या मंडळात बँकिंग, वित्त, लेखाशास्त्र किंवा कायद्यातील निष्णात तज्ज्ञांचा सहभाग असणे आवश्यक आहे, ज्यामुळे व्यावसायिक निर्णय प्रक्रियेला बळकटी मिळते. सत्तेचे योग्य संतुलन (Checks and Balances) राखण्यासाठी आरबीआयने असा कठोर नियम घातला आहे की, बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष हे व्यवस्थापन मंडळाचे (BoM) अध्यक्ष असू शकत नाहीत, जेणेकरून बँकेचा दैनंदिन कारभार कोणत्याही राजकीय किंवा वैयक्तिक प्रभावापासून मुक्त राहून केवळ व्यावसायिक निकषांवर चालेल.

❊ **मुख्य जोखीम अधिकारी** (Cheif Risk Officer - CRO) –

नागरी सहकारी बँकांमधील आर्थिक स्थैर्य आणि जोखीम व्यवस्थापन अधिक बळकट करण्यासाठी रिझर्व्ह बँकेने 'मुख्य जोखीम अधिकारी' (Chief Risk Officer - CRO) हे पद अत्यंत शक्तिशाली आणि स्वतंत्र केले आहे. या पदाची निष्पक्षता जपण्यासाठी आरबीआयने 'ड्युअल हॅटिंग'वर (दुहेरी भूमिका) पूर्णपणे बंदी घातली आहे, याचा अर्थ असा की, CRO बँकेचा कोणताही व्यावसायिक विभाग सांभाळू शकणार नाही किंवा त्याला कर्ज वाटपाचे कोणतेही 'टार्गेट' दिले जाणार नाही, ज्यामुळे तो कोणत्याही दबावाशिवाय निर्णय घेऊ शकेल. विशेष म्हणजे, मुख्य जोखीम अधिकाऱ्याला एक प्रकारचा 'नकाराधिकार' (Veto Power) देण्यात आला असून, त्याचे मुख्य काम बँकेसमोर येणारी संभाव्य जोखीम ओळखणे आणि ती रोखणे हे आहे. तो थेट संचालक मंडळाला रिपोर्ट करेल आणि सीईओ किंवा इतर कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रभाव त्याच्यावर असणार नाही. थोडक्यात, बँकेची आर्थिक सुरक्षितता आणि ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तो एक निष्पक्ष आणि 'स्वतंत्र पहारेकरी' म्हणून कार्य करेल.

कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्याचा प्रभाव त्याच्यावर असणार नाही. थोडक्यात, बँकेची आर्थिक सुरक्षितता आणि ठेवीदारांचे हित जपण्यासाठी तो एक निष्पक्ष आणि 'स्वतंत्र पहारेकरी' म्हणून कार्य करेल.

सदर लेखात दिलेली माहिती ही **भारतीय रिझर्व्ह बँकेच्या दि. २८ नोव्हेंबर २०२५च्या अधिसूचना** आणि **दि. १० डिसेंबर २०२५च्या केंद्र सरकारच्या सुधारित नियमावलीचे 'स्वैर भाषांतर' व विश्लेषण आहे.** बँकिंग नियम हे अत्यंत तांत्रिक आणि कायदेशीर गुंतागुंतीचे असतात. त्यामुळे, कोणतीही कायदेशीर कार्यवाही करण्यापूर्वी किंवा धोरणात्मक निर्णय घेण्यापूर्वी बँकांनी रिझर्व्ह बँकेच्या अधिकृत संकेतस्थळावरील **'मूळ नियम'** (Original Rules/ Master Directions) वाचणे आणि कायदेशीर सल्ला घेणे अत्यंत आवश्यक आहे.

नागरी सहकारी बँकिंग क्षेत्रासाठी आता मैदानातील नियम पूर्णपणे बदलले आहेत. रिझर्व्ह बँक (RBI) आता केवळ मार्गदर्शक राहिलेली नाही, तर ती एका कडक 'अंपायर'च्या भूमिकेत आली आहे आणि 'थर्ड अंपायर' म्हणून न्यायालयही (कोल्हापूर व कलकत्ता खंडपीठ) नियमांवर बोट ठेवून आरबीआयच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करत आहे. अशा वेळी जुन्या पद्धतीचे 'बॅटिंग' किंवा वशिलेबाजीचे राजकारण आता बँका वाचवू शकणार नाही.

संचालकांसाठीची '१० वर्षाची मुदत' आणि पारदर्शकतेसाठीची 'लॉटरी पद्धत' ही सहकारी क्षेत्रासाठी एक कटू औषध मात्रा वाटू शकते, मात्र बँकांच्या दीर्घायुष्यासाठी आणि सामान्य ठेवीदारांच्या सुरक्षिततेसाठी तीच एकमेव 'संजीवनी' आहे.

ज्या बँका हे बदल स्वीकारून व्यावसायिकतेची कास धरतील, त्या 'सहकारी' ते 'कॉर्पोरेट' असा यशस्वी प्रवास करून आधुनिक स्पर्धेत टिकून राहतील. याउलट, जे जुन्याच चौकटीत अडकून राहतील आणि सुधारणांना विरोध करतील, त्या बँका केवळ इतिहासात जमा होण्याची भीती आहे. अखेर, बदल हाच शाश्वत नियम आहे. त्यामुळे प्रश्न हा नाही की आरबीआयने नियम का बदलले?, तर खरा प्रश्न हा आहे की बँकेच्या अस्तित्त्वासाठी तुम्ही स्वतःला बदलायला तयार आहात का?

(लेखक – बँकिंग सल्लागार
मोबाईल – ९८२२५ ६८५५०
बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.
ई मेल – nimkarganeshgmail.com)

बीडी धुमाळ कृषी पायाभुत सुविधा व मुल्यवर्धन साखळी

सौ. शांता महेंद्र धुमाळ, मो. नंबर : ९७६५१४५७२८
कृष्णाई नगर, तेलगाव बु. ता.धारूर,जि. बीड -४३११३१.

भारत सरकार कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय,नवी दिल्ली अंतर्गत कृषी विपणन व निरीक्षण निर्देशनालय (DMI) देशातील शेतकऱ्यांसाठी विविध विकास योजना स्वातंत्र्यानंतर राबवित आहे. त्यापैकी प्रमुख योजना म्हणजे कृषी विपणन पायाभुत सुविधा योजना (AMI) व कृषीपायाभुत निधी योजना (AIF) होय. सदरील योजनेचा उत्कृष्ट आदर्श नमुन्याची पूर्तता तेलगांव (बु), ता. धारुर जि.बीड प्रगतशील शेतकरी सौ. शांता महेंद्र धुमाळ यांनी बीडी धुमाळ कृषी पायाभुत सुविधा व मुल्यवर्धन साखळी' या नावाने प्रकल्प उभारुन केलेली आहे.

कुटुंबाची परंपरागत १८ एकर शेती असून कौटुंबिक पार्श्वभुमी प्रतिष्ठित कुटुंबातील प्रगतशील शेतकरी अशी होती. कृषि व ग्रामीण विषयाची आवड व सामाजिक उत्तरदायित्व यातून राष्ट्रीय ग्रामीण गोदाम बांधणी योजनें अंतर्गत प्रकल्प उभारणीसाठी मला प्रेरणा दिली. त्यामुळे २०१४ मध्ये महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा तेलगाव (बु) मधून रु. २८ लक्ष कर्ज व माझे पती श्री. बन्सी ज्ञानोबा धुमाळ यांनी रु. ८ लक्ष स्वनिधी करून एकूण रु. ३६ लक्ष रुपयाचा १००० मे. टन क्षमतेचे प्रथम गोदाम प्रकल्प उभारला व यशस्वी केला. सदरील प्रकल्पाला शेतमालतारण अर्थसहाय आय. सी.आय.सी. बॅक अंबाजोगाई व परळी या शाखेतून केले. सदरील प्रकल्प नियमित परतफेड करून बँकेचा विश्वास संपादन केला. त्यामुळे महाराष्ट्र ग्रामीण बँकेने तळमळ व प्रामाणिकपणा ओळखून दि. ३१ मार्च २०२३ मध्ये ५००० मे. टन क्षमता तीन गोदाम स्वच्छता, प्रतवारी, वेष्टेनीकरण, नामकरण प्रकल्प २ ते ३ टन प्रती तास क्षमता व दोन्ही प्रकल्पाची एकूण किंमत ३४६ लक्ष रुपये मंजुरी तत्काळ देवून प्रकल्प सुरू करण्यासाठी सर्वोतपरी सहकार्य केले.

सध्या १.२३ हे. क्षेत्रावर १००० मे.टन दोन गोदाम,२००० मे.टन क्षमता असलेले दोन गोदाम, अशी ६००० मे. टन एकूण साठवणूक क्षमता असून स्वच्छता ,प्रतवारी, वेष्टेनीकरण,व नामकरण प्रतीतास २ ते ३ टन क्षमता असलेला प्रकल्प सुरु केला आहे.तसेच शेतमालतारण कर्ज सुविधा ८० पेक्षा जास्त राष्ट्रीयकृत, सहकारी व इतर वित्तीय संस्था व बँकेच्या माध्यमातून सुरु केली आहे.

संस्था स्थापनेचा उद्देश :- पतीने प्रशासकीय सेवेत काम करत असताना आर्थिक परस्थिती सर्वसाधारण असताना देखील आपले ज्ञान, शिक्षण, अनुभव, कौशल्य व प्रशिक्षण यांचा परिसरातील शेतकरी बांधवाना त्यांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी मूल्यवर्धन साखळीतून उपयोग व्हावा असा सामाजिक उत्तरदायित्वाबद्दल विचार मांडला. यासाठी मला सतत मार्गदर्शनकरून हा पथदर्शी व वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प आमच्या कुटुंबाने उभा केला. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना हक्काचे साठवणुकीचे ठिकाण निर्माण करणे, साठवणुकीच्या जागे अभावी जो शेतकऱ्यांचा माल खराब होतो त्याचे प्रमाण कमी करणे व बाजारात योग्य भाव येत नाही तो पर्यंत साठवणूक करणे व योग्य भाव आल्यानंतर त्याची विक्री करून काढणीपश्चात ३ ते १५ टक्के एकूण मूल्यवर्धन करणे. तसेच मूल्यवर्धन करताना आवश्यक त्या सर्व प्राथमिक सुविधा किफायतशीर दरात व एकाच छताखली तेलगांव (बु.) सारख्या ग्रामीण भागात उपलब्ध करून देणे व त्यातून परिसरातील शेतकरी बांधवाचा वेळ पैसा व श्रम वाचवणे हा सदरील प्रकल्प स्थापन करण्याचा प्रमुख उदेश होता.

प्रकल्प स्थापन करताना महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा तेलगाव (बु.) ता. धारूर जि. बीड यातील सर्व अधिकारी व कर्मचारी आणि नातेवाईक या सर्वांची मदत झाली. तसेच परभणीचे जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था श्री. संजय भालेराव व कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी वेळो वेळी प्रोत्साहन देउन मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा परिषद सदस्य, नाबार्ड चे जिल्हा विकास प्रबंधक बीड, कृषि विपणन व निर्देशालय मुंबईचे भावेश कुमार जोशी, यांनी प्रकल्पासाठी विशेष सहकार्य व मार्गदशन केले.

प्रकल्प ग्रामीण भागातील असून देखील सुरुवातीला उत्तम प्रतिसाद मिळाला. कर्जाच्या मदतीने प्रकल्प पूर्ण करून कामाला सुरुवात केली. सर्वांच्या मदतीने प्रचंड ओढाताण सहन करत प्रकल्प सुरु केला. सन २०१४ मध्ये १००० मे. टन क्षमता असलेला प्रकल्प सुरु झाला व २०२४ मध्ये ५००० मे.टन क्षमता असलेला प्रकल्प सुरु केला. प्रती तास २ ते ३ टन स्वच्छता आणि प्रतवारी असलेले युनिट सुरु केले.

स्वनिधीसाठी मोठी अडचण होती. अंतिम अनुदान अद्याप न मिळाल्यामुळे व्याजाचा मोठा भूर्दंड सोसावा लागत आहे. सदरील भाग ग्रामीण असल्यामुळे व व्यवसाय हंगामी ८ महिन्याचे असल्यामुळे कर्ज हप्ते नियमित भरण्यासाठी ओढाताण होत आहे. मुख्य म्हणजे सरकारचे अनुदान वेळेवर मिळत नाही. त्यामुळे आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. अनुदान वेळेवर मिळत नसल्यामुळे बँकेचे हप्ते भरण्यासाठी आर्थिक संकट निर्माण होतात. तसेच ठेवीदार भाडे हे प्रती महिना न देता माल उचलेते वेळी देतात. त्यामुळे आर्थिक अडचण निर्माण होते. मात्र कर्ज हप्ता मासिक भरावा लागतो. उपरोक्त सर्व अडचणी असतानांही अडचणीमध्ये संधी शोधून बँकेचे सर्व हप्ते नियमित भरून बँकेने आमच्यावर टाकलेला विश्वास सार्थ केलेला आहे.

अडचणी सोडवतांना पैश्याची कमी जाणवली. दोन वेळेस आर्थिक स्थिती अडचणीत असल्यामुळे पतीचे वडिलोपार्जित चार भूखंड विकावे लागले. तसेच पतीने पगार कर्ज, सुवर्ण कर्ज आणि नातेवाईक यांचा कडून वेळोवेळी आर्थिक मदत घेवून त्या सोडविल्या. अश्याप्रकारे अडचणीवर पर्याय शोधून आम्ही सर्व कुटुंबाने नियोजन करून त्यावर मात करत हा प्रकल्प यशस्वीरित्या चालू केला आहे.

केंद्र सरकारच्या कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालय अंतर्गत कृषि विपणन व निरीक्षण निर्देशनालय (डी.एम.आय) मुंबई अंतर्गत असलेल्या योजने अंतर्गत सन २०१४ मध्ये ग्रामीण भंडार योजना (जी.बी.वाय) व २०२३ मध्ये एकात्मिक कृषि विपणन पायाभूतसुविधा (ISMAI) मधील कृषि विपणन सुविधा योजना (AMI) तसेच कृषि पायाभूत सुविधा निधी योजना (AFI) या योजनाचा लाभ घेतला आहे.

महाराष्ट्र शासन कृषी विभाग नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (POCKRA) पोकरा दित्तीय टप्प्यांचे प्रकल्पाअंतर्गत शेतकरी प्रशिक्षण, नॅशनल इलेक्ट्रॅनिक्स रिपोजेटरी (NERL) मार्फत केंद्रशासन अन्ननागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालय अंतर्गत भंडार विकास नियामक प्राधिकरण (WDRA), इलेक्ट्रॉनिक्स परक्राम्य भंडारपावती (eNWR) ई-वखार पावती जागरुकता कार्यक्रम , केंद्रशासनाच्या सहकार मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय सहकार प्रशिक्षण संस्था (NCCT), नवी दिल्ली अंतर्गत धनंजयराव गाडगीळ सहकार व्यवस्थापन संस्था नागपूर मार्फत गोदाम विकास नियमन अधिनियम २००७ (WDRA) जागरुकता कार्यक्रम आदी विविध कार्यक्रमाचे आयोजन करून ते तेलगांव (बु.) सारख्या भागात ते यशस्वी केलेले आहेत. वखारगृहाने अभिप्राय पुस्तिका, सूचना, तक्रार पेटी, ग्राहक अभिप्राय अर्ज आदी सुविधा उपलब्ध केलेल्या असून ग्रामीण गोदामची एक आदर्श प्रतिकृती (Model Project) तेलगांव (बु.) सारख्या भागात उभी केलेली आहे. सदरील प्रतिकृती परिसरातील अनेक प्रकल्पाना नव संजवणी देणारी ठरणार आहे. तसेच प्रकल्पाच्या वतीने नवे उद्योग प्रकल्पांना सल्ला व मार्गदशन देण्यात येत असून त्याचा लाभ परिसरातील अनेक प्रकल्पांनी घेतलेला आहे.

शेतमाल मूल्यवर्धन साखळीतून शेतमाल स्वच्छता, प्रतवारी, वेष्टणीकरण, नामकरण, नियोजित शेतमाल तपासणी प्रयोग शाळा, शेतकरी बांधंवासाठी फक्त ५० रु. मध्ये ६० टनी वजन काटा करून देणे, शेतकरी भवन, हमाल भवन, प्रशिक्षण केंद्र, विद्यार्थी अभ्यासिका, प्रशस्त वाहनतळ, रुंद व प्रशस्त रस्ते अग्निक्षमन यंत्रणा आदि विविध दर्जेदार उपक्रम एकाच छताखाली परिसरातील शेतकऱ्यांना अतिशय अल्पदरात उपलब्ध करून देण्यात येत असून त्यामुळे त्यांच्या वेळ, पैसा व श्रमात मोठ्या प्रमाणावर बचत होत आहे. तसेच ए.डी.एम अँग्रो, लातूरच्या मदतीने स्पर्धात्मक बाजार भावाने शेतमाल खरेदी करण्यात आलेली आहे. नाफेड मार्फत आधारभूत किंमतीने २०२४/२०२५ मध्ये धारूर तालुका खरेदी विक्री संघाच्या मदतीने शासनामार्फत खरेदी करण्यात आलेली आहे.

ग्रामीण भंडारण योजनेअंतर्गत २०१४ मध्ये १००० मे. टन क्षमतेचे वखारगृह उभारण्यात महाराष्ट्र ग्रामीण बँकेने सर्वोपरी मदत करून सहकार्य केले. संपूर्ण प्रकल्प ३६ लक्ष रुपयांचा होता. त्यापैकी २५ लक्ष रुपये कर्ज व स्वनिधी ८ लक्ष रुपये होता. सदरील कर्ज मुदतीत व वेळेवर भरणा करुन संपूर्ण कर्जाची परतफेड केल्यामुळे बँकेचा आमच्या वर विश्वास निर्माण झाला. महाराष्ट्र ग्रामीण बँकेने ग.नं.१३७ मध्ये ३१ मार्च २०२३ रोजी ५००० मे. टन क्षमतेचे तीन नवीन गोदामाला मान्यता दिली. सदरील तीन गोदामांपैकी दोन गोदाम २००० मे. टन क्षमतेचे आहेत व प्रकल्प किंमत रु. २३५ लक्ष आहे. त्यापैकी ७५% कर्ज (१७६ लक्ष) व २५% स्वानिधी (५८ लक्ष) होता. तसेच १११ लक्ष रुपये किंमतीचा दुसरा स्वच्छता, प्रतवारी, वेष्ठणीकरण व नामकरण प्रकल्प उभारला. त्यामध्ये ७५% कर्ज (८३ लक्ष कर्ज) व २५% स्वानिधी (२७ लक्ष) होता. सदरील प्रकल्पाची एकूण साठवणूक क्षमता ६००० मे. टन असून स्वच्छता, प्रतवारी, वेष्ठणीकरण व नामकरण प्रकल्पक्षमता २ ते ३ मे. टन प्रती तास आहे.

१० व २० किलो विविध वजनामध्ये व आकर्षक रंगाच्या पॅकींग मध्ये रब्बी ज्वारी ' गुलाब' ब्रँड प्रकल्पाच्यावतीने विकसित करण्यात आलेला आहे. त्याला शेतकऱ्यांच्या व स्थानिक ग्राहकाच्या वतीने चांगला प्रतिसाद मिळत आहे.

केंद्रशासन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्रालय अंतर्गत भंडार विकास नियामक प्राधिकरण (WDRA) मार्फत इलेक्ट्रॉनिक्स परक्राम्य भंडार पावती (eNWR) या अत्याधुनिक संगणकीय प्रणाली माध्यमातून अतिशय अल्पदरात, तात्काळ, पारदर्शक, स्वस्त, किफायतशीर, तरलतापूर्ण व सुरक्षित शेतमाल तारण कर्जपुरवठा करणारे व एकाच छताखाली सर्व सुविधा देणारे मराठवाड्यातील प्रथम खाजगी वखारगृह आहे. शासन हमीभावाने शासनामार्फत व खाजगी उद्योजकांमार्फत स्पर्धात्मक दराने शेत माल धान्य खरेदी करण्यात येते. साठवणूक केलेल्या शेतमालावर किफायतशीर दराने राष्ट्रीय सहकारी ग्रामीण व्यापारी व इतर खाजगी तसेच निमसरकारी वित्तीय संस्था मार्फत आवश्यकतेनुसार तत्काळ अतिशय अल्पदरात कर्जपुरवठा व शेत मालतारण सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तेलगांव (बु.) सारख्या ग्रामीण व मोंढा विरहीत परिसरा मध्ये सर्व सुविधा एकाच छताखाली शेतकरी बांधवांना मिळणार असून त्यामुळे त्यांचा वेळ, पैसा व श्रम यांची मोठी बचत होणार आहे. प्रकल्पातून ५ ते १५ % शेत मालाचे मूलर्वधन होणार असून परिसरातील आर्थिक व सामाजिक विकासाला चालना मिळणार आहे. प्रकल्प परिसरातील नवउदयोजक व बेरोजगार युवक यांना दिपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करणाऱ्या वाटाड्याप्रमाणे मित्र ठरणार आहे.शेतकरी बांधवासाठी फक्त ५० रूपयात, ६० टनी संपूर्ण संगणकीय, वजन काट्याची, २४ तास, अतिशय अल्पदरात सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे. अशा प्रकारे प्रकल्पाने ग्रामीण भागात सेवेचे व उद्योगाचे व्यापारीकरण /बाजारीकरण न करता सेवेतून सामाजिक उत्तरदायित्व जपल्याचे निर्दशनास येते. प्रकल्पात कृषि मुल्यवर्धन साखळीतून आर्थिक विकासा बरोबरच सामाजिक उपक्रमाचे आयोजन करून प्रकल्पाला मानवी चेहरा देण्याचा प्रमाणीक प्रयत्न केलेला आहे.

पान क्र. २७ वर

तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनी

श्री. पवन तारांचद कटनकर
तुमसर ऑईल प्रोसेस फॉर्मर प्रोड्युसर कंपनी
सिंदपुरी ता. तुमसर जि. भंडारा -७७१९१५
मो.- ७७६९९९५१४७
ईमेल - tumsarfpo@gmail.com

मी पवन कटनकर इंजिनिअरींगची पदवी चांगल्या पगारावर अभियंता म्हणुन खाजगी कंपनीत कामाला होतो. परंतु नोकरीत मन रमत नव्हते. गावाकडे जावुन काहीतरी करावे. आपल्या ज्ञानाचा फायदा कंपनीला देण्या ऐवजी आपल्या शेतकऱ्यांना कसा देता येईल याचा सतत विचार करीत होतो. अशात मला माझा मित्र श्री. रवि रहांगडाळे भेटला. नोकरीचा राजीनामा दिला आणि गावात परतलो.

आपल्या गावाची दशा बदलली पाहीजे हे वेड मनाला लागले होते. शेतकऱ्यांसाठी प्रामाणिकपणे व निरपेक्षपणे काम करण्याचे ठरविले. त्याच वेळेस कृषि विभागाकडुन शेतकरी उत्पादक कंपनी या नविन संकल्पनेबाबत माहिती मिळाली आणि असे लक्षात आले की, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारपेठ मिळुन दिल्यास शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होऊ शकले व त्यासाठी विकासाचा मार्ग म्हणजे शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करणे हा आहे. त्यावेळेस महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ व नाबार्ड यांच्या माध्यमातुन शेतकरी उत्पादक कंपनी स्थापन करण्याची संधी मिळाली.

स्थापना – जेव्हा संस्था स्थापनेसाठी सभा घेण्याचे ठरविले तेव्हा सर्वानी सक्रीय सहभाग सभासद होण्यामध्ये नोंदविला. कंपनीतील सभासदांनी २९ वर्ष लिजवर स्वत:च्या मालकीची जागा उपलब्ध करुन दिली. कारण भंडारा जिल्ह्यातील आमचे छोटेसे गाव पशुपालन व तांदुळ उत्पादन हाच जिवनाचा आधार त्यामुळे आम्ही नविन काहीतरी करीत आहे. त्यासाठी सर्वानी या कार्यास साथ दिली.

संस्थेच्या माध्यमातून काय काय करणे शक्य आहे?

याबाबत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाने दिलेले प्रशिक्षण व नाबार्ड अधिकारी यांच्या भेटी यामुळे लक्षात आलेले होते. त्यामुळे सेंद्रीय शेती, सेंद्रीय उत्पादने व उत्पादन संस्थेस स्वत:चा बॅन्ड विकसित करणे या बाबत खालील बाबींप्रमाणे संस्थेच्या माध्यमातुन करण्यात येतात.

तुमसर, महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील एक छोटंसं शहर, जिथे शेती आणि पशुपालन हा स्थानिक लोकांच्या जीवनाचा आधार आहे. तुमसरला ''राईस सिटी'' व ''कुबेर नगरी'' म्हणून ओळखले जाते. धानाचे किंवा भाताचे कोठार अशी ओळख असलेल्या याच तुमसर शहराजवळच सुमारे १७ किलोमीटर अंतरावर सिंदपूरी गावात या कंपनीची सुरुवात झाली, जी आज परिसरातील शेतकऱ्यांसाठी प्रेरणास्थान बनली आहे.

तुमसर ऑईल प्रोसेस शेतकरी उत्पादक कंपनीच्या स्थापनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांच्या उत्पादनांना योग्य बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि शाश्वत शेतीला प्रोत्साहन देणे हा आहे.

वाटचाल –

✻ महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ (MCDC) ने कंपनीच्या स्थापनेसाठी आर्थिक आणि तांत्रिक सहाय्य केले. नाबार्ड आणि इतर संस्थांशी समन्वय साधून अनुदान आणि कर्ज मिळवण्यासाठी मदत केली. शेतकऱ्यांना सहकारी तत्त्वांवर आधारित व्यवसाय कसा चालवावा याबाबत मार्गदर्शन केले. विपणन आणि बाजारपेठ विस्तारासाठी सल्ला आणि संसाधने उपलब्ध करून दिली.

✻ तुमसरमधील शेतकऱ्यांनी दूध संकलन, पशुखाद्य पुरवठा आणि उत्पादन प्रक्रियेत योगदान दिले. स्थानिक शेतकऱ्यांनी कंपनीचे सभासद म्हणून नोंदणी केली आणि सामूहिक प्रयत्नांनी व्यवसायाला पुढे नेले.

✻ नाबार्डने शेतकरी उत्पादक कंपनीला रु.३३ लाखाचे अर्थसहाय्य आणि नॅबकिसान कडून १५ लाख रुपयाचे कर्ज सुविधा उपलब्ध करून दिल्या. त्यांच्या योजनांद्वारे कंपनीला व्यवसाय विस्तारासाठी भांडवल मिळाले, ज्यामुळे नवीन उत्पादने आणि बाजारपेठ विकास शक्य झाला.

✻ स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी कंपनी नोंदणीसाठी आवश्यक परवानग्या आणि कागदपत्रे पूर्ण करण्यात मदत केली. काही तज्ज्ञांनी उत्पादन प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विपणन याबाबत सल्ला दिला, ज्यामुळे उत्पादनांची गुणवत्ता आणि बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढली.

तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनीने आपले कामकाज सुरू करण्यासाठी टप्प्याटप्प्याने आणि नियोजित पद्धतीने प्रक्रिया राबवली. कंपनीने २९ वर्षांकरिता संचालक मंडळातील सदस्यांकडून जागा लीज करून कामकाजाला सुरुवात केली. स्थानिक शेतकऱ्यांना एकत्र आणले आणि शेतकरी उत्पादक कंपनी (FPO) स्थापनेची संकल्पना मांडली. यासाठी त्यांनी शेतकऱ्यांना एकत्रित कामाचे फायदे आणि सेंद्रिय शेती तसेच मूल्यवर्धीत उत्पादनांचे महत्त्व समजावून सांगितले.

उत्पादन – गाईच्या शेणाचा उपयोग करून गांडुळ खत व स्वच्छता उत्पादने (फ्लोअर क्लिनर, हॅण्ड वॉश, टॉयलेट क्लिनर, अगरबत्ती) निर्मिती सुरू केली. यासाठी शेतकऱ्यांकडून शेण संकलित करून छोट्या प्रमाणात लीज केलेल्या जागेवर गांडुळ खत उत्पादन युनिट स्थापन केले. तांत्रिक ज्ञानाचा उपयोग करून खताची गुणवत्ता सुधारली आणि त्याचे पॅकेजिंग आकर्षक केले. कंपनीने ''स्वप्नपुर्ती'' या ब्रॅन्डखाली जिल्हा आणि राज्यस्तरीय बाजारपेठांमध्ये आपली उत्पादने पोहोचवण्यास सुरुवात केली.

✻ कंपनीने गांडुळ खत, तेलबियाणे साठवणुक, धान पीक साठवणूक आणि धान स्वच्छ करण्यासाठी स्वतंत्र युनिट्स स्थापन केले. यासाठी स्थानिक स्तरावर छोटे गोडाऊन उभारले गेले, तिथे शेतकरी आणि स्थानिक तरुणांना रोजगार मिळाला.

✻ कंपनीने ''परंपरागत कृषी विकास योजना'' (PKVY) अंतर्गत सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी १० ड्रम थेरी, शेतबांधावरील प्रयोगशाळा तयार केली. यात विविध प्रकारचे सेंद्रिय निविष्ठा (जसे - हुमिक ॲसिड द्रावण, फुलविक ॲसिड द्रावण, सूडोमोनास, एझोटोबॅक्टर आणि ट्रायकोडर्मा इत्यादी) तयार करून त्यांचे प्रमाणीकरण करण्यात आले. ''स्वप्नपूर्ती'' ब्रँड खाली निमास्त्र (नीम ऑईल), त्रिशूल टोनिक

(मायक्रो न्यूट्रीएंट्स), हिरा (हुमिक ॲसिड) काला डॉन (९८% पोटॅशियम ह्युमेट) इत्यादी उत्पादने स्थानिक बाजारपेठांपासून सुरुवात करून हळूहळू जिल्हा आणि राज्यस्तरीय बाजारपेठांमध्ये पोहोचवली. eNAM, ONDC, GeM आणि Amazon सारख्या डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करून कंपनी अंतर्गत तयार केलेल्या उत्पादनांची विक्री वाढवली गेली.

* दुध संकलन, गांडुळ खत आणि तेल प्रक्रिया युनिटमधून शेतकऱ्यांना नियमित उत्पन्न मिळू लागले. कंपनीच्या नफ्याचा वाटा सभासदांमध्ये वितरित केला गेला.

* नाबार्ड आणि कृषी विभागाच्या अनुदानातून यंत्रसामुग्री आणि स्टोरेज युनिट्स उभारणी करण्यात आली. स्थानिक स्तरावर छोट्या प्रमाणात प्रक्रिया युनिट्स उभारली गेली, ज्यामुळे प्रारंभिक खर्च कमी झाला.

इक्विटी ग्रँट –

कंपनीला गांडुळ खत आणि तेल प्रक्रिया युनिटसाठी टर्म लोन आणि अनुदान मिळाले . तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनीला इक्विटी ग्रँट अंतर्गत सभासदांनी गोळा केलेल्या भांडवलाच्या बरोबरीने रु.१५ लाख रुपयांपर्यंत समभाग मिळाले, ज्यामुळे कंपनीची आर्थिक ताकद वाढली. क्रेडिट गॅरंटी फंड (CGF) अंतर्गत रु.१ कोटी पर्यंतच्या कर्जासाठी ८५% गॅरंटी मिळाली .

* **परंपरागत कृषी विकास योजना** (PKVY) **आणि सेंद्रिय शेती योजना** : सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रति हेक्टर रु.२५,००० अनुदान मिळाले. सेंद्रिय उत्पादनांसाठी Participatory Guarantee System (PGS) आणि तृतीय-पक्ष प्रमाणन मिळवण्यासाठी सहाय्य. सेंद्रिय उत्पादनांच्या विपणनासाठी बाजारपेठ जोडणी केली.

* कंपनीने आपल्या कामकाजाच्या विस्तारासाठी आणि शेतमालाच्या साठवणुकीसाठी **''राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन''** (NFSM) अंतर्गत गोडाऊन स्कीमचा लाभ घेतला. कृषी पायाभूत सुविधा निधी (AIF) अंतर्गत कमी व्याजदराचे कर्ज आणि ३% व्याज अनुदान मिळाले, ज्यामुळे गोडाऊन बांधकामाचा आर्थिक भार कमी झाला.

सद्यस्थिती –

कंपनीने दुग्ध संकलनापासून सुरुवात करून गांडुळ खत, तेलबियाणे, तांदूळ, गहू, व इतर पिकांची खरेदी विक्री आणि स्वच्छता उत्पादनांपर्यंत आपला व्यवसाय विस्तारला आहे. कंपनीने स्थानिक बाजारपेठांपासून प्रादेशिक आणि काही प्रमाणात राज्यस्तरीय बाजारपेठांपर्यंत आपली उत्पादने पोहोचवली आहेत. eNAM, ONDC, GeM, Amazon आणि स्थानिक बाजार समिती यांसारख्या डिजिटल आणि पारंपारिक प्लॅटफॉर्मचा उपयोग करून विक्री वाढवली आहे. कंपनीने सध्या NFSM गोडाऊन स्कीम, नाबार्ड NABKISAN क्रेडीट लिंकेज, मॅनेजमेंट कॉस्ट, इक्विटी ग्रँट, AIF आणि मुख्यमंत्री कृषी आणि अन्न प्रक्रिया योजना यांचा लाभ घेत आहे. या योजनांमुळे यंत्रसामुग्री, गोदाम आणि प्रक्रिया युनिटसाठी निधी उपलब्ध झाला आहे.

तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनी अंतर्गत खालील उपक्रम राबवली जात आहेत.

* गाईच्या शेणापासून गांडुळ खत (Vermicompost) तयार करणे आणि ''परंपरागत कृषी विकास योजना'' (PKVY) अंतर्गत सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देणे.

* मोहरी, जवस आणि इतर तेलबियांपासून खाद्यतेल आणि उप-उत्पादनांची निर्मिती.

* पर्यावरणपूरक स्वच्छता उत्पादने आणि अगरबत्ती यांची निर्मिती.

* NFSM गोडाऊन स्कीम अंतर्गत आधुनिक गोदाम बांधून तेलबिया, गांडुळ खत आणि स्वच्छता उत्पादनांची सुरक्षित साठवणूक.

* सभासद आणि स्थानिक शेतकऱ्यांसाठी सेंद्रिय शेती, तेल प्रक्रिया, गोडाऊन व्यवस्थापन आणि विपणन याबाबत नियमित प्रशिक्षण कार्यशाळा.

उलाढाल –

तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनीला ३ वर्षे झाले असून कंपनीची पहिल्या आर्थिक वर्षातील उलाढाल ही रु.३५ लाख आणि दुसऱ्या आर्थिक वर्षातील उलाढाल ही रु२.५ कोटी आहे. सभासद संख्या ७५० एवढी आहे.

* कंपनीला इक्विटी ग्रँट अंतर्गत रु. १५ लाख समभाग निधी आणि मॅनेजमेंट कास्ट रु.१८ लाख पत हमी मिळाली. त्यामुळे सन २०२५ -२०२६ मध्ये उलाढाल रु. ४.०० कोटी अपेक्षित आहे.

उत्पादने

* तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनी आपली सर्व उत्पादने जसे गांडुळ खत, फ्लोअर क्लिनर, हॅण्ड वॉश, टॉयलेट क्लिनर, अगरबत्ती आणि सेंद्रिय निविष्ठा जसे हुमिक ॲसिड द्रावण, फुलविक ॲसिड द्रावण, सूडोमोनास, एझोटोबॅक्टर आणि ट्रायकोडर्मा इत्यादी ''स्वप्नपूर्ती'' या ब्रँड खाली विक्री करण्यात येत आहे.

भविष्यातील नियोजन

कंपनी मेगा फुड पार्क आणि प्रक्रिया उद्योग यासारख्या मोठ्या प्रकल्पांमध्ये सहभागी होण्याचे नियोजन करत आहे. सेंद्रिय उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत प्रवेश करण्याचा विचार आहे. स्थानिक तरुण आणि महिलांना अधिक रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी नवीन उत्पादने, हर्बल उत्पादने, बायो पेस्टिसाईड सुरू करण्याचे नियोजन आहे. स्मार्ट प्रकल्प आणि AIF यांसारख्या योजनांचा लाभ घेऊन प्रक्रिया युनिट्सचे आधुनिकीकरण आणि क्षमता वाढवण्यावर भर आहे. संस्थेस सन २०२७ -२८ मध्ये ५ वर्ष पुर्ण होईल तेव्हा १००० सभासद संख्या व रु.१०.०० कोटी उलाढाल करण्याचे उदिष्ट ठरविण्यात आलेले असुन त्या दृष्टीने आमची टीम कार्य करीत आहे.

ब्रँड/उत्पादने –

गांडुळखत 1 Kg पॅकेजिंग, भुसुधारक 50 Kg पॅकेजिंग, गांडुळखत

कंपनीमार्फत विविध गावातील शेतकरी सभासदांना ढेंचा वाटप करण्यात आले. बियाणे वितरीत करताना श्री. शशिकुमार तोरणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनी.

तुमसर ऑईल प्रोसेस फार्मर प्रोड्युसर कंपनीमार्फत शेतकरी सभासदांना धान्य बियाणे वाटप करताना कंपनीचे अध्यक्ष श्री. पवन कटनकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. शशिकुमार तोरणकर व तालुका समन्वयक MCDC श्री. तुषार सपाटे उपस्थित शेतकरी सभासद.

30 Kg पॅकेजिंग, फ्लोअर क्लिनर, हॅण्ड वॉश, डिश वॉश, धूप स्टिक, दंत मंजन, अगरबत्ती, जवस तेल, नीम ऑईल, पोटॅशियम ह्यूमेट, हिरा ह्यूमिक ऍसिड, त्रिशूल मायक्रो न्यूट्रीएंट्स.

८. उद्घाटन –

राष्ट्रीय अन्न सुरक्षा मिशन योजने अंतर्गत गोदाम, परंपरागत कृषी विकास योजने अंतर्गत शेतकरी उत्पादक कंपनी स्तरावरील जैविक निविष्ठा निर्मिती केंद्र व १० ड्रम थेरी युनिट चे उद्घाटन जिल्हाधिकारी भंडारा मा. डॉ.. संजय कोलते सर, माजी जिल्हाधिकारी भंडारा व व्यवस्थापकीय संचालक (महाबीज) मा. श्री. योगेश कुंभेजकर सर यांचे प्रमुख उपस्थितीत पार पाडण्यात आला.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून कृषी विभागाचे श्री. उमेश घाटगे विभागीय कृषी सहसंचालक नागपूर, प्रज्ञा गोळघाटे विभागीय नोडल अधिकारी (स्मार्ट) नागपूर, संगिता माने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी भंडारा, पद्माकर गिदमारे उप विभागीय कृषी अधिकारी भंडारा, उर्मिला चिखले प्रकल्प संचालक आत्मा भंडारा, सचिन खैरनार नोडल अधिकारी (स्मार्ट) भंडारा, शांतीलाल गायधने पुरवठा व मुल्य विकास व मुल्य साखळी तज्ञ (स्मार्ट) भंडारा तसेच तुमसर फार्मर प्रोड्युसर कंपनी लिमीटेड, चे संचालक सोबतच कंपनीचे सर्व सभासद, पदाधिकारी व शेतकरी मित्र उपस्थित होते.

बीडी धुमाळ कृषी पायाभुत सुविधा व मुल्यवर्धन साखळी

पान क्र. २४ वरून

ग्रामीण भागातील शेतकरी बांधवासाठी कृष्णाई कृषि प्रक्रिया सहकारी संस्था स्थापन करण्यात आलेली असून शेतमालावर प्राथमिक व इतर प्रक्रिया करून त्यांचे ३ ते ५ टक्के मूल्यवर्धन करून आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्वोतोपरी मदत करण्यात येणार आहे.

प्रकल्प भविष्यामध्ये चौधरी चरणसिंग राष्ट्रीय कृषी विपणन संस्था जयपूर (CCNIAM), गोखले राज्यशास्त्र व अर्थ शास्त्र संस्था (GIPE) पुणे, टाटा सामाजिक विज्ञान संस्था (TISS), वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आदी संस्थांबरोबर कृषी विपनन अध्ययनासाठी सामंजस्य करार करणार असून विद्यार्थ्यांसाठी कृषी विपनन अभ्यास केंद्र स्थापन करणार आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेत सांगितल्याप्रमाणे. ''उच्चतेतून उत्कृष्टतेकडे व कृषी मूल्यवर्धन साखळीतून ग्रामीण भागात आर्थिक सामाजिक विकासाकडे'', हा मंत्र घेऊन अनेक अडचणींवर मात करुन प्रकल्प मार्ग क्रमण करत आहे. प्रकल्पाला अनेक क्षेत्रातील मान्यवरांनी सदिच्छा भेटी देऊन सहकार्य व मार्गदर्शन केलेले आहे. निश्चितच सदरील प्रकल्पाने तेलगांव (बु.) सारख्या ग्रामीण भागात यशस्वी गरुडझेप घेऊन ग्रामीण भागातील नवउद्योजक, बेरोजगार तरुण व युवक यांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करून एक प्रमाणिक वाटाडा म्हणून आपली भूमिका निभावलेली आहे.

भाडेकराराद्वारे गोदाम व्यवसायातून उत्पन्नाचे व्यवस्थापन

मंगेश तिटकारे
प्रशांत चासकर

शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनामार्फत मध्यस्थांची साखळी कमी करण्यासाठी कृषी मूल्य साखळ्यांवर आधारित विविध योजना व प्रकल्प सुरु करण्यात आले आहेत. बाजारपेठेत ज्या विविध पिक आधारित मूल्य साखळ्या आहेत, त्या प्रस्थापित कृषीमूल्य साखळ्यांमध्ये प्रवेश करण्यासाठी समुदाय आधारित संस्था म्हणजेच सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपनी व महिला बचत गटांचे फेडरेशन यांचेमार्फत व्यवसाय उभारणीच्या दृष्टीने अवलंब करण्यात येणाऱ्या विविध पर्यायांपैकी गोदाम पावती व्यवसाय सुरु करणे, हा सद्यस्थितीत योग्य पर्याय आहे. त्याचप्रमाणे उभारणी केलेल्या गोदामांना गोदाम पावती व्यतिरिक्त इतर व्यवसाय जसे की गोदाम भाड्याने देणे अथवा इतर उद्योगांसोबत करार करणे हे सुद्धा पर्याय शोधून त्याचा अवलंब करू शकतात. गोदाम भाड्याने देणे हा पर्याय कृषि व कृषि व्यतिरिक्त सर्व क्षेत्रातील गोदाम मालकांपुढे एक उत्तम पर्याय असू शकतो. परंतु गोदाम भाडे देखील पुरेसे मिळणे गरजेचे असते. गोदाम भाडे हे गोदामाचे ठिकाण, उद्योगाच्या साठवणुकीची गरज, उद्योगाचा प्रकार इत्यादी अनेक घटकांवर अवलंबून असते.

गोदामांचे विविध प्रकार आहेत. हे प्रकार विविध उद्देशाने तयार केलेले असतात व त्यानुसार गोदामाचे भाडे सुद्धा ठरविले जाते. गोदामांचे गोदामाची मालकी, त्यांची कार्ये आणि त्यातील तंत्रज्ञान यानुसार वर्गीकरण केलेली विशेष साठवण सुविधा असून हि सुविधा कोणत्याही पुरवठा साखळीला अनुकूल व कार्यान्वित करण्यासाठी वापरली जाते. या प्रकारांमध्ये खाजगी व सार्वजनिक गोदामे, बंध अथवा बॉन्डेड गोदामे, स्मार्ट (स्वयंचलित) गोदामे, हवामान-नियंत्रित (कोल्ड स्टोरेज) गोदामे अथवा शितगृहे, सर्व प्रकारच्या एकत्रित सुविधा असलेली गोदामे आणि वितरण केंद्रे यांचा समावेश होतो. कच्च्या मालापासून अंतिम उत्पादनांपर्यंतच्या मालाची साठवणूक, वितरण आणि पुरवठा साखळीच्या गरजा पूर्ण करण्याच्या अनुषंगाने या सुविधांचे व्यवस्थापन गोदामांच्या माध्यमातून केले जाते.

खाजगी गोदामे : उत्पादक, वितरक किंवा किरकोळ पुरवठादार हे पुरवठा साखळीतील घटक त्यांच्या स्वतःच्या उत्पादनांसाठी स्वतःच्या मालकीचे गोदाम चालवितात व त्यावर नियंत्रण देखील ठेवतात.

सार्वजनिक गोदामे : ही गोदामे तृतीय-पक्ष सेवापुरवठादार संस्थांच्या मालकीची असतात. मासिक किंवा व्यवहाराच्या आधारावर ही गोदामे विविध व्यवसायांना भाड्याने दिली जातात. अल्पकालीन साठवणूक अथवा दिर्घकालीन साठवणुकीच्या उद्देशाने उत्पादने साठविण्याची लवचिकता या गोदामांच्या माध्यमातून व्यवसायिकांना मिळते.

बंधकारक गोदामे अथवा बॉन्डेड गोदामे : सीमाशुल्क आणि कर भरेपर्यंत आयात केलेल्या वस्तू साठविण्यासाठी सरकारने अधिकृत केलेल्या सुरक्षित सुविधा असणारी ही गोदामे असतात.

स्मार्ट गोदामे : उत्पादनांचे साठवणूक व्यवस्थापन आणि उत्पादनांची पूर्तता स्वयंचलितपणे करण्यासाठी एआय, ड्रोन आणि रोबोटिक्ससह (एजीव्ही) प्रगत तंत्रज्ञानाचा वापर या गोदामांमध्ये केला जातो.

हवामान-नियंत्रित गोदामे (थंड साठवणूक): अन्न, औषधे किंवा रसायने यासारख्या नाशवंत वस्तू साठविण्यासाठी रचना केलेले, अचूक तापमान आणि आर्द्रता नियंत्रणांसह सुविधा असलेली ही गोदामे आहेत.

उत्पादनांच्या एकत्रित उद्देशाने निर्मिती केलेली गोदामे: अनेक पुरवठादारांकडून लहान शिपमेंट म्हणजेच कमी प्रमाणात उत्पादने गोळा करणे आणि एकाच ठिकाणी पाठविण्यासाठी त्यांना मोठ्या, किफायतशीर भागांमध्ये एकत्र करणे, हे कार्य या पद्धतीच्या गोदामांमध्ये चालते.

वितरण केंद्रे: जलद उलाढालीसाठी रचना केलेली ही केंद्रे किरकोळ विक्रेत्यांना किंवा ग्राहकांना उत्पादन वितरित करण्यापूर्वी थोड्या काळासाठी उत्पादने साठविण्यावर लक्ष केंद्रित करण्याच्या उद्देशाने यांची रचना केलेली असते.

इतर सामान्य प्रकारांमध्ये सहकारी गोदामे (सदस्यांच्या मालकीची, जसे की शेतकरी संघ वगैरे) आणि सरकारी गोदामे यांचा समावेश होतो.

ई-कॉमर्स आणि थर्ड पार्टी लॉजिस्टिक कंपन्यांकडून गोदामातील माल साठवणुकीकरीता जागेची मागणी पुरवठ्यापेक्षा जास्त असल्याने गोदाम कंपन्यांना आजच्या परिस्थितीत दुहेरी धक्का बसला आहे. एकीकडे गोदामांच्या भाड्यात कोणतीही वाढ होत नसून जमीनीचे दर आणि त्यावर गोदाम बांधकाम खर्च मात्र वाढत आहे, ज्यामुळे गोदामांच्या भाड्याच्या माध्यमातून मिळणाऱ्या नफ्यावर दबाव वाढत आहे. परिणामी गोदाम कंपन्या नफा आणि उत्पन्नात वाढ याचा ताळमेळ राखण्यासाठी बाह्यस्त्रोताच्या माध्यमातून भांडवलाकडे वळत आहेत. या क्षेत्रातील निरीक्षकांचे असे म्हणणे आहे की, गोदाम चालकांना नफा मिळविण्यासाठी भाडेवाढ अखेर करावी लागेल, परंतु जरी या क्षेत्रात स्पर्धा निर्माण झाली, तरी या क्षेत्रातील होणाऱ्या कोणत्याही तीव्र सुधारणांना असंघटित कंपन्यांकडून प्रतिबंध होऊ शकतो. आर्थिक वर्ष २०२५ च्या पहिल्या सहामाहीत संपूर्ण भारतात सरासरी गोदाम भाडे २२ रुपये प्रति चौरस फूट (पीएसएफ) होते, जे वेस्टियन संस्थेच्या मते २०२२ च्या पहिल्या सहामाहीत २० रुपये प्रति चौरस फूट (पीएसएफ) होते. यात काही शंका नाही की, गोदाम व्यवसायातील मार्जिनवर म्हणजेच मिळणाऱ्या निव्वळ नफ्यावर दबाव वाढत आहे. त्यामुळे विकसकांना आता भाडे वाढवावे लागणार आहे. दरम्यान,

आर्थिक वर्ष २०२४ मध्ये या क्षेत्रात खाजगी इक्विटी गुंतवणूक १५० टक्क्यांनी वाढली असून गुंतवणूक करणाऱ्या विविध गुंतवणूकदार संस्था त्यांचा पैसा गुंतवणूक केल्यानंतर त्यावर विश्वासार्ह परतावा कसा मिळेल, याकरीता अभ्यास करून त्यावर नफा कमविण्याचा प्रयत्न करीत आहे. यावरून असे दिसून येते की किंमतीत वाढ होत असूनही नफा कमाविण्यासाठी विकसकांना या क्षेत्रात गुंतवणूक करण्यासाठी बाहेरील निधीची अत्यंत आवश्यकता आहे, असे या क्षेत्रातील नावाजलेले तज्ञ तसेच ॲनारॉक ग्रुपचे रिटेल, वेअरहाऊसिंग आणि लॉजिस्टिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक अनुज केजरीवाल यांचे म्हणणे आहे.

अधिक भांडवल मिळविण्यासाठी काही विकसक रिअल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (रेल्ट्स), इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (इनव्हिट्स) किंवा अगदी स्टॉक एक्सचेंज लिस्टिंगचा देखील शोध घेत आहेत. आतापर्यंत, दोन वेअरहाऊसिंग इन्व्हिट्स जसे की टीव्हीएस इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्ट आणि एनडीआर इन्व्हिट- या दोन्ही संस्था स्टॉक एक्सचेंजवर लिस्टेड आहेत. नाईट फ्रँक इंडिया या संस्थेच्या मते, वेअरहाऊसिंग हे क्षेत्र दिर्घकालीन संस्थात्मक भांडवलाला सातत्याने आकर्षित करीत असून, २०१७ पासून या क्षेत्रात १० अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त गुंतवणूक झाली आहे. आर्थिक वर्ष २०२४ मध्ये, औद्योगिक आणि वेअरहाऊसिंग विभागात खाजगी इक्विटी गुंतवणूक वाढली असून ही गुंतवणूक सन २०२३ मध्ये आलेल्या गुंतवणूकीच्या जवळजवळ तिप्पट होती. कोलियर्स संस्थेच्या मते, या क्षेत्रात २.५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित झाली असून ही गुंतवणूक रिअल इस्टेट किंवा बांधकाम क्षेत्रामधील एकूण गुंतवणूकीच्या ३९% आहे. नाईट फ्रँक इंडिया या संस्थेच्या मते, सन २०२५ च्या पहिल्या सहामाहीत या विभागात खाजगी इक्विटी गुंतवणूक ५० दशलक्ष डॉलर्स होती. ट्रान्सइंडिया रिअल इस्टेट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. राम वळसे यांच्या मते, अनेक डेव्हलपर्स जास्तीत जास्त परतावा मिळविण्यासाठी रिल्ट / इनव्हिट या प्रणालीच्या मार्गाचा अवलंब करीत असून काही विकसक स्टॉक एक्सचेंजेसवर थेट लिस्टिंगचा देखील प्रयत्न करीत आहेत.

भारतीय गोदाम बाजारपेठेचे प्रमुख पैलू

२०२६ च्या सुरुवातीपर्यंत, भारतातील गोदामांचे भाडे दुसऱ्या स्तरावरील (Tier 2) शहरांमध्ये ₹१०-₹३० प्रति चौरस फूट तर मुंबई, पुणे आणि दिल्ली सारख्या उच्च श्रेणीतील शहरांमध्ये ग्रेड ए सुविधांसाठी ₹२०-₹५० प्रति चौरस फूटापर्यंत होते. या क्षेत्रात पुणे सध्या सर्वात महाग बाजारपेठ असून ग्रेड ए गोदामाचे भाडे हे सरासरी ₹२५ प्रति चौरस फूटापेक्षा जास्त आहे. लहान, प्रमाणित नसलेल्या शेडचे सुमारे ₹१०-₹१५ चौरस फूटापासून भाडे सुरू असून ग्रेड-ए लॉजिस्टिक्स पार्कमध्ये हे भाडे ₹१५ ते ₹२५ / चौरस फूटापर्यंत असते. तसेच उच्च दर्जाच्या प्रिमीयम व अतिउच्च-सुरक्षा असलेल्या गोदाम युनिट्सचे ₹५० प्रति चौरस फूटापेक्षा जास्त भाडे असू शकते. गोदाम भाडे खर्चात पुणे आघाडीवर असून अंदाजे सरासरी ₹२५.९ प्रति चौरस फूट भाडे या ठिकाणी असून त्यानंतर कोलकाता ₹२३.६ प्रति चौरस फूट आणि मुंबई ₹२३.४ प्रति चौरस फूट असे भाडे या ठिकाणी सुरु आहे.

गोदाम भाडे वाढीचे घटक-

सन २०२४ च्या पहिल्या सहामाहीत भाड्यामध्ये मोठी वाढ नोंदविली गेली असून पुणे, चेन्नई आणि अहमदाबादमध्ये ग्राहकांच्या उच्च मागणीमुळे गोदाम भाड्यात सर्वाधिक वाढ झाली आहे.

गोदामांची मागणी व प्रमुख घटक: गोदामांची मागणी प्रामुख्याने ई-कॉमर्स, थर्ड-पार्टी लॉजिस्टिक्स (3PL) आणि विविध उत्पादन करणाऱ्या कंपन्या यांसारख्या क्षेत्रातील कंपन्यांकडून होत असून आवश्यक उच्च-गुणवत्तेच्या, तंत्रज्ञान क्षेत्रातील सक्षम अ दर्जाच्या सेवा पुरविणाऱ्या कंपन्यांची संख्या वाढल्यामुळे देखील गोदामांच्या मागणीत वाढ होत आहे.

गोदामाचे मोक्याचे स्थान असलेली ठिकाणे व परिणाम: गोदामांची मागणी उत्पादन तयार होणाऱ्या अथवा वितरण क्षेत्राच्या जवळ असल्याने गोदाम भाड्यावर त्याचा मोठा परिणाम होतो. शहराजवळील गोदामांच्या किमती बाहेरील भागांच्या तुलनेत जास्त असतात.

प्रादेशिक भाड्यातील फरक (अंदाजे)

टियर-१ / क्रमांक १ स्तर असणारी शहरे (मुंबई, दिल्ली, बंगळुरू): ₹२० - ₹५० प्रति चौरस फूट / महिना.

टियर-२ / क्रमांक २ स्तर असणारी शहरे (पुणे, कोइम्बतूर): ₹१० - ₹३० प्रति चौरस फूट / महिना.

पुणे (विशिष्टता): श्रेणी अ: ₹२५-३१ / चौरस फूट; श्रेणी ब: ₹१५-२५ / चौरस फूट..

भाड्यावर परिणाम करणारे घटक

ग्रेड अ विरुद्ध श्रेणी ब: श्रेणी अ, ज्यामध्ये अग्निसुरक्षा, उंच छत आणि डॉकिंग सारख्या सुविधांचा समावेश आहे, अशा गोदामांना लक्षणीय प्रीमियम किंवा भाड्याचा उत्तम दर मिळतो.

लॉजिस्टिक्स कनेक्टिव्हिटी अथवा सुलभ दळणवळण: प्रमुख महामार्गांजवळील ठिकाणे (उदा. मुंबई-पुणे एक्सप्रेस-वे) किंवा औद्योगिक केंद्रे (उदा. चेन्नईमधील ओरागडम) येथे गोदामाला भाडे जास्त असते.

तंत्रज्ञान आणि सुरक्षा: वेअरहाऊस मॅनेजमेंट सिस्टम्स (WMS), इंटरनेट ऑफ थिंग्स (IoT) सेन्सर्स आणि प्रगत सुरक्षा असलेल्या गोदामांची किंमत जास्त असते.

बिल्ट-टू-सूट (BTS): विशिष्ट भाडेकरूंसाठी कस्टम-बिल्ट गोदामे बहुतेकदा दीर्घकालीन भाडेपट्टा (१०+ वर्षे) आणि उच्च, स्थिर भाडे परतावा देतात.

भारतातील गोदाम भाडे दरावर परिणाम करणारे घटक:

१. स्थान:
२. आकार:
३. सुविधा:
४. भाडेपट्टा अटी:
५. बाजार परिस्थिती:
६. आर्थिक घटक:
७. नियामक अनुपालन:
८. पायाभूत सुविधा:
९. सुरक्षा:
१०. जमिनीच्या वापरावरील निर्बंध:
११. निवासी क्षेत्रांच्या जवळ:
१२. नैसर्गिक आपत्ती

(लेखक : १. महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्या., पुणे चे व्यवस्थापकीय संचालक आहेत.
२. शेतमाल तारण व्यवस्थापन सेवा तज्ज्ञ, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, स्मार्ट प्रकल्प, म.स.वि.म.पुणे)

केंद्रीय अर्थसंकल्प : अर्थव्यवस्थेची ऐतिहासिक वाटचाल आणि सहकाराचे नवे क्षितिज

गणेश निमकर

'नेमेचि येतो पावसाळा' या उक्तीप्रमाणे दरवर्षी फेब्रुवारी महिन्यात केंद्रीय अर्थसंकल्प जाहीर केला जातो आणि संपूर्ण देशाचे लक्ष या एका दस्तऐवजाकडे लागलेले असते. समाजातील प्रत्येक घटकाला मग तो वैयक्तिक करदाता असो की एखादी व्यावसायिक संस्था, या अंदाजपत्रकाबाबत प्रचंड उत्सुकता असते. प्रत्येकाच्या अपेक्षा व्यक्तिसापेक्ष असतात; प्रत्येकाला जाणून घ्यायचे असते की यातून 'मला नेमकं काय मिळणार आणि मी काय गमावणार?' मात्र, हा विचार करताना आपण अनेकदा केवळ तात्कालिक परिणामांचाच विचार करतो. खऱ्या अर्थाने विचार करायचा झाला, तर अर्थसंकल्पाचे दीर्घकालीन आणि अदृश्य परिणाम आपल्या व्यवसायवृद्धीवर किंवा वैयक्तिक आयुष्यावर कसे होणार, हे समजून घेणे महत्त्वाचे असते. अंदाजपत्रकाला नेहमीच दोन बाजू असतात आणि ज्या बाजूने आपण त्याकडे पाहतो, तशीच प्रतिमा आपल्याला दिसत असते. राजकीय प्रतिक्रिया नेहमीच एकांगी असल्या, तरी 'संकल्प' या शब्दाचा खरा अर्थ म्हणजे 'निर्णय'. माणसाच्या निर्णयक्षमतेला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि हाच निर्णय जेव्हा देशाच्या तिजोरीबाबत घेतला जातो, तेव्हा तो कोट्यवधी लोकांचे भविष्य ठरवतो.

❊ अर्थसंकल्पाची सुरूवात –

विशिष्ट आर्थिक परिस्थितीने लादलेल्या मर्यादांनुसार जमा-खर्चाची तोंडमिळवणी करण्याची कला म्हणजे अर्थसंकल्प. ही केवळ सरकारची जबाबदारी नाही, तर प्रत्येक व्यक्तीला आणि संघटनेला स्वतःचा अर्थसंकल्प आखावा लागतो. शासनाच्या बाबतीत बोलायचे झाले, तर पुढील आर्थिक वर्षातील शासकीय जमा-खर्चाचे वार्षिक विवरणपत्र म्हणजे अर्थसंकल्प होय. याला इंग्रजीमध्ये 'बजेट' असे म्हणतात, ज्याचा उगम १७३३ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. भारताच्या अर्थसंकल्पीय प्रवासाची सुरुवात स्वातंत्र्यापूर्वीच ७ एप्रिल १८६० रोजी जेम्स विल्सन यांनी केली होती. तर स्वतंत्र भारताचे पहिले बजेट २६ नोव्हेंबर १९४७ रोजी आर. के. षण्मुखम चेट्टी यांनी मांडले.

❊ अर्थसंकल्पाचे दोन मुख्य भाग –

भारत सरकारचा अर्थसंकल्प मुख्यत्वे दोन भागात विभागलेला असतो : महसुली आणि भांडवली. महसुली विभागात प्रशासकीय खर्च कर, व्याज आणि लाभांश यांचा समावेश होतो, तर भांडवली विभागात नवीन मालमत्ता निर्माण करण्यासाठी होणारा खर्च आणि कर्ज उभारणीचा विचार केला जातो. जेव्हा खर्च उत्पन्नापेक्षा जास्त असतो. तेव्हा 'तुटीचा अर्थसंकल्प' जन्म घेतो, जो भारतासारख्या विकसनशील देशासाठी आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी एक आवश्यक साधन मानला जातो.

यंदाचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प जेव्हा सादर झाला, तेव्हा तो केवळ आकडेवारीचा खेळ नव्हता तर तो 'विकसित भारत' घडवण्याच्या दिशेने टाकलेले एक खंबीर पाऊल होते.

❊ कृषी क्षेत्रासाठी विक्रमी तरतूद –

यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रासाठी १,६२,६७१ कोटी रुपयांची विक्रमी तरतूद करण्यात आली आहे, जी ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी महत्त्वाची ठरेल. पीएम किसान सन्मान निधीसाठी ६३,५०० कोटी आणि पीक विम्यासाठी १५,००० कोटी रुपयांची तरतूद हे सिद्ध करते, की सरकारचा रोख कृषी सक्षमीकरणावर आहे. विशेषतः 'कृषी पायाभूत सुविधा निधी' (AIF) अंतर्गत काढणीपश्चात व्यवस्थापनासाठी (Post-harvest management) दिलेला भर आणि 'नॅचरल फार्मिंग'साठी १ कोटी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्याचा निर्णय ग्रामीण भागात नवीन आर्थिक समीकरणे मांडणार आहे. शेतकरी आता केवळ अन्न पिकवणारा घटक राहिला नसून तो 'ऊर्जादाता' आणि 'उद्योजक' बनत आहे. 'पीएम-कुसुम' आणि सौर ऊर्जेच्या योजनांमुळे शेतकरी स्वतःची वीज निर्माण करून ती विकू शकणार आहेत, ज्यामुळे त्यांच्या शाश्वत उत्पन्नात मोठी वाढ होईल.

❊ ठेवींचे प्रमाण वाढणे शक्य –

जेव्हा या विविध योजनांमुळे शेतकऱ्यांच्या खिशात जास्तीचे पैसे येतील, तेव्हा ग्रामीण भागातील आर्थिक संस्थांकडे येणारा ठेवींचा ओघही नक्कीच वाढणार आहे. मात्र, यासोबतच एक 'गोड' आव्हानही उभे ठाकले आहे. ते म्हणजे शेतकरी 'आत्मनिर्भर' झाल्यामुळे त्याला आता केवळ गरजा भागवण्यासाठी लागणाऱ्या 'खावटी कर्जाची' किंवा जास्त व्याजाच्या कर्जाची फारशी गरज उरणार नाही. शेतकऱ्यांच्या हातात खेळता पैसा वाढल्याने आर्थिक संस्थांना आता केवळ पारंपरिक सावकारी पद्धतीचे कर्जवाटप करून चालणार नाही. अशा वेळी आर्थिक संस्थांना 'डिजिटल क्रॉप लोन' आणि 'कृषी प्रक्रिया उद्योगांसाठी लागणाऱ्या नवीन कर्ज योजनांमध्ये बदल करून, शेतकऱ्यांच्या बदलत्या आधुनिक गरजांनुसार आपली उत्पादने नव्याने तयार करावी लागतील. थोडक्यात सांगायचे तर शेतकरी बदललाय, आता बँकांनी आणि पतसंस्थांनी स्वतःची जुनी 'कात' टाकणे गरजेचे आहे.

❊ 'एकमेकां सहाय्य करू आणि अपडेट राहू' –

सहकार क्षेत्राचा विचार करता, 'एकमेका साहाय्य करू' हे सूत्र आता डिजिटल युगात 'एकमेकां साहाय्य करू आणि अपडेट राहू' असे बदलले आहे. सहकारी बँका आणि पतसंस्थांसाठी हा अर्थसंकल्प आधुनिक 'शस्त्रे' घेऊन आला आहे. बँकिंग संरचनेसाठी नेमलेल्या उच्चस्तरीय समितीने दिलेला 'भांडवल सक्षमीकरणाचा' सल्ला आता केवळ कागदावर न राहता अनिवार्य झाला आहे. आता केवळ ओळखीच्या जोरावर संचालक बनणे किंवा नियमांना बगल देऊन कर्ज वाटप करणे शक्य होणार नाही.

व्यावसायिक व्यवस्थापन (Professional Management) ही आता अस्तित्वाची लढाई बनली आहे. डिजिटल इंडियाचा

वारा आता गावपातळीवरील छोट्या आर्थिक संस्थांपर्यंत पोहोचला असून, सरकारने अर्थसंकल्पात जाहीर केलेले 'डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर' (DPI) या संस्थांसाठी गेम चेंजर ठरणार आहे. ज्या संस्था आजही जुन्या पद्धतीवर अडून राहतील, त्यांना आधुनिक खासगी बँकांच्या 'चकाचक' ॲप्सशी स्पर्धा करणे कठीण जाईल. आजच्या तरुण पिढीला बँकिंग व्यवहारांसाठी शाखेत येण्यापेक्षा मोबाइलवर व्यवहार करणे अधिक भावते, त्यामुळे यूपीआय (UPI) आणि डिजिटल पेमेंट सेवांकडे वळणे ही आता सोय नसून गरज आहे. रिझर्व्ह बँकेचा 'डिजिटल रुपया' (CBDC) हा रोख हाताळणीचा खर्च कमी करण्यासाठी एक उत्तम पर्याय म्हणून समोर आला आहे. मात्र, या डिजिटल प्रवासात 'सायबर सुरक्षेसाठी' अर्थसंकल्पात केलेली तरतूद आणि डेटा संरक्षणाचे नियम पाळणे ही देखील प्रगतीचीच दुसरी बाजू आहे, हे या संस्थांनी विसरून चालणार नाही.

✻ सहकारी संस्थांना मोठा दिलासा? –

अर्थसंकल्पातील कर सवलतींनी सहकारी संस्थांना मोठा दिलासा दिला असला, तरी प्रत्यक्षात ही सवलत म्हणजे 'दिसतं तसं नसतं' या उक्तीप्रमाणेच आहे. आयकर कायद्याच्या कलम ८०पी (Section 80P) मध्ये केलेल्या सुधारणांमुळे लाभांशावर वजावट मिळून निव्वळ नफा वाढणार असला, तरी प्रशासकीय अंमलबजावणीचा पेच अजूनही सुटलेला नाही. कागदावर टॅक्स रिफंडची प्रक्रिया सोपी झाल्याचे भासले, तरी प्रत्यक्ष परिस्थिती आजही 'सरकारी काम आणि नऊ महिने थांब' अशीच आहे. अनेक सहकारी संस्थांना त्यांच्या हक्काचा इन्कमटॅक्स रिफंड मिळवण्यासाठी आजही न्यायालयाचे दरवाजे ठोठावून अक्षरशः 'वनवास' भोगावा लागतो. नवीन आयकर कायद्यात केवळ सवलतींची घोषणा करून चालणार नाही, तर त्यांच्या पारदर्शक आणि वेगवान अंमलबजावणीबद्दल स्पष्ट तरतूद असणे अपेक्षित आहे; अन्यथा या सवलती म्हणजे एखाद्या उपोषणकर्त्याला 'लवकरच जेवण मिळेल' असे आश्वासन देऊन ताट मात्र रिकामेच ठेवण्यासारखा प्रकार होईल. जर अंमलबजावणीत स्पष्टता नसेल, तर या सवलती फक्त सरकारी फाइल्सची शोभा वाढवतील आणि सहकारी संस्थांच्या पदरात मात्र 'तारीख पे तारीख'च पडत राहील.

✻ पशुधन आणि मत्स्य व्यवसायाला प्राधान्य –

ग्रामीण भागात पशुधन आणि मत्स्य व्यवसायाला जे प्रोत्साहन दिले जात आहे, त्यातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होणार आहेत. विशेषतः २० हजार नवीन पशुवैद्यकीय डॉक्टरांची नियुक्ती करण्याचा निर्णय ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारा ठरेल. उच्च मूल्य असलेल्या कृषी उत्पादनांवर, जसे की काजू आणि कोको, यांच्या लागवडीवर यंदा विशेष भर देण्यात आला आहे. यामुळे भारतीय उत्पादने जागतिक बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करतील. महिला उद्योजकांसाठी 'लखपती दीदी' कार्यक्रमांतर्गत सुरू होणारे "SHE मार्ट' महिला सक्षमीकरणाला नवी दिशा देतील. या सर्व उपक्रमांमुळे ग्रामीण भागात पैशाचे फिरणे (Circulation) वाढणार आहे, ज्याचा थेट फायदा सहकारी बँकिंग क्षेत्रालाच होणार असल्याने आता या संस्थांनी या संधीचा फायदा घेऊन महिला बचत गट आणि छोट्या व्यावसायिकांना आधुनिक पद्धतीने कर्जपुरवठा केला पाहिजे.

✻ आधुनिकतेचा वारसा जोपासण्याची गरज –

शेवटी, अर्थसंकल्पीय तूट भरून काढण्यासाठी नवीन चलननिर्मिती किंवा रिझर्व्ह बँकेकडून कर्ज घेणे हे पर्याय असले, तरी सरकारी अंदाजपत्रकाचा मुख्य उद्देश केवळ पैसे मिळवणे हा नसून राष्ट्रीय उत्पन्न, रोजगार आणि समाजात आर्थिक स्थैर्य राखणे हा आहे. सरकारी अंदाजपत्रकातील उत्पन्न व खर्च ही केवळ 'साध्ये' नसून ती आर्थिक विकास साधण्याची 'साधने' आहेत. सहकारी संस्थांसमोर सर्वांत मोठे आव्हान खासगी बँकांच्या चकचकीत जाहिरातींचे असले, तरी विश्वासाच्या बळावर आणि तंत्रज्ञानाच्या जोडीवर त्या यशस्वी होऊ शकतात. आपण फक्त जुने आणि विश्वासू आहोत असे सांगण्यापेक्षा आम्ही आधुनिक आणि सुरक्षित आहोत, हे सांगण्याची आता वेळ आली आहे. सायबर सुरक्षेचे कडक संरक्षण आणि बदलत्या अर्थनीतीचा स्वीकार हेच सहकारी क्षेत्राच्या यशाचे गमक आहे.

अर्थसंकल्प म्हणजे नेमका लग्नातल्या जेवणासारखा असतो. ज्याप्रमाणे लग्नाच्या पंगतीत सर्वच पदार्थ प्रत्येकाच्या आवडीचे किंवा प्रकृतीला (पथ्याला) मानवणारे नसतात, तसेच अर्थसंकल्पाचेही आहे. एखाद्याला 'इन्कम टॅक्स'मधील सवलत गोड वाटत असली, तरी दुसऱ्याला वाढलेली 'महागाई' तिखट लागू शकते. कोणाला भांडवली गुंतवणुकीचे पदार्थ पचायला जड वाटतात, तर कोणाला तुटीच्या अर्थसंकल्पाचा बेत आपल्या पथ्यातला वाटत नाही. पंगतीत जसे काही लोक फक्त उणिवा काढण्यात मग्न असतात, तद्वतच अर्थसंकल्पाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहून टीका करणारेही अनेक असतात. परंतु, एक सजग नागरिक म्हणून आपले कर्तव्य हे आहे, की ताटात वाढलेल्या सर्व पदार्थांकडे (तरतुदींकडे) तक्रारीच्या सुरात न पाहता, त्यातील जे पोषक आणि विकासासाठी पूरक आहे, त्याचा सकारात्मक स्वीकार करावा आणि देशाच्या प्रगतीच्या प्रवासात आपला खारीचा वाटा उचलावा.

सहकारी बँका आणि पतसंस्था हे भारतीय अर्थव्यवस्थेचे पाय आहेत. या अर्थसंकल्पाने त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे 'बूट' आणि कर सवलतींची 'काठी' दोन्ही दिले आहे. आता फक्त या संस्थांनी अडखळत न राहता वेळेत धावणे शिकले पाहिजे.

✻ होमवर्क पूर्ण केला तरच प्रगती –

बँकिंग सुधारणांच्या शिफारशी म्हणजे एखाद्या कठोर शिक्षकाने दिलेल्या 'होमवर्क'सारख्या आहेत, जो पूर्ण केला तरच प्रगती होईल, अन्यथा 'दंड' अटळ आहे. अर्थसंकल्पात यंदा सहकार क्षेत्रासाठी स्वतंत्र 'राष्ट्रीय डेटाबेस' आणि 'संगणकीकरण' यांवर दिलेला भर म्हणजे या संस्थांना जागतिक स्पर्धेत टिकवण्यासाठी दिलेले बळच आहे. सहकार क्षेत्राने आता जुन्या साच्यातून बाहेर पडून 'कॉर्पोरेट' स्टाईलने पण 'सहकारी' भावनेने काम केले, तरच भविष्यात तग धरता येईल. शेतकरी जेव्हा 'डिजिटल' होईल आणि आर्थिक संस्था जेव्हा 'स्मार्ट' होतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' साकार होईल.

या लेखात सांगितलेले सर्व बदल हे केवळ तांत्रिक नसून ते आपल्या मानसिकतेशी जोडलेले आहेत. सहकाराचा कणा असलेला सामान्य माणूस जोपर्यंत तंत्रज्ञानाने सुसज्ज होत नाही, तोपर्यंत खऱ्या अर्थाने 'विकसित भारत' होणे केवळ दिवास्वप्न ठरेल.

(लेखक – बँकिंग सल्लागार
बी. कॉम, जी. जीडीसीए, सी.ए.आय.आय.बी.
ई मेल – nimkarganeshgmail.com
मोबाईल – ९८२२५ ६८५५०)

देशात दोन लाख नव्या बहुद्देशीय सहकारी सेवा संस्थांची निर्मिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ

देशात दोन लाख नव्या बहुद्देशीय सहकारी सेवा संस्था, तसेच सहकार क्षेत्राला ११ वर्षांत ४ लाख २१ हजार कोटी आर्थिक सहाय्य उपलब्ध करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा. ना. श्री. मुरलीधर मोहोळ यांनी राज्यसभेत बोलतांना सांगितली.

देशातील सहकाराचे जाळे अधिक मजबूत व्हावे, सहकार क्षेत्राचा समप्रमाणात विकास व्हावा, यासाठी सहकार मंत्री मा. ना. श्री. अमित शाह यांनी २०२९ पर्यंत देशात नव्या दोन लाख बहुउद्देशीय विविध कार्यकारी सहकारी संस्थांची (एम पॅक्स) स्थापना करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. त्याअंतर्गत आतापर्यंत ३२ हजार एम पॅक्सची स्थापना करण्यात आली आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर देशातील प्रत्येक पंचायतीत किमान एक सहकारी सेवा संस्था असेल, असे त्यांनी सांगितले. ६० वर्षांहून अधिक काळ सत्तेवर राहिलेल्या काँग्रेसने सहकारावर फक्त राजकारण केले. मोदी सरकारने सहकाराला खऱ्या अर्थाने गती आणि बळकटी दिली, असेही श्री. मोहोळ म्हणाले.

✻ देशातील सहकारिता क्षेत्राचा समतोल विकास झाला नाही–

काँग्रेसच्या सत्ताकाळात देशातील सहकारिता क्षेत्राचा समतोल विकास झाला नाही. पश्चिमेकडील काही राज्यांत सहकार चळवळीचा विस्तार झाला. मात्र पूर्वेकडील राज्ये यात मागे राहिली. देशात सुमारे आठ लाख सहकारी संस्था आणि जवळपास ३० कोटी सभासद कार्यरत असतानाही, काँग्रेसच्या काळात सहकारिता क्षेत्राचा कारभार कृषी मंत्रालयांतर्गत केवळ संयुक्त सचिव स्तरावरच पाहिला जात होता. सहकार मंत्रालयाच्या स्थापनेनंतर अवघ्या तीनच वर्षांत अमित शाह यांनी अमूलाग्र बदल घडवत ११४ हून अधिक महत्त्वपूर्ण निर्णय घेत सहकार क्षेत्राला बळकटी दिली. यासंदर्भात केलेले आदर्श उपविधींना (मॉडेल बाय लॉज) केरळ वगळता देशातील ३२ राज्यांनी मान्यता दिली आहे,

✻ विविध सहकारी सोसायट्यांच्या संगणकीकरणावर भर –

देशात संगणक आणण्याचे श्रेय काँग्रेस घेते. मात्र, त्यांच्या कार्यकाळात 'पॅक्स'चे संगणकीकरण करून त्यांची कार्यक्षमता विस्तारण्याचा विचार कधीच झाला नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने देशातील ७९ हजार 'पॅक्स'चे संगणकीकरण सुरू केले असून त्यासाठी २९०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी 'पॅक्स'द्वारे केवळ अल्पमुदतीचे पीक कर्ज आणि कृषी संबंधित पुरवठा एवढेच काम केले जात होते. सरकारने आदर्श उपविधी (मॉडेल बाय लॉज) तयार करून पॅक्सना बहुद्देशीय स्वरूप दिले असून त्यामुळे सहकारी सेवा संस्थांना विविध प्रकारचे २५ व्यवसाय करता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राला वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे. मोदी सरकारने पॅक्सच्या संगणकीकरणाला प्राधान्य दिल्याने हे शक्य झाले आहे. संगणकीकरणामुळे पॅक्सच्या कार्यक्षमतेत लक्षणीय वाढ होत आहे. परिणामी, ग्रामीण स्तरावर शेतकऱ्यांना विविध सेवा अधिक वेगाने, पारदर्शकपणे आणि सुलभ पद्धतीने उपलब्ध होत आहेत. याचा थेट फायदा ग्रामीण अर्थव्यवस्थेला होत असून ग्रामीण अर्थव्यवस्था गतीने विकसित होत आहे.

✻ सहकारी संस्थांना आर्थिक मदत –

सन १९६३ मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सहकार विकास महामंडळामार्फत २०१४ पर्यंत म्हणजे ५० वर्षांत प्रामुख्याने काँग्रेसच्या सत्ताकाळात देशभरातील सहकारी संस्थांना केवळ ४५ हजार कोटी रुपयांची मदत करण्यात आली. पंतप्रधान मोदी पंतप्रधान झाल्यानंतरच्या ११ वर्षांत सरकारने ही मदत मागील ५० वर्षांच्या तुलनेत दहा पट वाढवून चार लाख २१ हजार कोटी रुपयांपर्यंत नेली आहे. त्यावरून केंद्र सरकार सहकाराला किती प्राधान्य देते, हे आपोआपच स्पष्ट होते.

✻ धान्य साठवण योजनेला गती –

देशातील शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांच्या जोरावर भारत जागतिक स्तरावर कृषी उत्पादनात तिसऱ्या क्रमांकावर आहे. मात्र, देशातील एकूण धान्य उत्पादनाच्या तुलनेत साठवणूक (स्टोअरेज) क्षमतेत सुमारे १६६ दशलक्ष मेट्रिक टनांची कमतरता आहे. या अपुऱ्या साठवणूक क्षमतेमुळे मोठ्या प्रमाणावर धान्याची नासाडी होते. तसेच, धान्य साठवण व वाहतुकीसाठी लागणाऱ्या अंतरात वाढ झाल्याने वाहतूक खर्चही वाढतो. या पार्श्वभूमीवर, देशातील शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी आणि कृषी उत्पादन व्यवस्थेचा कणा अधिक मजबूत करण्यासाठी धान्य साठवणुकीसाठी जगातील सर्वात मोठ्या धान्य साठवण योजनेवर मंत्रालयाने काम सुरू केले आहे. ही योजना पूर्णत्वास गेल्यानंतर धान्याची नासाडी कमी होईल, वाहतूक खर्चात बचत होईल आणि शेतकऱ्यांना त्याचा थेट लाभ मिळेल.

✻ ११ राज्यात ११ गोदामांची उभारणी पूर्ण –

सरकार शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत असल्याने शेतकऱ्यांना धान्य साठवणीसाठी दूरवरच्या गोदामांकडे जावे लागू नये. उलट शेतांजवळच गोदामे उभारली जावीत. याच उद्देशाने देशभरात पॅक्सच्या माध्यमातून विकेंद्रित पद्धतीने स्थानिक पुरवठा व मागणी लक्षात घेऊन गोदामांच्या उभारणीचे काम सुरू आहे. या उपक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या पायलट प्रकल्पामध्ये आतापर्यंत ११ राज्यांतील ११ गोदामांची उभारणी पूर्ण करण्यात आली आहे. पायलट प्रकल्पाचा विस्तार करत आता ७०४ पॅक्सची निवड केली असून, यामुळे सुमारे ६० हजार मेट्रिक टन साठवण क्षमतेची निर्मिती होणार आहे. ही गोदामे भाडेतत्त्वावर उपलब्ध व्हावीत, यासाठी नाफेड, एफसीआय, एनसीसीएफ आदी संस्थांशी करार करण्यात आले आहेत. त्यामुळे पॅक्सना धान्य साठवणुकीसाठी खात्रीलायक सुविधा उपलब्ध होणार आहे.

महाराष्ट्र राज्य : प्रस्तावित सहकार धोरणाच्या अनुषंगाने

सुखदेव भि. पाटील

सहकारी चळवळीची व्यापकता:–

जगात सहकारी चळवळीचा उदय होऊन सुमारे १८२ वर्षांचा कालावधी झाला आहे. सहकारी चळवळ भारतासह, जगभर रुजली आहे.जगात सुमारे तीस लाख सहकारी संस्था आहेत. एकूण जागतिक लोकसंख्येच्या १२% लोकसंख्या सहकाराशी जुळलेली आहे.

या चळवळीत सहभागी असलेल्या सदस्यांना आर्थिक,सामाजिक व सांस्कृतिक लाभ मिळत आहेत. पायाभूत सुविधांची स्थानिक स्तरावर उपलब्धता, रोजगार निर्मिती व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यात या चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे.जागतिक रोजगार निर्मितीत सहकारी चळवळीचा वाटा सुमारे १०% इतका आहे.

जगात प्रामुख्याने ग्राहक, उत्पादन, वित्तीय, गृहनिर्माण, पणन, कृषी व सामाजिक क्षेत्रात या संस्थांचे अस्तित्व आहे.

भारतातील सहकारी चळवळ :–

भारतातील सहकारी चळवळीला सुमारे १२२ वर्षांचा इतिहास आहे.ही चळवळ व्यक्तीला आर्थिक गुलामगिरीतून मुक्त करणारी, तिच्या कुटुंबाला सुखाचे दिवस आणणारी, तिला सावकाराच्या मगरमिठीतून सोडवणारी असे तिचे स्वरूप आहे.

समाजातील आर्थिक व सामाजिकदृष्ट्या गरीब माणसाने आपल्या सामायिक गरजा व आकांक्षाची पूर्तता करण्यासाठी, स्वेच्छेने एकत्र येऊन आपल्या मालकीचा संयुक्त उपक्रम चालवणे हे तिचे उद्दिष्ट आहे.

भारतात सध्या सुमारे ८.५० लाख सहकारी संस्था आहेत. त्यापैकी एकट्या महाराष्ट्रातील संस्थांची संख्या सुमारे २.३१ लाख इतकी आहे.त्या अर्थाने भारत सहकारी चळवळीच्या वाटचालीत संख्यात्मकदृष्ट्या जगात अग्रेसर आहे.

भारतातील सहकारी चळवळीच्या वाटचालीची समिक्षा ही संस्थेतील आर्थिक उलाढाल, कामाची गुणवत्ता, सदस्यांचा संस्थेच्या व्यवहारातील व निर्णय प्रक्रियेत सहभाग आणि सदस्यांना या संस्थांकडून मिळणाऱ्या सेवा–सुविधा यादृष्टीने केली जाणे आवश्यक आहे.

जागतिक सहकारी चळवळीचे तुलनात्मक मुल्यमापन:–

संयुक्त राष्ट्राने वर्ष–२०२५ हे 'आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष' म्हणून जाहीर केले होते. या वर्षांची सांगता नुकतीच झाली आहे.

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षाचा प्रारंभ ते समाप्तीपर्यंत या निमित्ताने भारतात अनेक ठिकाणी विविध कार्यक्रमांचे, सोहळ्यांचे आयोजन करण्यात आले होते.

या वर्षाच्या निमित्ताने आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने '२०२५ –वर्ल्ड को–ऑपरेटिव्ह मॉनिटर'चा एक विशेषांक काढला आहे. या अंकात सन २०२३ ची आकडेवारी विचारात घेण्यात आली आहे. प्रत्येक संस्थेतील एकूण उलाढाल व उलाढाल तथा सकल दरडोई उत्पादन यानुसार ज्यांच्या व्यवहाराची पातळी जगात अव्वल आहे अशा एकूण ३०० सहकारी संस्थांची क्रमवारी या अंकात दिलेली आहे.

या ३०० संस्थांच्या क्रमवारीत भारतातील सहा संस्थांचा (इफ्को, कृभको, अमूल, उरालुंगल, बुलडाणा अर्बन आणि केरळ राज्य सहकारी बँक) अंतर्भाव असल्याचे दिसून येते.

काही तपशील संक्षेपाने पुढीलप्रमाणे आहे.

अ) उलाढालीनुसार:– केवळ उलाढालीचा विचार करता जगातील अव्वल ३०० संस्थांपैकी भारतातील तीन संस्था पुढीलप्रमाणे क्रमवारीत आहेत.

(१) अमूल –९४ (२००३), ९१(२०२१)
(२) इफ्को–१०२ (२०२३, ७३(२०२१)
(३) कृभको–२४५ (२०२३), २४१(२०२१)

आ) उलाढाल व दरडोई जीडीपीनुसार : केवळ उलाढाल व दरडोई उत्पादनाचा विचार करता जगातील अव्वल ३०० संस्थांपैकी भारतातील(उपरोक्त (अ) मधील संस्था धरून) पुढील सहा संस्था क्रमवारीत आहेत.

(१) अमूल–१ (२०२३), २ (२०२१)
(२) इफ्को–२ (२०२३), १ (२०२१)
(३) कृभको–१९ (२०२३), १७ (२०२१)
(४) उरालुंगल मजूर – १२४ (२०२३)
(५) बुलडाणा पतसंस्था – १८७ (२०२३)
(६) केरळ राज्य सहकारी बँक – २४७ (२०२३)

जगातील अव्वल ३०० संस्थांपैकी खंड निहाय संस्था:–

(अ) अमेरिका खंड :– ४ देशातील १०३ संस्था आहेत.

(१) संयुक्त अमेरिका–७९, (२) ब्राझील –१३, (३) कॅनडा –८, (४) अर्जेंटिना –३.

(आ) युरोपियन खंड :– १५ देशातील १६१ संस्था आहेत.

(१) फ्रान्स –४१,(२) जर्मनी –२९,(३) नेदरलँड–१६,(४) इटली –१०,(५)स्पेन–१०,(६) डेन्मार्क,(७) फिनलंड –९,(८) नार्वे–७,(९)स्विडन–७,(१०) स्वित्झरलँड –७,(११) युनायटेड किंग्डम –५,(१२)ऑस्ट्रिया–४,(१३) बेल्जियम –३,(१४)पोलंड –२,(१५) आयर्लंड –२ अव्वल ३०० संस्थांमध्ये या खंडातील संस्था सर्वाधिक आहेत,

(इ) आशिया–पॅसिफिक खंड :– ८ देशातील ३६ संस्था आहेत.

(१) जपान –१८,(२) न्युझीलंड –५,(३)ऑस्ट्रेलिया–३,(४) भारत–३,(५) रिपब्लिक ऑफ कोरिया –३,(६) मलेशिया –१,(७)

सौदी अरेबिया -१,(८) सिंगापूर -१

केवळ उलाढालीनुसार ३०० पैकी अव्वल १० संस्था :-

* फ्रान्स, संयुक्त अमेरिका, जर्मनी, रिपब्लिक ऑफ कोरिया येथील आहेत.

केवळ दरडोई जीडीपी व उलाढालीनुसार अव्वल ३०० पैकी अव्वल १० संस्था :-

भारत (अमूल क्र.-१, इफ्को क्र.२), फ्रान्स, ब्राझील, जर्मनी, रिपब्लिक ऑफ कोरिया,जपान मधील आहेत.

संस्थांची क्षेत्रनिहाय क्रमवारी :-

(१) कृषी व अन्न उद्योग-

अ) उलाढालीनुसार- एकूण अव्वल ३००पैकी १०७ संस्था या वर्गवारीत आहेत. यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

आ) उलाढाल व दरडोई जीडीपी नुसार - एकूण अव्वल ३००पैकी १०६ संस्था या वर्गवारीत आहेत.यातील अव्वल १० मध्ये भारतातील पुढील तीन संस्था आहेत.

(१) अमूल - १(२०२३),२(२०२१)

(२) इफ्को - २(२०२३),१(२०२१)

(३) कृभ्को - ६(२०२३),६(२०२१)

(२) उद्योग व उपयोगिता क्षेत्रात:-

अ) उलाढालीनुसार - एकूण अव्वल ३०० पैकी १० संस्था या वर्गवारीत आहेत. यातील अव्वल १० संस्थांमध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

आ) उलाढाल व दरडोई जीडीपीनुसार -

* एकूण अव्वल ३००पैकी ७ संस्था या वर्गवारीत आहेत.
* यात अव्वल १० संस्थांमध्ये भारतातील उरालुंगल मजूर संस्थेचा-३(२०२३),३(२०२१) अंतर्भाव आहे.

(३) घाऊक व किरकोळ विक्री क्षेत्र:-

अ) उलाढालीनुसार-

* एकूण अव्वल ३०० पैकी ५४संस्थांचा या वर्गवारीत अंतर्भाव आहे.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

आ) उलाढाल व दरडोई जीडीपी नुसार-

* एकूण ३०० पैकी ६० संस्थांचा अंतर्भाव या वर्गवारीत आहे.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

(४) विमा क्षेत्र :-

अ) उलाढालीनुसार-

* एकूण अव्वल ३०० पैकी ९५ संस्थांचा या वर्गवारीत अंतर्भाव आहे.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही

आ) उलाढाल व दरडोई जीडीपी नुसार-

* एकूण अव्वल ३००पैकी ८६ संस्था आहेत.
* यात अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही

(५) वित्तीय सेवा:-

अ) उलाढालीनुसार-

* एकूण अव्वल ३०० पैकी २९ संस्था या वर्गवारीत आहेत.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

आ) उलाढाल व दरडोई जीडीपीनुसार -

* एकूण अव्वल ३००पैकी ३० संस्था या वर्गवारीत आहेत.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही

(६) शिक्षण,आरोग्य व समाजसेवा:-

अ) उलाढालीनुसार-

* एकूण अव्वल ३००पैकी ३ संस्था या वर्गवारीत आहेत.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही

आ) उलाढाल व दरडोई जीडीपीनुसार-

* एकूण अव्वल ३००पैकी ८ संस्था या वर्गवारीत आहेत.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही

(७) इतर सेवा:-

अ) उलाढालीनुसार-

* एकूण अव्वल ३०० पैकी २ संस्था या वर्गवारीत आहेत.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

आ) उलाढाल व दरडोई जीडीपीनुसार-

* एकूण ३००पैकी ३ संस्था या वर्गवारीत आहेत.
* यातील अव्वल १० मध्ये भारतातील कोणत्याही संस्थेचा अंतर्भाव असल्याचे दिसून येत नाही.

भारतातील सहकारी चळवळीसाठी आवश्यक भूमिका :-

आंतरराष्ट्रीय सहकार संघटनेने दिलेली उपरोक्त आकडेवारी विचारात घेता भारतातील सहकारी चळवळीला अधिक सकारात्मक उर्जा देण्याची गरज असल्याचे दिसून येते.येथील सहकारी संस्थांच्या कामकाजात संख्यात्मक व गुणात्मक बदल घडवून आणण्याची व सहकारी चळवळीने नवीन व उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये प्रवेशित होण्याची,सर्व सामाजिक घटक सामावून घेण्याची नितांत आवश्यकता आहे.

प्रयत्न:-

केंद्र सरकारची भूमिका

* सहकारातून समृद्धी साधण्याच्या भूमिकेतून
* केंद्र सरकारने स्वतंत्र 'सहकार मंत्रालया'ची स्थापना दि.६ जुलै, २०२१ रोजी केलेली आहे.
* तसेच सहकारी चळवळीच्या बळकटीकरणासाठी अनेक उपाययोजना देखील लागू केलेल्या आहेत.

जसे-

(१) पॅक्सचे आदर्श उपविधी लागू करून त्यांना बहुउद्देशीय संस्थांचे स्वरूप देणे.

(२) कार्यशील असलेल्या पॅक्सचे संगणकीकरण करणे.

(३) आवश्यक तेथे नवीन पॅक्स,दुग्ध,मत्स्यव्यवसाय संस्था स्थापन करणे.

(४) पॅक्सचे- कॉमन सेवा केंद्र, शेतकरी सभासदांचे उत्पादक संघ (FPOs)स्थापणे, एलपीजी वितरक म्हणून मान्यता देणे, त्यांच्या पेट्रोल पंपांचे किरकोळ विक्री केंद्रात रुपांतर करणे, जनरिक औषधी केंद्रे चालवणे, खत विक्री केंद्रे चालवणे, PM-KUSUM योजनेतून कृषी क्षेत्रात सौर उर्जेचा वापर वाढवणे, पॅक्स व भूविकास बँकांच्या रोख

ठेवी व रोख कर्ज मर्यादेत वाढ करणे, धान्य भांडारण व्यवस्था उभी करणे इत्यादी.

(५) विविध सहकारी संस्थांना कर सवलती लागू करणे

(६) नागरी सहकारी बँकांना नवीन शाखा उघडणेस मान्यता व इतर सुविधा देणे.

(७) सहकारी साखर कारखान्यांना आयकरात सूट, कर्ज योजना, इथेनॉल खरेदी योजना लागू करणे, वीज निर्मिती प्रकल्पासाठी सवलती देणे.

(८) बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम,२००२ व नियमात आवश्यक सुधारणा करणे.

(९) राष्ट्रीय स्तरावर बियाणे,सेंद्रिय व निर्यात सहकारी संस्थांची स्थापना करणे.

(१०) राष्ट्रीय सहकार विद्यापीठा'ची स्थापना करणे.

(११) केंद्रीय निबंधक कार्यालय व राज्य /केंद्रशासित प्रदेशातील सहकारी संस्थांच्या निबंधकांच्या कार्यालयांचे संगणकीकरण करणे.

(१२) नवीन सहकाराचे राष्ट्रीय धोरण तयार करून स्वीकारणे व लागू करणे.

अंमलबजावणी

* उपरोक्त उपाययोजनांची अंमलबजावणी सुरू आहे.

* यापैकी विशेष करून बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, २००२ व नियमात सुधारणा, राष्ट्रीय स्तरावर बियाणे,सेंद्रिय व निर्यात संस्थांची स्थापना,भारत टॅक्सी सेवा प्रारंभ, राष्ट्रीय सहकार विद्यापीठा'ची स्थापना, केंद्रीय निबंधक कार्यालय संगणकीकरण, नवीन सहकाराचे राष्ट्रीय धोरण स्वीकृती इत्यादी गोष्टींची पूर्तता झालेली आहे.

केंद्र शासनाच्या उपाययोजनांत महाराष्ट्र शासनाचा सहभाग:–

केंद्र शासनाने लागू केलेल्या उपरोक्त विविध उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र शासनाने क्रियाशील भूमिका स्वीकारलेली आहे.

त्यानुसार–

(१) नवीन पॅक्सची स्थापना करणे– ज्या गावात सध्या पॅक्स, दुग्ध किंवा मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था नाहीत, तेथे ४२ नवीन पॅक्स नोंदणी करण्यात आलेल्या आहेत. उर्वरित गावात नवीन पॅक्स स्थापन करण्याची शक्यता विचारात घेतली जात आहे.

(२) पॅक्सचे आदर्श उपविधी स्वीकारणे:– केंद्र सरकारने पॅक्ससाठी तयार केलेल्या आदर्श उपविधीनुसार राज्यातील पॅक्सच्या उपविधीत आवश्यक त्या सूधारणा करून त्यांची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

(३) पॅक्संना बहुउद्देशीय संस्था बनविणे :– पॅक्सना पिक कर्ज वाटपाशिवाय स्वस्त धान्य दुकाने, ग्राहक भांडारे,औषधी दुकाने, पेट्रोल पंप्स, सौर ऊर्जा पॅनल्स, मंगल कार्यालये, खते व औषधी वितरण केंद्रे, धान्य साठवण केंद्रे, शेती मालतारण योजना व सोने तारण योजना अशा विविध उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(४) पॅक्सचे संगणकीकरण करणे :– केंद्र शासनाच्या योजनेनुसार राज्यातील एकूण २१,०९७ पॅक्सपैकी १२,००० संस्थांची संगणकीकरणासाठी निवड करण्यात आलेली आहे. प्रत्येक टप्प्यात ४००० संस्था याप्रमाणे एकूण तीन टप्प्यांत हे काम पूर्ण केले जाणार आहे.

(५) पॅक्समार्फत धान्य भांडारण उभारणी करणे :– पॅक्समार्फत, देशात जगातील सर्वात मोठी धान्य भांडारण क्षमता उभी करण्याच्या केंद्र शासनाच्या धोरणानुसार पात्र संस्थांमध्ये धान्य भांडारण उभारणी करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.

(६) पॅक्स स्तरावर कॉमन सर्विस सेंटर सुरू करणे :– सध्या राज्यातील १४६० पॅक्स ऑनबोर्ड असून त्या लोकांना सेवा पुरवत आहेत.

(७) पॅक्सनी जनौषधी केंद्रे चालवणे – सध्या राज्यातील ३३ जिल्ह्यातील ३४५ संस्था अशी केंद्रे सुरू करण्यासाठी निवडण्यात आलेल्या आहेत.यापैकी ३२१ संस्थांची ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे.

(८) पॅक्सनी स्वस्त धान्य दुकाने चालवणे :– राज्यात सध्या २७२८ संस्था स्वस्त धान्य दुकाने चालवत आहेत.याशिवाय अधिक पॅक्सना अग्रक्रमाने स्वस्त धान्य दुकाने चालविण्यासाठी देण्याचे राज्यशासनाचे धोरण आहे.

(९) शेतकरी सभासदांनी एफ पी ओ स्थापन करणे :– राज्य कृषी विभागाने सध्या ६५०० एफ.पी.ओ.स्थापन केलेल्या आहेत.यातील बऱ्याच संघटना पॅक्सच्या सभासदांनी स्थापन केलेल्या आहेत.

(१०) पॅक्सनी एल.पी.जी.वितरण करणे – आणि पेट्रोल पंपांचे किरकोळ वितरक म्हणून त्यांचे रुपांतरण करणे. राज्यातील सध्या ५० सहकारी संस्था हा व्यवसाय करत आहेत.याशिवाय अधिक संस्थांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(११) पॅक्सनी खते वितरक म्हणून काम करणे – पॅक्सनी खते वितरक, प्रधानमंत्री किसान समृद्धी केंद्रे आणि ड्रोन उद्यमी म्हणून पात्र ठरविण्यासाठी मोहीम घेण्यात येत आहे. सध्या काही पॅक्स खत वितरणाचे काम करत आहेत. इतर सक्षम पॅक्सनीदेखील हा उपक्रम हाती घ्यावा म्हणून त्यांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(१२) पॅक्सनी सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे :– पॅक्सच्या सहभागाने सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे. जेणेकरून सौरऊर्जेवर चालणारे पंप शेतकरी उपयोगात आणतील. तसेच शेतात फोटोव्होल्टाईक एकक उभारणी करून उर्जा सुरक्षा मिळवू शकतील. त्यासाठी या संस्थांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(१३) सहकारी डाटाबेस :– केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील सर्व संस्थांची माहिती संकलित करून सहकारी डाटाबेस तयार करण्यात येत आहे.

(१४) राष्ट्रीय सहकारी विद्यापीठाशी संस्था संलग्न करणे :– सहकार शिक्षण व प्रशिक्षणासाठी अधिसूचीत केलेल्या राज्यातील १५ प्रशिक्षण संस्था राष्ट्रीय सहकारी विद्यापीठाशी संलग्न करण्यासाठी निवडण्यात आलेल्या आहेत.

(१५) जीइएम पोर्टल:– सध्या रु.१०० कोटीपेक्षा अधिक उलाढाल असलेल्या सहकारी संस्थांना जीइएम पोर्टलवर येणे बंधनकारक करून ५४ सहकारी संस्था ऑनबोर्ड आहेत.भविष्यात राज्यातील सर्व सहकारी संस्थांनी ऑनबोर्ड असणे बंधनकारक करण्याचे प्रस्तावित आहे.

(१६) नागरी बँकांसाठी उपाययोजना:– पात्र नागरी सहकारी

बँकांना नवीन शाखा उघडण्याची परवानगी, ग्राहकांना डोअर स्टेप सेवा, बँकांना CGSTMSE सदस्य म्हणून मान्यता, बँकांनी चडए साठी दिलेल्या कर्जांना विमा संरक्षण, बँकांनी आधार आधारित पेमेंट सेवा देणे, ऑनबोर्ड येण्यासाठी शुल्कात सवलत इ.रिझर्व्ह बँकेचे निर्णय बँकांना कळवून अवगत करून या सुविधांचा लाभ घेण्यासाठी बँकांना प्रोत्साहित करण्यात येत आहे.

(१७) राज्य व जिल्हा स्तरीय समित्यांचे गंठण :– केंद्र सरकारच्या सर्व उपाययोजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी 'राज्य स्तरीय सहकारी विकास समिती' आणि 'जिल्हा सहकारी विकास समित्यां'चे गठण करण्यात आलेले आहे.

केंद्र शासनाच्या उपाययोजनांमुळे परिणाम:–

राज्यात सध्या कार्यरत असलेल्या विविध प्रकारच्या सहकारी संस्थांना बळकट करण्यासाठी हाती घेतलेल्या उपाययोजनांचा परिणाम म्हणून पुढीलप्रमाणे सकारात्मक परिणाम दिसून येणे अपेक्षित आहे. जसे–

- ✻ शेती क्षेत्रातील छुपी बेकारी कमी होणे.
- ✻ सहकारी संस्थातील प्रादेशिक असमतोल कमी होणे.
- ✻ चळवळीत सध्या सहभागी नसलेल्या लोकांना सहभागी करून घेणे.
- ✻ नवीन व उदयोन्मुख क्षेत्रात नवीन संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन मिळणे.
- ✻ युवक, महिला, अनु.जाती, जमाती व इतर सामाजिक घटकांचा सहकारी चळवळीत क्रियाशील सहभाग वाढवणे.
- ✻ सहकारी शिक्षण व प्रशिक्षण व्यापक करणे.
- ✻ सहकारी चळवळीचा अधिक प्रचार व प्रसार करणे.
- ✻ सहकारी संस्थांना स्वायत्तपणे व लोकशाही पध्दतीने काम करण्यासाठी प्रोत्साहित करणे.
- ✻ सहकारी संस्थांनी सहकाराची तत्त्वे व मुल्यांचा अवलंब करणे.
- ✻ प्रत्येक संस्थेने व्यवसायिक व्यवस्थापनाचा दृष्टिकोन स्वीकारून अर्थक्षम होणे.
- ✻ सभासदांनी संस्थांच्या निर्णयप्रक्रियेत भाग घेणे.
- ✻ सभासदांनी संस्थांकडून देण्यात येणाऱ्या सेवांचा किमान प्रमाणात वापर करणे.
- ✻ सहकारी संस्थांनी माहिती तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करणे.

केंद्र शासनाचे सहकाराचे धोरण

उद्दिष्टे

- ✻ सहकारी चळवळीचे बळकटीकरण.
- ✻ सहकारी चळवळ तळापर्यंत रुजवणे.
- ✻ सहकारी चळवळीत कायदाविषयक सुधारणा करणे.
- ✻ सहकारी चळवळ आर्थिकदृष्ट्या मजबूत करणे.
- ✻ सहकारी चळवळीत संस्थात्मक बदल घडवून आणणे.
- ✻ सहकारी संस्थांमध्ये व्यवसायीक व्यवस्थापन आणणे.
- ✻ सहकारी संस्थांच्या कामकाजात पारदर्शकता.
- ✻ सहकारी संस्थांचे दैनंदिन कामकाज तंत्रज्ञानयुक्त करणे.
- ✻ सहकारी चळवळ अधिक चैतन्ययुक्त करण्यासाठी प्रयत्न करणे.
- ✻ सहकारी चळवळीचे सभासदांना आर्थिकदृष्ट्या प्रतिसादात्मक होईल असे करणे.
- ✻ सहकारी चळवळीद्वारे जनसामान्यांना उत्पादनास पाठबळ देणे.

ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सहा स्तंभांचा आधार:–

- ✻ सहकारी चळवळीचा पाया बळकटीकरण.
- ✻ सहकारी चळवळीत चैतन्यास प्रोत्साहन.
- ✻ सहकारी संस्था भविष्यासाठी सज्ज करणे.
- ✻ सहकारी चळवळीत सर्वसमावेशकता आणणे व ती तळापर्यंत रुजवणे.
- ✻ सहकारी चळवळीने नवीन व उदयोन्मुख क्षेत्रात प्रवेश करणे.
- ✻ सहकारी चळवळीद्वारे युवा शक्तीला आकार देणे.

महाराष्ट्र राज्याचे सहकाराचे प्रस्तावित धोरण

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनांनी आपापल्या राज्याचे सहकाराचे धोरण ठरवून घेणे अपेक्षित आहे. त्यादृष्टीने महाराष्ट्र शासनाने दि. ८ ऑक्टोबर,२०२५ रोजीच्या आदेशानुसार मा.मंत्री, सहकार, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली एका उच्चस्तरीय समितीचे गठन केलेले आहे. या समितीचे कामकाज प्रगतीपथावर आहे.

याशिवाय राज्याच्या सहकारी संस्था अधिनियम व नियमात प्रस्तावित सहकार धोरणाच्या अनुषंगाने सुधारणा सुचवण्यासाठी देखील शासनाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन दि. २ जानेवारी,२०२६ रोजीच्या आदेशानुसार केलेले आहे.

विचारार्थ बाबी :–

सहकार धोरण हे भविष्यासाठी दूरदृष्टी ठेवून दिर्घ काळासाठी त्यांची आखणी करण्यात येत असते.

त्यादृष्टीने पुढील प्रदिर्घ काळात सहकारी चळवळीच्या वाटचालीतून सकारात्मक परिवर्तन व परिणाम दिसून यावेत म्हणून काही निवडक बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करणे आवश्यक ठरते.

या बाबींमध्ये प्रामुख्याने राज्यातील त्रिस्तरीय सहकारी पतसंरचना,बिगरशेती पतपुरवठा व्यवस्था बळकट करणे, संस्थांचे कामकाज तंत्रज्ञानयुक्त करणे, राज्यातील सहकारी संस्थांचा डाटा बेस तयार करणे, सहकार विभागाचे बळकटीकरण करणे, वैधानिक लेखापरीक्षणाची गुणवत्ता वाढवणे, नवीन व उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये सहकारी चळवळीने प्रवेश करणे, सहकारी चळवळीत युवक, महिला व आर्थिक–सामाजिक दुर्बल घटकांचा सहभाग वाढवण्यासाठी मसहकारी समावेशनाफ्ची विशेष मोहीम राबवणे, निवडणूकांची गुणवत्ता वाढवून लोकशाही प्रशासन आणणे, सहकारी संस्थांनी अर्थक्षम होण्यासाठी बहुउद्देशीय कामे करणे, गाव तेथे सहकारी संस्था धोरण लागू करणे, सहकारी संस्थांच्या कर्मचाऱ्यांचा क्रियाशील सहभाग वाढवणे, संचालक, सदस्य व कर्मचारी यांना उत्तम दर्जाचे सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देणे, सहकारी चळवळीत संशोधनावर अधिक भर देणे, सहकारी चळवळीची रोजगार निर्मिती क्षमता वाढवणे,जनतेत सहकारी चळवळीविषयी जनजागृती निर्माण करणे, सहकारी संस्थांमध्ये पात्र व गुणवत्तापूर्ण कर्मचारी नियुक्ती करणे, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा सहकारी संस्था व त्यांच्या सभासदांना अधिकाधिक लाभ पोहोचविणे, सहकारी संस्थांनी कृषी उत्पादन, प्रक्रिया व पणन क्षेत्रात अधिक लक्ष घालणे या बाबींचा अंतर्भाव धोरणात करून घेता आला तर राज्यातील सहकारी चळवळीच्या बळकटीकरणासाठी त्याचा अधिकच उपयोग होऊ शकेल असे वाटते.

(लेखक महाराष्ट्र शासनाच्या सहकार,
पणन व वस्त्रोद्योग विभागातील अपर आयुक्त तथा
सहसचिव पदावरून सेवानिवृत्त आहेत.
मो. : ९६३७४३४७२१)

सहकाराची डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

केंद्रीय अर्थसंकल्पात केंद्राने जाहीर केलेल्या राष्ट्रीय सहकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय पाठबळाची घोषणा पूर्ण करण्यात आली आहे. त्यामुळे दोन लाख विविध कार्यकारी सहकारी संस्थांची उभारणी, बहुउद्देशीय सहकारी सेवा केंद्र म्हणून मान्यता, त्यांचे व्यावसायिक व्यवस्थापन व तंत्रज्ञानावर आधारित कामकाज यामुळे ग्रामीण भागात सहकाराची उपस्थिती वाढणार आहे. या वेळचा अर्थसंकल्प सहकार क्षेत्राला थेट अनुदान अथवा सवलत देणारा नसला, तरी संरचनात्मक बळ देणार आहे.

यंदाचा केंद्रीय अर्थसंकल्प हा सहकार क्षेत्राला थेट अनुदान अथवा सवलत देणारा नसला, तरी संरचानात्मक बळ देणारा ठरेल, अशी अपेक्षा आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल वित्तीय प्रणालीच्या माध्यमातून सक्षम करण्यासंदर्भात अर्थसंकल्पात महत्त्वाच्या तरतुदी आहेत. ज्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राला नवीन संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. डिजिटल वित्तीय प्रणाली यशस्वी करण्याची जबाबदारी पार पाडत असतानाच सहकाराची पारंपरिक तत्त्वे जपण्यासाठी सहकार क्षेत्राला तारेवरची कसरत करावी लागणार असून, व्यावसायिकता आचरणात आणताना सहकाराचा गाभा सुरक्षित ठेवण्याची फार मोठी जबाबदारी सहकार क्षेत्रावर आहे.

विद्याधर अनास्कर

✻ सहकारच्या माहितीचा राजकारणासाठी तर उपयोग होणार नाही ना?

सरकार 'को-ऑपरेटिव्ह स्टॅक' नावाचा डिजिटल एकात्मिक प्लॅटफॉर्म विकसित करीत आहे. त्यामध्ये विविध कार्यकारी संस्थांचा सदस्य डेटा, कर्ज माहिती, अनुदान योजना, कृषिसाठा व सेवा बँकिंग लिंक इत्यादींचा समावेश होणार आहे. यामुळे डेटा पारदर्शकता, जलद कर्ज निर्णय, दुहेरी फायदे थांबविणे, लेखापरीक्षणातील दोष दुरुस्तीवरील पूर्तता अधिक सुलभ होईल. त्रिस्तरीय रचनेतील इतर सहकारी बँकांची म्हणजेच जिल्हा बँका व राज्य बँका यांची जोखीम निश्चितच कमी होईल. परंतु राज्याच्या अखत्यारीतील 'सहकार' विषयाच्या संदर्भात या माहितीचा केंद्र पातळीवर राजकारणासाठी उपयोग होणार तर नाही ना ? या शंकेचे निरसन आपल्या कृतीतून केंद्र शासनास करावे लागेल.

✻ अर्थसंकल्पात थेट सवलत –

केंद्र शासनाने नुकतेच जाहीर केलेले 'केंद्रीय सहकार धोरण : २०२६' त्या अनुषंगाने विविध राज्यांनी केंद्रीय धोरणाशी सुसंगत असे राज्याचे सहकार धोरण तयार करण्यासाठी निश्चित केलेला कालबद्ध कार्यक्रम, सहकारी बँकांसाठी रिझर्व्ह बँकेने या वर्षाच्या सुरुवातीलाच कायद्यामध्ये बदल करीत सहकारी बँकांबद्दल स्वीकारलेले व्यावसायिक धोरण इत्यादींच्या पार्श्वभूमीवर सहकार क्षेत्राला यंदाच्या अर्थसंकल्पात थेट सवलत, अनुदान अथवा निधी मिळणार नाही, असा अंदाज होताच. त्याचप्रमाणे अशी कोणतीही भरीव व थेट सवलत सहकारी बँकिंग क्षेत्राला व एकूणच सहकार क्षेत्राला मिळालेली नाही.

परंतु, ग्रामीण अर्थव्यवस्था डिजिटल वित्तीय प्रणालीच्या माध्यमातून सक्षम करण्यासंदर्भात अर्थसंकल्पात महत्त्वाच्या तरतुदी असल्याने, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या सहकार क्षेत्राला यामधून नवीन संधी उपलब्ध होतील. तसेच डिजिटल वित्तीय प्रणाली यशस्वी करण्यासाठी त्यांच्यावरील दबावही वाढेल, यात शंका नाही. डिजिटल वित्तीय प्रणाली यशस्वी करण्याची जबाबदारी पार पाडत असतानाच सहकाराची पारंपरिक तत्त्वे जपण्यासाठी सहकार क्षेत्राला तारेवरची कसरत करावी लागणार आहे. केंद्र सरकारला अपेक्षित असणारी 'व्यावसायिकता' आचरणात आणताना सहकाराचा गाभा सुरक्षित ठेवण्याची फार मोठी जबाबदारी सहकार क्षेत्रावर आहे.

✻ उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा फायदेशीर?

बँकिंग संरचनेचा आढावा घेण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी केली आहे. याचा सहकारी बँकांना फायदा होणार का धोरणात्मक तोटा होणार, हे काळच ठरवेल. सध्या केंद्र शासनाचे व रिझर्व्ह बँकेचे धोरण पाहता सहकारी बँकांची भविष्यातील स्थिती ही 'बाहेरून सहकारी, आतून मात्र व्यापारी' अशीच होणार असल्याचे दर्शविते. सहकारी बँकांना व्यापारी बँकांचे त्यांच्या संचालक मंडळाची रचना, कार्यपद्धतीबाबतचे नियम इत्यादी बाबतीतही व्यापारी बँकांचेच नियम लागू करण्यात येत असल्याने भविष्यात या बँका केवळ नावालाच सहकारी बँका राहतील. परंतु त्यांचे कामकाज मात्र पूर्णतः व्यापारी बँकांप्रमाणेच चालेल, असे धाडसी विधान करायला निश्चितच वाव आहे.

करसंबंधित सहकार क्षेत्राला मिळालेला थेट दिलासा म्हणजे एका सहकारी संस्थेला दुसऱ्या सहकारी संस्थेकडून मिळणाऱ्या लाभांशावर कर सवलत देण्याची तरतूद होय. यामुळे निश्चितच सहकारी संस्थांमधील आर्थिक प्रवाह सुलभ होईल, दुहेरी कर टळेल, गुंतवणूकदार संस्थेच्या सदस्यांना अधिक लाभांश देता येईल. परंतु, त्यासाठी एका सहकारी संस्थेला निबंधकाच्या परवानगीशिवाय दुसऱ्या सहकारी संस्थेचे सदस्यत्त्व घेता येणार नाही, ही राज्याच्या कायद्यातील, जिचा उल्लेख रिझर्व्ह बँक वारंवार आपल्या तपासणी अहवालात करते, ती रद्द करणे गरजेचे होते. वास्तविक लाभांशाबरोबरच ही सवलत सहकारी संस्थांच्या गुंतवणुकीवर त्यांना दुसऱ्या सहकारी संस्थेकडून मिळणाऱ्या व्याजावरसुद्धा देणे अपेक्षित होते.

✻ नवीन सहकारी संस्थांची उभारणी शक्य –

या अर्थसंकल्पात केंद्र सरकारने जाहीर केलेल्या राष्ट्रीय सहकार धोरणाच्या अंमलबजावणीसाठी अर्थसंकल्पीय पाठबळाची घोषणा पूर्ण केली आहे. त्यामुळे दोन लाख सहकारी विविध कार्यकारी संस्थांची उभारणी, त्यांना बहुउद्देशीय सहकारी सेवा केंद्र म्हणून मान्यता, त्यांचे व्यावसायिक व्यवस्थापन व तंत्रज्ञानावर आधारित कामकाज इत्यादींमुळे ग्रामीण भागात सहकाराची उपस्थिती निश्चितच वाढेल. सहकारी बँकांना नवीन व्यवसाय संधी उपलब्ध होतील व तळापासूनच म्हणजे विविध कार्यकारी संस्थापासूनच सहकाराची वाटचाल तंत्रज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेकडे

पान क्र. ४० वर

सहकारी संस्थांसाठी MSME मार्गदर्शक: कोणत्या संस्थेला कोणता लाभ आणि कितीपर्यंत?

१. सहकारी संस्थांसाठी MSME (उद्यम) नोंदणी व लाभ –

भारतातील सहकार चळवळ ही केवळ सामाजिक-आर्थिक संघटना म्हणून मर्यादित राहिलेली नाही; अनेक क्षेत्रांमध्ये ती एक पूर्ण विकसित व्यावसायिक व्यवस्था (enterprise ecosystem) म्हणून उभी राहिली आहे. दुग्धव्यवसाय, कामगार, विपणन, ग्राहक, मत्स्य, हातमाग, कृषी-आधारित प्रक्रिया, वाहतूक, सेवा, औद्योगिक उत्पादन, महिला स्वयं-साहाय्य गटांवर आधारित सहकारी संस्था - या सर्व संस्था आज मोठ्या प्रमाणावर वस्तू (Goods) आणि सेवा (Services) यांचा प्रत्यक्ष पुरवठा करतात.

पुष्पिंदर कुमार राय

अशा परिस्थितीत हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा ठरतो की सहकारी संस्था MSME (Micro, Small Medium Enterprises) अंतर्गत नोंदणी करू शकतात का, आणि MSME चे लाभ नेमक्या कोणत्या सहकारी संस्थांना उपलब्ध होतात.

हा लेख MSME च्या सुधारित वर्गीकरण निकषांबाबत (Amended MSME Classification Criteria), सहकारी संस्थांची पात्रता, तसेच कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्थांना MSME चे कोणते लाभ प्रत्यक्षात मिळू शकतात, याबाबत कायदेशीर आणि व्यावहारिक दृष्टिकोनातून स्पष्टता देतो.

२. MSME चे कायदेशीर आधार आणि उद्यम नोंदणी

MSME क्षेत्रासाठी प्रमुख कायदा म्हणजे Micro, Small and Medium Enterprises Development Act, 2006 (MSMED Act, 2006) होय. MSME म्हणून ओळख मिळवण्यासाठी सध्या भारत सरकारने Udyam Registration (उद्यम नोंदणी) प्रणाली लागू केली आहे. ही नोंदणी MSME असल्याचा अधिकृत पुरावा मानली जाते आणि MSME लाभ मिळवण्यासाठी याच नोंदणीचा आधार घेतला जातो.

सहकारी संस्थांच्या संदर्भात सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे MSME अंतर्गत येण्यासाठी संस्थेचा कायदेशीर प्रकार (उदा. कंपनी, LLP, भागीदारी फर्म किंवा सहकारी संस्था) निर्णायक नसतो. निर्णायक बाब म्हणजे ती संस्था प्रत्यक्षात व्यावसायिक कार्य करत आहे का आणि ती MSME साठी निश्चित आर्थिक मर्यादेत येते का.

३. सुधारित MSME वर्गीकरण (१ एप्रिल २०२५ पासून लागू)

MSME वर्गीकरणात १ एप्रिल २०२५ पासून लागू झालेल्या बदलांनंतर MSME च्या मर्यादा लक्षणीयरीत्या वाढवण्यात आल्या आहेत. आता MSME वर्गीकरण दोन निकषांवर आधारित असते -

(i) प्लांट आणि मशीनरी / उपकरणांमध्ये गुंतवणूक (Investment) आणि (ii) वार्षिक उलाढाल (Turnover) या दोन निकषांवर MSME वर्गीकरण ठरते. कोणत्याही श्रेणीत येण्यासाठी उद्योगाने गुंतवणूक आणि उलाढाल या दोन्ही मर्यादांमध्ये असणे आवश्यक आहे.

*** सुधारित मर्यादांनुसार:**

Micro **उद्योग –** गुंतवणूक ₹ २.५ कोटींपर्यंत आणि उलाढाल ₹ १० कोटींपर्यंत

Small **उद्योग –** गुंतवणूक ₹ २५ कोटींपर्यंत आणि उलाढाल ₹ १०० कोटींपर्यंत

Medium **उद्योग –** गुंतवणूक ₹ १२५ कोटींपर्यंत आणि उलाढाल ₹ ५०० कोटींपर्यंत

हा बदल सहकारी संस्थांसाठी विशेषतः लाभदायक आहे, कारण आता अनेक मोठे सहकारी उपक्रमही MSME अंतर्गत समाविष्ट होऊ शकतात.

४. सहकारी संस्थांसाठी MSME लाभ: तीन प्रमुख श्रेणी

MSME लाभ समजून घेण्यासाठी त्यांना तीन भागांत पाहणे आवश्यक आहे.

पहिला भाग : वैधानिक अधिकारांचा आहे, जो MSMED Act, 2006 अंतर्गत येतो. यात सर्वात महत्त्वाचा अधिकार म्हणजे विलंबित देयकांबाबतचे (Delayed Payment) संरक्षण.

दुसरा भाग : सरकारी टेंडर आणि खरेदी प्रक्रियेतील लाभांचा आहे. यात EMD सवलत, प्राधान्य, तसेच पात्रतेतील सुलभता असे लाभ येतात.

तिसरा भाग : कर्ज, अनुदाने (subsidy) आणि विविध योजना यांचा आहे. हे लाभ पूर्णपणे योजना-विशिष्ट (scheme-specific) असतात आणि प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र पात्रता निकष लागू असतात.

५. MSME चा सर्वात प्रभावी लाभ: विलंबित देयकांवर कायदेशीर संरक्षण

MSMED Act अंतर्गत MSME साठी सर्वात मजबूत आणि प्रत्यक्षात लागू होणारा अधिकार असा आहे की, जर MSME उद्योगाने कोणत्याही खरेदीदाराला वस्तू किंवा सेवा पुरवल्या आणि त्याचे देयक वेळेत मिळाले नाही, तर खरेदीदाराने जास्तीत जास्त ४५ दिवसांच्या आत देयक अदा करणे बंधनकारक आहे.

जर देयक ४५ दिवसांपेक्षा उशिरा मिळाले, तर MSME उद्योगाला RBI च्या बँक दराच्या तिप्पट दराने चक्रवाढ व्याज (compound interest) घेण्याचा अधिकार असतो.

याशिवाय MSME उद्योग आपला दावा Micro and Small Enterprises Facilitation Council (MSEFC) कडे दाखल करू शकतो, जिथून आदेश मिळवून वसुली करता येते.

हा लाभ विशेषतः त्या सहकारी संस्थांसाठी अत्यंत उपयुक्त आहे ज्या प्रत्यक्षात वस्तू किंवा सेवा पुरवतात आणि ज्यांचे खरेदीदार (सरकारी विभाग, कंपन्या, संस्था, PSU, मोठे व्यापारी इ.) देयक देण्यात विलंब करतात.

६. कोणत्या प्रकारच्या सहकारी संस्थांना MSME चे लाभ उपलब्ध होतात (Co-operative Type-wise Analysis)

सहकारी संस्थांना MSME चे लाभ प्रत्यक्षात मिळण्याची स्थिती त्यांच्या कार्याच्या स्वरूपावर अवलंबून असते. ज्या सहकारी संस्था वस्तू किंवा सेवांचा व्यावसायिक पुरवठा करतात, त्यांच्यासाठी MSME अत्यंत उपयुक्त ठरते; तर ज्या संस्था मुख्यतः सदस्य-आधारित व्यवस्थापन किंवा आर्थिक व्यवहारांपुरत्याच मर्यादित असतात, त्यांच्यासाठी MSME चे लाभ मर्यादित राहतात.

दुग्ध सहकारी संस्था MSME साठी सर्वात योग्य श्रेणी मानल्या जातात. या संस्था दूध संकलन, प्रक्रिया, पॅकिंग आणि विक्री करतात, त्यामुळे हा स्पष्टपणे वस्तू उत्पादन व पुरवठ्याचा प्रकार ठरतो. जर एखाद्या दुग्ध सहकारी संस्थेची गुंतवणूक ₹ १२ कोटी आणि उलाढाल ८० कोटी असेल, तर सुधारित मर्यादेनुसार ती Small Enterprise म्हणून वर्गीकृत होईल. अशा परिस्थितीत जर डीलर किंवा वितरक देयक उशिरा देत असतील, तर ही सहकारी संस्था MSMED Act अंतर्गत MSEFC कडे दावा दाखल करून व्याजासह वसुली करू शकते. याशिवाय सरकारी रुग्णालये, वसतिगृहे आणि PSU यांना पुरवठ्यासाठीच्या टेंडरमध्ये MSME लाभही मिळू शकतात.

कृषी प्रक्रिया, उत्पादन आणि विपणन सहकारी संस्था (उदा. धान्य, डाळी, मसाले, भाजी प्रक्रिया, बियाणे उत्पादन, पॅकिंग इ.) देखील MSME साठी अत्यंत योग्य आहेत. या संस्था उत्पादन आणि पुरवठा दोन्ही करतात. त्यामुळे त्यांना विलंबित देयक संरक्षण, टेंडर लाभ आणि अनेक योजनांचा प्रत्यक्ष फायदा मिळू शकतो.

मत्स्य सहकारी संस्था ज्या मासेमारी, प्रक्रिया, कोल्ड-चेन, पुरवठा आणि निर्यात यांसारख्या कामांमध्ये गुंतलेल्या असतात, त्या देखील MSME अंतर्गत येऊ शकतात. अशा संस्थांसाठी MSME चे लाभ विशेषतः संस्थात्मक खरेदीदारांकडून विलंबित देयकांची वसुली करण्यासाठी उपयुक्त ठरतात.

कामगार/लेबर कॉन्ट्रॅक्ट सहकारी संस्था ज्या मनुष्यबळ पुरवठा, हाऊसकीपिंग, सुरक्षा सेवा, लोडिंग-अनलोडिंग, स्वच्छता, आउटसोर्सिंग अशा सेवा देतात, त्यांच्यासाठी MSME लाभ अत्यंत महत्त्वाचे ठरतात. सेवा क्षेत्रात देयकांचा विलंब खूप सामान्य असतो आणि MSEFC मार्फत वसुलीचा अधिकार या संस्थांसाठी प्रत्यक्षात एक संरक्षण कवच ठरतो.

ग्राहक सहकारी संस्था (Consumer Co-operatives) ज्या संस्थांना साहित्य पुरवतात किंवा किरकोळ / घाऊक व्यापार करतात, त्या देखील MSME अंतर्गत येऊ शकतात. अशा संस्थांसाठी टेंडरमध्ये सहभाग आणि विलंबित देयक संरक्षण हे दोन्ही लाभ उपयुक्त ठरू शकतात.

हातमाग, हस्तकला, कारागीर, महिला सहकारी संस्था (Weavers / Artisan / Women Co-operatives) जर उत्पादन आणि विक्री करीत असतील, तर MSME चे लाभ त्यांच्यासाठीही अत्यंत महत्त्वाचे ठरू शकतात. या संस्था अनेकदा सरकारी संस्थांना, हँडीक्राफ्ट एम्पोरियमना, निर्यात संस्थांना किंवा खासगी खरेदीदारांना पुरवठा करतात, जिथे देयक विलंबाची समस्या वारंवार उद्भवते. MSME नोंदणीमुळे त्यांना कायदेशीर संरक्षण मिळते तसेच सरकारी योजनांपर्यंत पोहोच वाढते.

वाहतूक/ट्रान्सपोर्ट सहकारी संस्था जर व्यावसायिक वाहतूक सेवा पुरवत असतील आणि MSME च्या मर्यादेत येत असतील, तर त्या MSME अंतर्गत समाविष्ट होऊ शकतात. अशा संस्थांना विलंबित देयक संरक्षण आणि काही टेंडर लाभ उपलब्ध होऊ शकतात, विशेषतः त्या सरकारी किंवा PSU लॉजिस्टिक्स टेंडरमध्ये सहभागी होत असतील तर.

औद्योगिक/उत्पादन सहकारी संस्था (उदा. लघुउद्योग उत्पादन, अभियांत्रिकी, पॅकेजिंग, बांधकाम साहित्य, रेडीमेड कपडे, फूड प्रोसेसिंग इ.) यांच्यासाठी MSME सर्वाधिक उपयुक्त ठरते. या संस्थांसाठी MSMED Act अंतर्गत अधिकार, टेंडर लाभ आणि विविध योजनांपर्यंत पोहोच सर्वाधिक प्रभावी असते.

याउलट गृहनिर्माण सहकारी संस्था साधारणतः MSME साठी योग्य ठरत नाहीत. हाउसिंग सोसायटीचे काम सदस्य-आधारित देखभाल, सुविधा व्यवस्थापन आणि मेंटेनन्स शुल्क गोळा करणे इतक्यापुरते मर्यादित असते. ती वस्तू किंवा सेवांचा व्यावसायिक पुरवठा करणारी संस्था नसल्यामुळे MSME चे मुख्य लाभ (उदा. MSEFC मार्फत वसुली) सहसा लागू होत नाहीत.

त्याचप्रमाणे पतसंस्था / थ्रिफ्ट व क्रेडिट सहकारी संस्था ज्या मुख्यतः कर्ज देतात, ठेवी स्वीकारतात आणि व्याज उत्पन्न मिळवतात, त्यांच्यासाठी MSME चे लाभ मर्यादित असतात. MSMED Act मधील विलंबित देयकाची तरतूद प्रामुख्याने वस्तू किंवा सेवांच्या पुरवठ्यावर आधारित आहे, तर कर्जपुरवठा / क्रेडिट व्यवहार साधारणपणे त्या श्रेणीत येत नाहीत. त्यामुळे अशा क्रेडिट सहकारी संस्थांनी MSME नोंदणी केली तरीही MSEFC मार्फत विलंबित देयक वसुलीचा प्रत्यक्ष फायदा त्यांना सहसा मिळत नाही.

७. MSME टेंडर लाभ: सहकारी संस्थांसाठी स्थिती

MSME नोंदणी झाल्यास अनेक सरकारी टेंडरमध्ये MSME उद्योगांना EMD सवलत, अनुभव किंवा उलाढालीतील सुलभता, तसेच खरेदीत प्राधान्य असे लाभ दिले जातात. जर टेंडर कागदपत्रात स्पष्ट नमूद असेल की Udyam registered MSME bidders ना लाभ दिले जातील, तर सहकारी संस्था देखील हे लाभ घेऊ शकते, परंतु टेंडर दस्तऐवजात सहकारी संस्थांना विशेषतः वगळलेले नसणे आवश्यक आहे.

म्हणूनच सहकारी संस्थांनी टेंडरमध्ये सहभागी होण्यापूर्वी टेंडरच्या अटी काळजीपूर्वक वाचणे अत्यावश्यक आहे.

८. कर्ज, अनुदाने आणि योजना: सहकारी संस्थांसाठी प्रत्यक्ष स्थिती

MSME नोंदणी म्हणजे सहकारी संस्थेला आपोआप कर्ज किंवा अनुदान मिळेल असा अर्थ होत नाही. हे लाभ पूर्णपणे योजना-विशिष्ट (scheme-specific) असतात आणि प्रत्येक योजनेसाठी स्वतंत्र पात्रता निकष लागू असतात.

बँका आणि वित्तीय संस्था सहकारी संस्थांसाठी त्यांच्या आंतरिक कर्ज धोरणांनुसार (internal lending policy) निर्णय घेतात. अनेकदा सहकारी संस्थेचे उपनियम (bye-laws), अनुपालन स्थिती, लेखापरीक्षित अहवाल (audited accounts) आणि कर्ज घेण्याचे अधिकार यांवर कर्ज मंजुरी अवलंबून असते. म्हणून MSME नोंदणीला पात्रता सक्षम करणारे साधन (eligibility enabler) म्हणून समजावे, स्वयंचलित हक्क (automatic entitlement) म्हणून नव्हे.

९. MSME नोंदणी आणि कर लाभ (Income Tax / GST)

MSME नोंदणीमुळे स्वतंत्रपणे कोणतीही आयकर किंवा GST सूट मिळत नाही. सहकारी संस्थांना आयकरातील जे लाभ मिळतात, ते प्रामुख्याने Section 80P सारख्या तरतुदींमुळे मिळतात, जे MSME पासून स्वतंत्र आहेत.

GST मध्येही सवलत ही उलाढाल मर्यादा (turnover threshold) किंवा अधिसूचनेवर आधारित असते, MSME नोंदणीवर नाही.

म्हणून MSME नोंदणीचा मुख्य उपयोग साधारणतः विलंबित देयकांपासून संरक्षण, टेंडरमध्ये सहभाग, योजनांपर्यंत प्रवेश यांपुरताच मर्यादित मानला जातो.

❊ **निष्कर्ष –** १ एप्रिल २०२५ पासून लागू झालेल्या सुधारित MSME वर्गीकरणामुळे MSME ची व्याप्ती अधिक व्यापक झाली आहे. परिणामी आता दुग्ध, कामगार, मत्स्य, कृषी प्रक्रिया, ग्राहक, वाहतूक, हस्तकला, महिला तसेच औद्योगिक उत्पादनाशी संबंधित सहकारी संस्था MSME नोंदणी घेऊ शकतात **पान क्र. ४० वर**

बँकिंगमधील संवाद कौशल्य

डॉ. अभय मंडलिक
९४०३० ८०७२५

बँकिंग हा सेवा उद्योगातील महत्त्वाचा घटक आहे. बँकिंग मध्ये ग्राहकांशी वारंवार येणाऱ्या संपर्कामुळे संवाद कौशल्यांना अनन्य साधारण असे महत्त्व आहे.

शाखेमध्ये काम करणाऱ्या कर्मचारी, अधिकारी वर्गाला खातेदारांशी बोलत असताना भाषेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. संवाद कौशल्यावर व्यवसाय वृद्धी अवलंबून असते.

स्थानिक भाषा आणि लहेजा –

बँकेची शाखा ज्या भागात असेल त्या भागाची स्थानिक भाषा कर्मचारी, अधिकारी वर्गाला अवगत असणे अत्यंत आवश्यक आहे. बँकिंग हा पैशाशी निगडित व्यवसाय असल्यामुळे खातेदार आणि बँक कर्मचारी, अधिकारी यांनी परस्परांना समजावून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील शाखांमध्ये मराठी येणे ही कामकाजासाठीची गरज आहे. याबाबतीत सरकारी बँकांचे उदाहरण घेण्यासारखे आहे. या बँकांची रिक्रुटमेंट राष्ट्रीयपातळीवर होत असल्यामुळे निवड झालेल्या कर्मचाऱ्याला आवश्यकतेनुसार पोस्टिंग देण्यात येते. अनेकदा अन्य प्रांतातील कर्मचारी वर्गाला महाराष्ट्रात पाठवण्यात येते. काउंटर वर काम करीत असताना कर्मचाऱ्यांना स्थानिक भाषा येत नसल्यास कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणे कठीण ठरू शकते. याउलट सहकारी बँकांमधून स्थानिक भागातील कर्मचारी, अधिकारी त्याच भागात पाठवण्यात येतात. खातेदारांची संपर्क साधताना त्यांना कोणतीही अडचण येत नाही. अलीकडच्या काळात सरकारी बँकांनीही स्थानिक भाषा येणारे कर्मचारी, अधिकारी नियुक्त करणे सुरू केले आहे. व्यवसायाच्या गरजेपोटी हे करणे आवश्यक ठरले आहे. भाषा हे संपर्काचे प्रभावी माध्यम असल्यामुळे स्थानिक भाषेतून सुसंवाद हा व्यावसायिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा ठरतो. कर्मचारी वर्गाने स्थानिक लेहेजाप्रमाणे संभाषण केल्यास अधिक जवळीक साधली जाते असा अनुभव आहे.

अति तांत्रिक शब्दांचा वापर नको –

कर्मचारी, अधिकारी वर्ग यांना बँकिंगच्या तांत्रिक आणि कायदेशीर भाषेची उत्तम जाण असते, तथापि खातेदारांची बोलत असताना त्यांना समजेल अशा सामान्य भाषेत बोलणे आवश्यक ठरते. आरबीआय, क्लिअरिंग हाऊस, इंडोर्समेंट, चेक रिटर्न, इत्यादी तांत्रिक शब्दांऐवजी खातेदाराला समजतील अशा साध्या सोप्या शब्दांचा वापर करणे श्रेयस्कर असते.

ऐकून घेण्याची क्षमता वाढविणे –

बँकेत काम करणाऱ्यांनी खातेदाराचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेण्याची तयारी ठेवली पाहिजे. ऐकून घेण्याची क्षमता वाढवणे हा बँकिंग सेवेचा महत्वाचा भाग आहे. खातेदाराचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्याला योग्य तो व्यवसायिक सल्ला देणे सहज शक्य असते, याउलट त्याचे बोलणे खंडित केल्यास कामाला उशीर लागण्याची शक्यता असते शिवाय खातेदार नाराज होण्याची भीती असते.

परिपूर्ण माहिती –

शाखेमध्ये, विशेषतः काऊंटर वर काम करीत असलेल्या व्यक्तींना आपल्या बँकेच्या सर्व सेवा प्रॉडक्ट्स, त्यासाठीची नियमावली आणि आवश्यक कागदपत्रे याची परिपूर्ण माहिती असणे आवश्यक आहे. नवीन खाते काढण्यासाठी आलेल्या व्यक्तीला आवश्यक त्या कागदपत्रांची यादी देऊन ती समजावून सांगणे ही आवश्यक आहे. बँकेची व्यवस्थित माहिती असणे हे गरजेचे आहे.

यासाठी कर्मचारी वर्गाची ठराविक अंतराने प्रशिक्षणे घेणे अत्यंत आवश्यक असते. खातेदाराने माहिती विचारल्यास अन्य कर्मचारी, अधिकारी वर्गाकडे पाठवणे हे बँकेच्या प्रतिमेसाठी योग्य नसते. काउंटर वरील सर्व कर्मचारी, अधिकारी वर्गाला बँकेच्या सेवा आणि प्रोडक्टची परिपूर्ण माहिती असणे ही काळाची गरज आहे.

विशेष खातेदारांची काळजी –

अशिक्षित, अपंग, ग्रामीण भागातून आलेले, ज्येष्ठ नागरिक,बँकांबद्दल अजिबात माहिती नसलेले अशा खातेदारांशी बोलताना अत्यंत काळजीपूर्वक बोलणे आवश्यक असते. व्यवसाय या मंडळींमार्फतच येत असतो त्यामुळे ते नाराज होणार नाहीत अशी नम्र भाषा असावी. नव्याने आलेल्या ग्राहकांसाठी बसण्याची उत्तम व्यवस्था असावी, त्यांच्याशी सहजपणे बोलता येईल अशी काउंटरची रचना असावी. सहजपणे बोलता येईल अशी रचना असल्यास उभयपक्षी ते सोयीचे ठरते. शाखेमध्ये नवीन ग्राहक वर्ग आल्यास त्याची तातडीने दखल घेऊन त्यांना योग्य त्या काउंटरवर तत्परतेने नेल्यास बँकेबद्दलची प्रतिमा उजळते.

बँकिंग मध्ये असलेल्या स्पर्धेचा गंभीरपणे विचार केल्यास खातेदार मिळवणे आणि जुने खातेदार टिकवून ठेवणे हे अत्यंत आवश्यक आहे.

सहकारी संस्थांसाठी MSME मार्गदर्शकः कोणत्या संस्थेला कोणता लाभ आणि कितीपर्यंत?

पान क्र. ३९ वरून आणि MSME चे प्रमुख लाभ प्रत्यक्षात वापरू शकतात.विशेषतः MSMED Act अंतर्गत विलंबित देयकांवर मिळणारे कायदेशीर संरक्षण सहकारी संस्थांसाठी अत्यंत प्रभावी साधन ठरते. याउलट गृहनिर्माण आणि पतसंस्था प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी MSME चे लाभ सामान्यतः मर्यादित राहतात, कारण त्यांचे कार्य स्वरूप वस्तू किंवा सेवांच्या व्यावसायिक पुरवठ्यापेक्षा वेगळे असते.

समग्रपणे असे म्हणता येईल की MSME नोंदणी ही सहकारी संस्थांसाठी एक महत्त्वाची संधी आहे; परंतु तिचा प्रत्यक्ष लाभ संस्थेच्या कार्यप्रकारावर, आर्थिक मर्यादांवर आणि उद्दिष्टांवर (टेंडर, विलंबित देयक वसुली, योजना / कर्ज) अवलंबून असतो.

(लेखक : राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य, सहकार भारती
कोषाध्यक्ष, सहकार भारती – दिल्ली
मोबाईल क्र. : ९९६८२२००७६)

सहकाराची डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल

पान क्र. ३७ वरून सुरू होईल. यामुळे ग्रामीण भागात सहकाराच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती होईल. परंतु, राजकारणाशी अतूट नाते असलेले सहकार क्षेत्र या सर्व गोष्टींचा फायदा कसा उठवेल हे पाहणे महत्त्वाचे आहे.

✻ अर्थसंकल्प संरचनात्मक बळ देणारा –

वरील पार्श्वभूमीवर यंदाचा अर्थसंकल्प हा सहकार क्षेत्राला थेट अनुदान अथवा सवलत देणारा नसला, तरी संरचानात्मक बळ देणारा ठरेल. लाभांशावरील कर सवलत, डिजिटल एकात्मीकरण, ग्रामीण भागातील कर्ज विस्तार, राष्ट्रीय सहकार धोरणास आर्थिक पाठबळ यांच्या एकत्रीकरणामुळे सहकार क्षेत्रासाठी भविष्यातील पायाभरणी मजबूत होईल, असा आशावाद या निमित्ताने मी व्यक्त करू इच्छितो.

(लेखक – प्रशासक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक, मुंबई)

नवीन सहकार धोरण सर्वसमावेशक, भविष्याचा वेध घेणारे - मा. ना. बाबासाहेब पाटील

महाराष्ट्रासाठी तयार करण्यात येणारे नवीन सहकार धोरण सर्वसमावेशक आणि भविष्याचा वेध घेणारे असणार आहे, असे मत राज्याचे सहकारमंत्री मा. ना. बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केले. ग्रीन वर्ल्ड पब्लिकेशन आणि कॉसमॉस सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकार मंथन' यावर राज्यस्तरीय परिषद आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते.

✻ विभागनिहाय बैठकांचे आयोजन –

सहकार मंत्रालयाकडून विभागनिहाय बैठकांचे आयोजन करण्यात येत असून त्या त्या भागातील सहकार क्षेत्रातील तज्ञ, अधिकारी, संस्थांचे अनुभव आणि सूचना घेण्यात येत आहेत. या सगळ्या मतांचा विचार करून धोरण व्यापक स्वरूपात तयार केले जाणार आहे. परिषदेत सहकार क्षेत्रातील विविध घटक संस्थांचे पदाधिकारी, प्रतिनिधी संचालक सहभागी झाले होते. परिषदेत सायबर सुरक्षा, एआय, तसेच सहकार क्षेत्रात तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सुरक्षित डिजिटल व्यवहार यावर तज्ञांनी मार्गदर्शन केले. राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आणि लेखक गौतम कोतवाल उपस्थित होते.

✻ आधुनिक तंत्रज्ञानावर भर हवा –

समारोप सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या उपस्थितीत करण्यात आला. ते म्हणाले, नवीन सहकारी धोरण ठरविताना अन्य राज्यातील चांगल्या पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे. सहकारी संस्थांनी तरुण आणि महिलांचा सक्रिय सहभाग वाढविला पाहिजे. त्याचप्रमाणे आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारून अधिक सक्षम होण्याची गरज आहे. यावेळी त्यांच्या हस्ते सहकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संस्थांना पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

बँकेचे माजी अध्यक्ष मिलिंद काळे यांनी सांगितले की, सहकाराच्या माध्यमातून समृद्धी हवी असेल तर त्यासाठी सहकाराच्या विचाराची पाळेमुळे समाजात रुजण्याची गरज आहे. समाज प्रगती पथावर नेण्यासाठी सहकार हा उत्तम मार्ग आहे. बँकेने सर्वसमावेशक धोरण स्वीकारून व्यावसायिक दृष्टीकोनातून यशस्वी वाटचाल केली आहे. कोतवाल यांनी मनोगत व्यक्त केले.

गोदावरी अर्बनला ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार प्रदान

सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल येथील गोदावरी अर्बनला ग्रीन वर्ल्ड को-प्राईड पुरस्कार सहकार मंत्री मा. ना. बाबासाहेब पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संस्थेचे सचिव रविंद्र रगटे यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, कॉसमॉस सहकारी बँक अध्यक्ष प्रल्हाद कोकरे आदी उपस्थित होते.

सहकार मंत्री श्री. पाटील यांनी गोदावरी संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. संस्थेचे संस्थापक हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील यांनी पुरस्काराबद्दल आनंद व्यक्त केला. संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर आणि अधिकारी, कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

सहकारांतर्गत सहकारामुळे चळवळीला बळकटी - प्रा. दुर्गाडे

सहकारांतर्गत सहकार अधिक व्यापक होत असल्याने सहकार चळवळीला बळकटी मिळत आहे, असे मत पुणे जिल्हा सहकारी बँक अध्यक्ष प्रा. दिगंबर दुर्गाडे यांनी व्यक्त केले आहे. बँकेच्या वतीने आयोजित कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन बँकेचे उपाध्यक्ष सुनील चांदेरे यांच्या हस्ते करण्यात आले.

आरबीआयने जारी केलेली सुधारित धोरणे, त्याचा तुलनात्मक अभ्यास कार्यपद्धती, अंमलबजावणी बाबतचा कृती आराखडा तयार करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सनदी लेखापाल उदय कुलकर्णी, अकोला वाशिम जिल्हा सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी अनंत वैद्य, ठाणे जिल्हा सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीकांत पटारे, सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमोद गावडे, परभणी जिल्हा सहकारी बँक मुख्य कार्यकारी अधिकारी व्यंकटेश कुरुंदकर, सातारा जिल्हा सहकारी बँक सरव्यवस्थापक राजेंद्र गाढवे आणि राज्यातील १५ सहकारी बँकांचे वरिष्ठ अधिकारी यामध्ये सहभागी झाले होते.

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिरुद्ध देसाई यांनी प्रास्ताविक तर सरव्यवस्थापक संजय शितोंळे यांनी आभार मानले.

सहकार कायद्यातील बदलासाठी १६ सदस्यांची समिती गठीत

सध्याच्या प्रचलित सहकार कायद्यातील बदलासाठी राज्याचे सहकार आयुक्त दीपक तावरे यांच्या अध्यक्षतेखाली १६ सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती तयार करण्यात आली आहे आणि ही समिती येत्या दोन महिन्यात अहवाल देणार आहे.

या समितीकडून सहकार कायदा आणि नियमामध्ये करावयाच्या सुधारणाबाबतचा अहवाल यावर विचार करून अहवाल देणार आहे. या समितीमध्ये साखर आयुक्त डॉ. संजय कोलते, दुग्ध विकास आयुक्त प्रशांत मोहोड, पणन संचालक संजय कदम, तसेच विविध सहकारी संस्था, बँक यांचे पदाधिकारी यांचा समावेश आहे. यामध्ये राज्य सहकारी बँक प्रशासक विद्याधर अनास्कर, सहकारी साखर कारखाना संघ व्यवस्थापकीय संचालक संजय खताळ, राज्य सहकारी पतसंस्था महासंघ अध्यक्ष काका कोयटे, राज्य हाऊसिंग फेडरेशन अध्यक्ष सुहास पटवर्धन, ठाणे जिल्हा हौसिंग फेडरेशन अध्यक्ष सीताराम राणे, सहकार भारती प्रदेश महामंत्री विवेक जुगादे यांचा समावेश करण्यात आला आहे.

माजी सहकार आयुक्त मधुकर चौधरी, माजी अपर सहकार आयुक्त दिनेश ओउळकर, एस. बी. पाटील, कोकण विभागीय सहनिबंधक मिलिंद भालेराव, अपर निबंधक राजेश सुरवसे यांचा समावेश आहे. सहकार क्षेत्रासमोरील विविध आव्हाने लक्षात घेऊन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मध्ये आवश्यक ते बदल करण्यासाठी नव्याने समिती तयार करण्यात आली आहे.

सहकार तत्त्वावरील 'भारत टॅक्सी' उपक्रमामुळे चालकांना फायदा - केंद्रीय सहकारमंत्री मा. ना. श्री. अमित शहा

सहकार तत्त्वावरील भारत टॅक्सी या उपक्रमामुळे चालकांना फायदा होणार आहे, असे मत केंद्रीय सहकारमंत्री मा. ना. श्री. अमित शहा यांनी सांगितले. या उपक्रमासाठी सहकार क्षेत्रातील अमुल, इफ्को आणि नाबार्ड यांनी पुढाकार घेतला आहे.

नवी दिल्ली येथे भारत टॅक्सीच्या लोकार्पणानंतर ते बोलत होते. ते म्हणाले, ही केवळ योजना नसून चालक बंधूभगिनी यांना सन्मानाने सारथी बनविण्याचा उपक्रम आहे. या ठिकाणी चालक केवळ वाहन चालविणारे नसून तेच कंपनीचे मालक आहेत. या उपक्रमाचा येत्या काळात देशभरात विस्तार करण्यात येणार आहे. त्यासाठी टॅक्सी चालकांनी पुढील तीन वर्ष संयम राखणे आवश्यक आहे.

या उपक्रमात चालकच मालक होणार आहेत, असे नमूद करून ते म्हणाले, या उपक्रमात सहभागी होणाऱ्या प्रत्येक सारथीला केवळ ५०० रुपयांचा शेअर घेतल्यास कंपनीतील भागीदारी आणि मालकीचा हक्क मिळणार आहे. एकूण कमाईपैकी २० टक्के रक्कम भारत टॅक्सीच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे तर ८० टक्के रक्कम ही थेट सारथीच्या खात्यात जमा होणार आहे. आगामी तीन वर्षांनंतर होणाऱ्या नफ्यातून ८० टक्के रक्कम सारथी यांना देण्यात येणार आहे, असे ते म्हणाले.

शेतीपूरक उद्योगांना 'एनए' ची अट मागे

प्रदूषण नियंत्रण मंडळाने काढले परिपत्रक: सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना दिलासा

राज्यातील शेतीपूरक अन्नप्रक्रिया उद्योगांना बिगर शेती प्रमाणपत्राची अट लावणाऱ्या प्रदूषण नियंत्रण मंडळाने अखेर माघार घेतली असून ही सक्ती रद्द करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून राज्यातील शेती प्रक्रिया उद्योग उभा करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी बिगर शेती प्रमाणपत्राची अट घालण्यात आली होती तसेच ग्रामपंचायतीने दिलेला ना हरकत दाखला स्वीकारण्यासही मंडळाने नकार दिला होता.

राज्यातील शेती प्रक्रिया अन्नप्रक्रिया उद्योगांना बांधकाम परवाना, बिगर शेती परवाना आणि अन्य किचकट प्रक्रियांमधून सुट देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शेतीमालाला योग्य भाव मिळण्यासाठी आणि प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्य सरकारने हे निर्णय घेतले होते. मात्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने त्याला परिपत्रकाच्या माध्यमातून खोडा घालण्याचा प्रयत्न केला होता. तसेच कृषी प्रक्रिया आणि अन्नप्रक्रिया उद्योगांना बिगर शेती प्रमाणपत्र बंधनकारक केले होते. राज्यात अधिसूचित औद्योगिक क्षेत्राबाहेर असलेल्या उद्योगांना परवानगी देण्याच्या अर्जावर प्रक्रिया करताना सक्षम नियोजन प्राधिकरणाकडून, महानगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत विभाग जिल्हाधिकारी कार्यालय यांनी वैध इमारत परवानगी प्राप्त झाली आहे की नाही हे सक्तीने तपासावे. तसेच स्थानिक संस्थेने म्हणजेच ग्रामपंचायतीने दिलेले ना हरकत प्रमाणपत्र हे सक्षम नियोजन प्राधिकाऱ्यांकडून मिळालेला इमारत परवाना वैध मानला जाणार नाही, असे परिपत्रक काढले होते.

वादग्रस्त परिपत्रक अखेर रद्द

राज्यात कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगांची उभारणी करण्यात येत होती. स्टोन क्रशर आणि कृषी व अन्नप्रक्रिया उद्योगांबाबत काढलेल्या शासन आदेशामध्ये स्पष्ट उल्लेख असूनही प्रदूषण नियंत्रण मंडळाने अटी शर्तीच्या आधारे या उद्योगाला खोडा घालण्याचा प्रयत्न केला होता. या शासन आदेशानुसार प्रदुषण नियंत्रण मंडळाचे परिपत्रक रद्द करण्यात आले आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाने काढलेल्या परिपत्रकाचा कृषी प्रक्रिया उद्योगांना चांगलाच फटका बसला. बाळासाहेब ठाकरे स्मार्ट प्रकल्प म्हणजेच 'स्मार्ट' प्रकल्पासाठी कृषी विभागाने २०१८ मध्ये २० हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या कोणत्याही सूक्ष्म, लघू आणि मध्यम अन्नप्रक्रिया उद्योगांना बिगर शेती परवानगी आवश्यक नसल्याचा शासन आदेश काढला होता. त्यानुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाला सक्षम प्राधिकाऱ्यांकडून बिगर शेती प्रमाणपत्र सक्ती, बांधकाम परवानगी शिथिल करण्याची आणि स्थानिक संस्था म्हणजेच ग्रामपंचायतीच्या ना हरकत प्रमाणपत्रांच्या आधारे व्यवसाय चालविण्यास परवानगीची मागणी करण्यात आली होती.

करारामागचे अर्थशास्त्र

डॉ. सुनील देशमुख

भारत आणि अमेरिका यांच्यात फेब्रुवारी २०२६ च्या सुरुवातीला जाहीर झालेला व्यापारकरार हा द्विपक्षीय आर्थिक संबंधांच्या दृष्टीने एक महत्वाचा टप्पा आहे. हा करार संपूर्ण मुक्त व्यापार करार (एफटीए) नसला, तरी भारतीय निर्यातीवर लागू होणाऱ्या अमेरिकेच्या परस्पर शुल्काची (रेसिप्रोकल टेरिफ) कमाल मर्यादा १८ टक्क्यांवर निश्चित करणे ही अलीकडच्या काळातील व्यापारातील अडथळे कमी करणारी महत्वाची पायरी आहे. हा करार केवळ व्यापारापुरत मर्यादित नसून जागतिक व्यापारव्यवस्थेतील बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब आहे. आज जागतिक व्यापार बहुपक्षीय आदर्शापेक्षा द्विपक्षीय, धोरणात्मक आणि काही प्रमाणात उदारीकरणाकडे झुकत आहे. अमेरिका-भारत करार हीच वस्तुस्थिती अधोरेखित करताना दिसतो.

वास्तववादी मर्यादा

पारंपरिक मुक्त व्यापार करारांप्रमाणे हा करार व्यापक नाही. तो जाणीवपूर्वक मर्यादित आणि व्यवहार्य स्वरूपाचा आहे. अमेरिकेने भारतीय निर्यातीवरील शुल्क मर्यादित ठेवण्याचे मान्य केले असून, त्याच्या बदल्यात भारताने ऊर्जा संरक्षण आणि नागरी विमानवाहतूक या उच्च-मूल्य क्षेत्रांमध्ये अमेरिकेकडून आयात वाढवण्याची तयारी दर्शवली आहे. काही कृषी व औद्योगिक उत्पादनांचाही यात समावेश आहे. हा आराखडा दोन्ही देशांतील राजकिय व आर्थिक मर्यादा लक्षात घेऊन आखण्यात आला आहे. अमेरिकेसाठी असमतोलाची चिंता मिटण्याची शक्यता असून, उर्जा व संरक्षण क्षेत्रातील भागीदारी अधिक मजबूत करणारा आहे. भारतासाठी निर्यातीतील स्पर्धेला वाव देणार आहे.

शुल्कातील स्थिरता

गेल्या काही वर्षांत वस्त्रोद्योग, रत्न व दागिने, अभियांत्रिकी उत्पादने आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ या क्षेत्रांतील भारतीय निर्यातदारांना अमेरिकी बाजारात अनिश्चिततेचा सामना करावा लागला आहे. अनेक वेळा गुणवत्ता असूनही, धोरणात्मक शुल्कवाढीमुळे भारतीय उत्पादने स्पर्धेत मागे पडली. आता १८ टक्के शुल्क मर्यादेमुळे धोरणात्मक स्थिरता निर्माण झाली आहे. जागतिक खरेदीदारांसाठी ही स्थीरता अत्यंत महत्त्वाची असते. कारण कमी नफ्यात काम करणाऱ्या उद्योगांसाठी काही टक्के शुल्कातील फरकही फार मोठा परिणाम करणारा ठरतो. त्यामुळेच उद्योगाक्षेत्रातून मागणी वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

क्षेत्रनिहाय परिणाम

या कराराचा थेट फायदा कामगारप्रधान आणि मध्यम मूल्य उत्पादन क्षेत्रांना होण्याची शक्यता आहे. वस्त्रोद्योगात, विशेषतः कापूस आधारीत उत्पादनांमध्ये, भारताची क्षमता तुलनात्मकदृष्ट्या जास्त असून ती पुन्हा वापरता येईल. रत्न व दागिने उद्योग हा शुल्कबदलांबाबत अत्यंत संवेदनशील समजला जातो. मात्र, आता त्यालाही अमेरिकी बाजारातून वाढीव मागणी मिळण्याची अपेक्षा आहे. वाहन क्षेत्र, औद्योगिक यंत्रसामुग्री आणि अभियांत्रिकी वस्तू यासारख्या क्षेत्रांनाही फायदा होऊ शकतो. मात्र, त्यासाठी अमेरिकी दर्जा, प्रमाणपत्रे आणि नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. ही क्षेत्रे रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने महत्वाची असल्याने त्याचा देशांतर्गत आर्थिक परिणाम व्यापक ठरू शकतो

कृषी क्षेत्र

भारताच्या कोणत्याही व्यापार चर्चेत कृषी क्षेत्र अत्यंत संवेदनशील व महत्त्वाचे ठरते. या करारातही भारताने मूलभूत कृषी हितसंबंधांचे संरक्षण निश्चित केले आहे. अमेरिकी कृषी उत्पादनांना मर्यादित आणि टप्प्याटप्प्याने प्रवेश देण्यात आला असून, मुख्य अन्नधान्य व दुग्धउद्योग सुरक्षित ठेवण्यात आला आहे. ही भूमिका भारताच्या व्यापार धोरणातील बदल दर्शविणारी असून, यामुळे हळूहळू उदारीकरणाकडे वाटचाल होऊ शकते.

आयात वचनबद्धता व ५०० अब्ज डॉलर

माध्यमांमध्ये भारताची अमेरिकेकडून होणारी आयात दीर्घकालीन कालावधीत ५०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचू शकते अशा चर्चा झाल्या आहेत. ही आकडेवारी बंधनकारक नसली तरी उर्जा, संरक्षण आणि विमानवाहतूक क्षेत्रांतील भारताच्या वाढत्या गरजांचे संकेत देणारी आहे. अल्पकालीन दृष्टिकोनातून या आयातींमुळे व्यापार तूट वाढू शकते. मात्र, दीर्घकालीन दृष्टीने पाहता संरक्षणात्मक आणि नागरी विमानसेवा विस्तार यामुळे आर्थिक वाढीस चालना मिळू शकते.

रुपयाला मिळणार बळ

करार जाहीर झाल्यानंतर भारतीय रुपयांत डॉलरच्या तुलनेत मजबुती दिसून आली. निर्यातवाढ, भांडवली प्रवाह आणि परकीय गुंतवणुकीच्या अपेक्षांमुळे बाजारांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मात्र, आयात वाढीमुळे हा प्रभाव काही अंशी संतुलित होईल. त्यामुळे रुपयाचे मूल्य स्थिर आणि मर्यादित प्रमाणात मजबूत राहण्याची शक्यता आहे.

आर्थिक वाढीवरील परिणाम

बहुतांश अर्थतज्ञांच्या मते, या करारामुळे भारताच्या 'जीडीपी' वाढीत १५ ते २५ बेसिस पॉईंटची भर पडू शकते. हा आकडा मोठा वाटत नसला, तरी व्यापार करारांचे खरे लाभ दीर्घकालीन आणि अप्रत्यक्ष असतात. त्यामुळे गुंतवणूक निर्णय, पुरवठा साखळी स्थलांतर आणि उत्पादकतेतील वाढ होऊ शकते.

अमेरिका विरूद्ध युरोपियन युनियन

भारत-युरोपियन युनियन करार हा व्यापक, तांत्रिक आणि नियामक स्वरूपाचा आहे. त्यात वस्तू, सेवा, गुंतवणूक आणि मानकांचे सुसूत्रीकरण समाविष्ट आहे. त्याउलट अमेरिका-भारत करार वेगवान, लक्ष्यकेंद्रित आणि धोरणात्मक आहे. हे भारताच्या बहुआयामी व्यापार धोरणाचे द्योतक आहे.

भू-राजकीय पार्श्वभूमी

जागतिक व्यापार आता केवळ कार्यक्षमतेवर नव्हे, तर विश्वास आणि धोरणात्मक सुसंगतीवर आधारभूत होत आहे. या पार्श्वभूमीवर अमेरिका-भारत करार हा भारताला विश्वासार्ह आर्थिक भागीदार म्हणून अधोरेखित करतो. यादृष्टीने तो महत्त्वाचा ठरतो.

निष्कर्ष

फेब्रुवारी २०२६ मधील अमेरिका-भारत व्यापार करार हा निव्वळ मोठ्या घोषणांच्या यादीपेक्षा दिशादर्शक सुधारणेच्या दृष्टीने केलेला एक प्रयत्न आहे. तो स्पर्धात्मकतेला वाव देणारा आहे. हा करार बाजारातील विश्वास वाढवतो आणि धोरणात्मक वास्तवाशी सुसंगत असलेल्या आर्थिक सहकार्याची चौकट उभी करतो. कराराचे यश हे अंमलबजावणीवर अवलंबून असेल हे निश्चित. त्याचप्रमाणे ते निर्यातवाढ, आयात व्यवस्थापन आणि देशांतर्गत सुधारणा या तिन्ही घटकांच्या समतोलावरही अवलंबून आहे.अशा प्रकारच्या वास्तववादी करारांकडेच भविष्यातील व्यापाराचे सूत्र राहील असा विश्वास वाटतो.

(लेखक 'इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट अकाऊंटस (आयएमए), यूएसए' चे माजी अध्यक्ष आहेत.)

अकृषक परवानगी, सनद तसेच अकृषक आकारणी रद्द करण्याबाबत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, (सुधारणा) २०२५ च्या अनुषंगाने दिशानिर्देश देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः एनएपी-२०२५/प्र.क्र.१७७/जमीन-०१अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १० फेब्रुवारी, २०२६

वाचा :-

१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६
२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६
३) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०२५

प्रस्तावना :-

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ४२, ४२अ, ४२ब, ४२क, ४२ड व कलम ४४-अ अन्वये काही प्रकरणी जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता परवानगीची आवश्यकता नसल्याबाबत वेळोवेळी म्हणजेच सन १९९४, २०१४, २०१७, २०१८ तरतूदी करण्यात आल्या होत्या. या तरतुदींनुसार जमीनधारकांना अकृषक कर भरुन जमिनीचा अकृषिक वापर करण्यासाठी मानीव अकृषिक वापराची सनद घेणे आवश्यक होते. त्यासाठी करावी लागणारी कार्यवाही व वेळ हा जमिनीच्या अकृषिक प्रयोजनासाठी वापर करण्याकरिता लागणाऱ्या परवानगी एवढाच लागत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले होते. तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार नियोजन प्राधिकरणाने जमिनीवर विकास परवानगी दिली किंवा बांधकाम आराखडे मंजूर केले, तर अकृषिक वापरासाठी महसूल विभागाची परवानगी तसेच, अकृषिक वापराच्या सनदेची तरतूद अनावश्यक ठरत आहे. यास्तव नागरिकांच्या सुविधेकरिता या तरतुदींमध्ये बदल करणे ही काळाची गरज बनली होती. त्याकरिता, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ नुसार नियोजन प्राधिकरण व महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ नुसार महसूल विभाग यांची दुहेरी परवानगी टाळणे आवश्यक होते. आतापर्यंत अकृषक परवानगी घेतांना राज्यातील महानगरपालिका क्षेत्र, अ वर्ग नगरपालिका क्षेत्रामधील जमीनधारकांना एकवेळचा रुपांतरण कर शासनास भरावा लागत होता. तसेच,

राज्यातील अकृषिक वापर असलेल्या जमिनीवर महसूल विभागाकडून दरवर्षी अकृषिक कर आकारला जात होता. त्याशिवाय अशा जमिनींवर उभारलेल्या मिळकतींवर स्थानिक स्वराज्य संस्थांकडून मिळकत कराची (Property Tax) आकारणी देखील केली जाते. अशा दुहेरी करपद्धतीमुळे अकृषिक कर रद्द करण्याची वारंवार मागणी होत होती.

त्याकरिता, सन २०२५ च्या हिवाळी अधिवेशनात सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२५ विधिमंडळात सादर करण्यात आले होते. विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाने मंजुरी दिल्यानंतर तसेच मा. राज्यपाल महोदयांच्या मंजुरीने या विधेयकाचे आता दिनांक ३१.१२.२०२५ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा), २०२५ मध्ये रुपांतरण झाले आहे. या सुधारणेद्वारे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ नुसार अकृषिक वापराची परवानगी व सनदेबाबतच्या कार्यपध्दतीबाबत पूर्वीची अंतर्भुत असलेली क्लिष्ट कलमे जसे कलम ४२, ४२अ, ४२ब, ४२क, ४२ड वगळून, नव्याने सुटसुटीत कलम ४२ समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच, जमिनीच्या अकृषिक प्रयोजनाच्या वापराकरीता रुपांतरण कर तसेच दरवर्षी आकारला जाणारा संपूर्ण अकृषिक कर रद्द करण्याच्या अनुषंगाने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील यापुर्वीचे कलम ४७, ४७अ आणि प्रकरण ७ (कलम १०८ ते कलम १२०) वगळण्यात आले आहे, व त्याऐवजी कलम ४७ मध्ये नव्याने तरतुद समाविष्ट करुन त्यामध्ये जमिनीच्या वापरातील बदलादाखल, जमिनीच्या क्षेत्रफळानुसार टप्पा निहाय चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्यावर आधारीत एकरकमी रुपांतरण अधिमूल्य (Premium) आकारण्यात येणार आहे. सदर सुधारणेच्या अनुषंगाने सर्व क्षेत्रीय अधिकारी / प्राधिकारी तसेच सर्व नागरिकांना त्यानुषंगाने सूचना / दिशानिर्देश देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:</u>

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (दुसरी सुधारणा), २०२५ ची प्रत सोबत जोडली आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे सूचना / दिशानिर्देश देण्यात येत आहेत:-

१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या कलम ४२ नुसार, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरीता संबंधित नियोजन प्राधिकरणाने एखाद्या जमिनीवर विकास परवानगी

देणे / बांधकाम आराखडे मंजूर करणे अनुज्ञेय असल्यास, यापुढे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये जिल्हाधिकारी यांचेकडून स्वतंत्र अकृषक परवानगीची आवश्यकता राहणार नाही.

२) यासाठी संबंधित जमीनधारक थेटरित्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १८ मधील तरतुदीनुसार निश्चित केलेल्या संबंधित प्राधिकरणाकडे अर्ज करु शकेल. संबंधित जमीनधारक असा अर्ज नगर विकास विभागामार्फत सध्या विकसित करण्यात आलेल्या Building Permission Management System- BPMS, Auto DCR किंवा यापुढे शासन वेळोवेळी निश्चित करेल अशा संगणकीय प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने अर्ज करु शकेल. जेथे कोणतीही ऑनलाईन संगणकीय प्रणाली वापरात नसेल तेथे नगर विकास विभागाने निश्चित केलेल्या कार्यपध्दतीनुसार ऑफलाईन पद्धतीने करु शकेल.

३) अर्जदाराची जमीन वर्ग-१ ची अथवा वर्ग-२ ची असली तरी त्याला बांधकाम / विकास परवानगीसाठी अर्ज करायला बाधा नाही. परंतू, केवळ बांधकाम परवानगी दिली म्हणून भोगवटादार वर्ग-२ अथवा भाडेपट्ट्याच्या जमिनीच्या दर्जामध्ये कोणताही बदल होणार नाही.

४) भोगवटादार वर्ग-१ व्यतिरिक्त अन्य जमिनी या प्रतिबंधित सत्ताप्रकाराच्या असून सदर जमिनी या त्यासंबंधित कायदे, नियम अथवा शासकीय आदेशानुसार ठराविक प्रयोजनासाठी विविध अटी-शर्तींवर धारण केलेल्या असतात. सदर जमिनीच्या वापराच्या प्रयोजनात बदल करावयाचा असल्यास अथवा बांधकाम करावयाचे असल्यास त्याकरीता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदीनुसार नियोजन प्राधिकरणाकडून विकास / बांधकाम परवानगी घेण्यापूर्वी सदर जमीनधारकाला आवश्यक असेल तेथे सदर जमिनींशी संबंधित कायदे, नियम अथवा शासन आदेशामधील तरतुदींनुसार शासन अथवा संबंधित सक्षम अधिकारी / प्राधिकारी यांची मान्यता प्राप्त करून विहीत करण्यात आलेल्या नजराणा / अधिमूल्याचा भरणा करणे आवश्यक राहील. तसे न केल्यास सदर जमीनधारक यांच्या विरुद्ध संबंधित कायदे, नियम अथवा शासन आदेशामधील तरतुदींनुसार कारवाई करण्यास जिल्हाधिकारी अथवा संबंधित सक्षम प्राधिकारी यांना कोणतीही बाधा असणार नाही.

५) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार नियोजन प्राधिकरणाकडून जमिनीच्या अकृषक वापराकरीता परवानगी देतेवेळी सदर जमीनधारकाकडून खाली नमूद

दराने एकरकमी रुपांतरण अधिमूल्य (Conversion Premium) भरुन घेण्यात येईल व त्यानंतर नियोजन प्राधिकरणाकडून विकासाची / बांधकामाची परवानगी देण्यात येईल.

एकरकमी रुपांतरण अधिमूल्य (Premium) आकारण्याचे दर:-

(अ) १००० चौ.मी. पर्यंतच्या क्षेत्राच्या भुखंडासाठी क्षेत्रफळानुसार चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या ०.१०%

(ब) १००१ चौ.मी. ते ४००० चौ.मी. पर्यंतच्या भुखंडासाठी क्षेत्रफळानुसार चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या ०.२५%

(क) ४००१ चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्राच्या (एक एकरपेक्षा जास्त) भुखंडासाठी क्षेत्रफळानुसार चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या ०.५०%

६) वरीलप्रमाणे प्राप्त होणाऱ्या रुपांतरण अधिमूल्याची विभागणी सदर कार्यक्षेत्राशी संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्था व शासन यांच्यामध्ये खाली नमूद केल्यानुसार करण्यात येईल:-

अ) संबंधीत "अ" वर्ग महानगरपालिका कार्यक्षेत्रात शासनास प्राप्त होणाऱ्या रुपांतरण अधिमूल्यापैकी ३०% रुपांतरण अधिमूल्याची रक्कम ही संबंधित "अ" वर्ग महानगरपालिकेला शासनाकडून देण्यात येईल.

ब) संबंधीत "अ" वर्ग व्यतिरिक्त इतर महानगरपालिका, नगर पालिका व नगर पंचायत कार्यक्षेत्रात शासनास प्राप्त होणाऱ्या रुपांतरण अधिमूल्यापैकी ५०% रुपांतरण अधिमूल्याची रक्कम ही संबंधित महानगरपालिका, नगर पालिका, नगरपंचायतीस शासनाकडून देण्यात येईल.

क) संबंधीत ग्रामपंचायत कार्यक्षेत्रात प्राप्त होणाऱ्या रुपांतरण अधिमूल्यापैकी ५०% रुपांतरण अधिमूल्याची रक्कम ही संबंधित जिल्हापरिषदेला शासनाकडून देण्यात येईल. जिल्हापरिषदेस प्राप्त होणाऱ्या महसुलापैकी २५% महसूल हा संबंधित जिल्हापरिषद व २५% महसूल हा संबंधीत ग्रामपंचायतीस देण्यात येईल.

७) सदर प्रस्तावामध्ये प्राप्त होणाऱ्या रुपांतरण अधिमूल्यातून प्राप्त होणारा शासनाचा हिस्सा हा GRAS प्रणाली मार्फत महसूल विभागाच्या **"००२९ जमीन महसूल"** या लेखाशिर्षाखाली जमा करण्यात यावा. स्थानिक स्वराज्य संस्थांचा रुपांतरण अधिमूल्यामधील हिस्सा संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.

८) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत अनुज्ञेय असलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरीता संबंधित नियोजन प्राधिकरणाने एखाद्या जमिनीवर विकास परवानगी / बांधकाम / रेखांकन आराखडे मंजूर केल्यास महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अन्वये स्वतंत्र अकृषक परवानगीची आवश्यकता राहणार नसल्याने सदर जमिनीवर कोणत्याही बँक / वित्तीय संस्थेमार्फत कोणत्याही प्रकारचे कर्ज वा अन्य सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी अकृषक वापराच्या सनदेची आवश्यकता नाही. तसेच त्याकरीता कोणत्याही बँक / वित्तीय संस्थेने आग्रह धरु नये. जिल्हाधिकारी यांनी ही तरतुद त्यांच्या अधिनस्त कार्यक्षेत्रातील सर्व बँक / वित्तीय संस्थांच्या निदर्शनास आणावी.

९) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ नुसार नियोजन प्राधिकरणाकडून जमिनीवर विकास / बांधकाम परवानगी दिल्यानंतर Building Permission Management System- BPMS / Auto DCR किंवा शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या प्रणालीद्वारे व Digital ७/१२ या संगणकीय प्रणालीमध्ये समन्वय साधुन त्याबाबत संबंधित जमिनीच्या महसूली अभिलेखांमध्ये नोंद घेण्याची कार्यवाही करण्यात येईल. जेथे कोणतीही ऑनलाईन संगणकीय प्रणाली वापरात नसेल तेथे नियोजन प्राधिकरणाने संबंधित तहसिलदार यांना स्वतंत्ररित्या याबाबत सूचित करावे.

१०) यापुढे, बिनशेती झालेल्या मिळकतींवर दरवर्षी आकारला जाणारा अकृषिक कर आकारण्यात येवू नये. तसेच सदर सुधारणेच्या दिनांकापर्यंत दरवर्षी आकारला जाणारा थकीत अकृषिक कर वसूल करण्यापासून सूट देण्यात येत आहे. तथापि, ज्या मिळकती दिनांक ३१.१२.२००१ रोजी किंवा त्यापूर्वी बिनशेती झाल्या, त्या मिळकतींवर दरवर्षी आकारल्या जाणाऱ्या अकृषिक कराऐवजी, सन २००१ च्या चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ मध्ये नमूद

टप्प्यांनुसार व दराने अधिमूल्याची रक्कम (परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासुन एक वर्षाच्या आत भरणे संबंधित मिळकतधारक यांना अनिवार्य राहणार आहे. त्यानंतर सदर रक्कम दंड आणि व्याजासह वसुल करण्यात यावी.

११) तसेच, ज्या मिळकती दिनांक ०१.०१.२००२ रोजी किंवा त्यानंतर बिनशेती झाल्या त्या मिळकतींवर दरवर्षी आकारल्या जाणाऱ्या अकृषिक कराऐवजी, विकास / बांधकाम परवानगी दिलेल्या दिनांकाच्या चालू वार्षिक दर विवरणपत्रानुसार निर्धारित केलेल्या जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ चे कलम ४७ मध्ये नमूद टप्प्यांनुसार व दराने अधिमूल्याची रक्कम (परिच्छेद ५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासुन एक वर्षाच्या आत भरणे संबंधित मिळकतधारक यांना अनिवार्य राहणार आहे. त्यानंतर सदर रक्कम दंड आणि व्याजासह वसुल करण्यात यावी.

१२) सदर शासन निर्णय नगर विकास विभाग अनौपचारीक संदर्भ क्र.प्र.क्र.१/२०२६/नवि-१३, दिनांक ०२.०१.२०२६ तसेच वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्र. अनौ/०६/सास, दिनांक १०.०२.२०२६ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१०१७४१३२१३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANJAY AUDUMBAR DHARURKAR

Digitally signed by SANJAY AUDUMBAR DHARURKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forest Department,
2.5.4.20=637145FD393D6D5C713E94E6DA7BC6BEE23011448B7FC64D138630B9C76AE7A2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=FCF7172A73579B34FA622983D8FB647780FBEF1D35A1CA975955EB9193F3F800, cn=SANJAY AUDUMBAR DHARURKAR
Date: 2026.02.10 17:44:01 +05'30'

(संजय धारुरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री, (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सा.उ.)) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा.उपमुख्यमंत्री, (राज्य उत्पादन शुल्क), यांचे सचिव, मंत्रालय,मुंबई
५. मा.मंत्री (महसूल), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय ,मुंबई

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे

महामंडळामार्फत आयोजित प्रशिक्षण कार्यक्रम

प्रशिक्षण विषय

१. शेतकरी उत्पादक कंपनी
२. शेतकरी उत्पादक कंपनी संचालक मंडळ/मुख्य कार्यकारी अधिकारी
३. गोदाम बांधकाम, अन्न धान्य साठवणूक व धान्य प्रतवारी यंत्र
४. मसाल्याचे उत्पादन व मूल्यवर्धन
५. कृषी प्रक्रिया उद्योग
६. भाजीपाला रोपवाटिका व्यवस्थापन
७. शेतकऱ्यांसाठी भौगोलिक निर्देशांकाचे महत्व
८. शेडनेट हाऊस तंत्रज्ञान
९. पॉली हाऊस तंत्रज्ञान
१०. नर्सरी तंत्रज्ञान
११. हायड्रोपोनिक्स तंत्रज्ञान
१२. फळे व भाजीपाला डिहायड्रेशन आणि कॅनिंग प्रक्रिया
१३. मशरूम उत्पादन
१४. आदर्श कृषी पद्धती
१५. फळे व भाजीपाला काढणी पश्च्यात तंत्रज्ञान (PHM)
१६. कोल्डस्टोरेज व कोल्डचेन मॅनेजमेंट
१७. भाजीपाला लागवड तंत्रज्ञान
१८. सोलर डीहायड्रेशन

सहकारी संस्थासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम

- गृह निर्माण संस्था
- पतसंस्था
- बँका
- दुध संस्था
- वि.का.सेवा सहकारी संस्था
- साखर कारखाने

संपर्क

श्री. हेमंत जगताप
मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी,
मो. क्र. ८२७५३७१०८२

श्रीमती शुभांगी भोलनकर
प्रशिक्षण समन्वयक
मो. क्र. ९३२२७९४५५०

श्री. मयुर पवार
प्रशिक्षण समन्वयक
मो. क्र. ८२६३९१५३४७

श्री. मयुर शेळके
प्रशिक्षण समन्वयक
मो. क्र. ७०२८६२५४९६

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे
पहिला मजला, 'साखर संकुल' न.ता.वाडी, शिवाजी नगर, पुणे-४११००५, दुरध्वनी क्र. (०२०)२९८०९४०८
इमेल - mcdctraining2021@gmail.com वेबसाईट - www.mahamcdc.com

महाराष्ट्र सहकार विकास
महामंडळ मर्यादित पुणे आयोजित,

कृषी माल निर्यात प्रशिक्षण कार्यशाळा (५ दिवसीय)

- तुम्हाला स्वतःचा कृषी माल निर्यात व्यवसाय सुरू करण्याची इच्छा आहे का ?
- कृषी आणि अन्न प्रक्रिया उत्पादने परदेशात निर्यात करून मोठ्या संधी मिळवा !
- योग्य प्रशिक्षण, कागदपत्रे, सरकारी परवाने आणि मार्केटिंग इ. बाबतची परिपूर्ण माहिती देणारी, कृषी निर्यात क्षेत्रातील दिशादर्शक ५ दिवसीय कार्यशाळा !!

या कार्यशाळेत आपणांस खालील माहिती मिळेल...

- IEC, RCMC, PAN, TAN, DIN, DSC, ICEGATE, AD CODES, इ.परवाने काढण्याची कार्यपद्धती.
  (निर्यात व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक परवानग्या, परवाने, नोंदणी, इ. माहिती.)
- पॅकेजिंग आणि वाहतूक व्यवस्थापन – मालाची सुरक्षितता आणि खर्च बचत - प्रभावी डिलिव्हरी.
- निर्यातीसाठी आवश्यक कागदपत्रे – कस्टम क्लीयरन्स आणि परवाने, प्रोसिड्यूर आणि डॉक्युमेंटेशन.
- DGFT, इ.सी.जी.सी, डी.एम.आय, अपेडा, G-GAP, N.P.P.O., C.H.A, G.I.C. इ.चा निर्यातीमधील सहभाग.
- निर्यातीमधील धोके आणि सुरक्षा.
- आयातदार कसे शोधावे ? – आयातदारांशी संपर्क साधण्यासाठी विविध स्ट्रॅटेजी !
- ब्रॅण्डिंग व लेबलिंग.

प्रशिक्षणार्थी - कृषी माल निर्याततीचा व्यवसाय करण्यासाठी इच्छुक व्यक्ती, सहकारी संस्था, खाजगी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या, शेतकरी गट, विद्यार्थी, इ. साठी उपयुक्त.

वैशिष्ट्ये:

१. सुविधा केंद्रात प्रत्यक्ष भेट
(IFC, VHT, VPF, HOT WATER TREATMENT)
२. अनुभवी व तज्ज्ञ मार्गदर्शक

प्रशिक्षण शुल्क: (जी.एस.टी. सह)

- निवासी - रु. ११,५०५/-
- अनिवासी - रु. ९,७३५/-
- प्रशिक्षण कालावधी - ५ दिवस
  (सामाविष्ट – चहा, नाश्ता, जेवण (सकाळ + संध्या.), प्रशिक्षण साहित्य, प्रमाणपत्र)

कृषी माल निर्यात प्रशिक्षणाने तुम्हाला निर्यात व्यवसाय सुरू करण्याचा आत्मविश्वास आणि निर्यातीमध्ये यशस्वी होण्यासाठी योग्य दिशा मिळेल ! आजच संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करा.

अधिक माहितीसाठी - श्री. सादिक मणेरी, राज्य समन्वयक, एम. सी. डी. सी., पुणे.
८६००९८७८०७ mcdcexport@gmail.com
पत्ता - महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ४११००५

(PRGI Reg. No. MHMAR/25/A1461)

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे

महा सहकार (त्रैमासिक)

काय वाचाल

- आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील सहकार क्षेत्रातील महत्त्वपूर्ण घडामोडी.
- सहकार, पणन, कृषी, महसूल, पशुसंवर्धन कायद्यातील नवीन तरतुदी व सुधारणा.
- बँकिंग व विमा क्षेत्रातील अद्यावत माहिती व विश्लेषण.
- तज्ज्ञ लेखकांचे विशेष लेख व सखोल विश्लेषण.
- सायबर सिक्युरिटी/डिजिटल वापर व जोखीम व्यवस्थापन.
- सहकारी गृहनिर्माण संस्था कायदे, तरतुदी, व्यवस्थापन व सल्ला.
- कृषी माल आयात, निर्यात धोरण व व्यापार संधी.
- विविध शासकीय योजना-अनुदान कर्ज व सुविधांची सविस्तर माहिती.
- विविध प्रकारच्या योजना.
- विविध सहकारी संस्था, शेतकरी, विविध कार्यकारी सहकारी संस्था, बँका, पतसंस्था, बाजार समित्या, साखर कारखाने, ग्राहक संस्था, सुत गिरण्या, ग्रामपंचायती, शासकीय ग्रंथालय, कृषी, फलोत्पादन, वस्त्रोद्योग, पशुसंवर्धन, दुग्ध विकास, मत्स्य विकास, महसूल, ग्रामविकास, जलसंधारण इत्यादी विविध संस्था/विभागांच्या योजना, उपक्रम, कायदे यांची माहिती.

वार्षिक वर्गणी रु. २००/-

'महा सहकार' त्रैमासिकाचे वर्गणीदार होण्यासाठी
क्यू आर कोड स्कॅन करा

अथवा **www.mahamcdc.com** वेबसाईटला भेट द्या.
वर्गणी क्यूआर कोड स्कॅन करून वैयक्तिक अथवा
संस्थेचा पत्ता, पिन कोडसह संपूर्ण भरा. त्रैमासिक मिळणे यामुळे सुलभ होईल.
अपूर्ण पत्ता आम्हास अंक आपणापर्यंत पोहचविण्यात अडथळा निर्माण करेल.

वर्गणी तसेच अधिक माहितीसाठी संपर्क :

संपादक, 'महा सहकार' महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे, पहिला मजला, 'साखर संकुल', न.ता.वाडी, शिवाजीनगर, पुणे-४११००५ दुरध्वनी क्र. (०२०)२९८०९४०८ इमेल - mcdcmahasahakar@gmail.com

प्रेषक :
महा सहकार
महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ मर्यादित, पुणे
पहिला मजला, 'साखर संकुल' न.ता.वाडी,
शिवाजी नगर, पुणे-४११००५ दुरध्वनी क्र. (०२०)२९८०९४०८
इमेल - mcdcmahasahakar@gmail.com
वेबसाईट - www.mahamcdc.com

प्रति,